# माणूस

शब्दांचे कमांडर ग. दि. मा.

१८ ऑक्टोबर १९६९
चाळीस पैसे



समग्र साप्ताहिक

# माणूस

समग्र साप्ताहिक

वर्ष नववे : अंक विसावा

संपादक : **श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी ५७३५९

किंमत ४० पैसे : वार्षिक वर्गणी वीस रुपये : परदेशची वर्गणी चाळीस रुपये

मी आपल्या 'माणूस'चा नियमित वाचक आहे. गेल्या काही आठवड्यांचा 'माणूस' प्रकार वाचून अगदी कंटाळा आला आहे. हलकी, फुलकी आणि बुद्धीवादी करमणुकीच्या सदरांना आपण एकदम चाट देऊन टाकली हे बरे नाही.


ग्यानबाचे गुऱ्हाळ, भिंतीच्या 'तुंबड्या, मुक्ताफळे ही सदरे दिसेनाशी झाली आहेत. त्यात थोडे बरे— पुरंदऱ्यांची दौलत शिल्लक होती, पण त्याऐवजी गेल्या अंकात आपण अनंत भावे यांची सामान्य कथा छापली.

खरे म्हणज ही सदरे वाचता वाचता तुमचे एकदोन विचारप्रवर्तक लेख सहज हजम होत होते पण सध्या संपूर्ण डोस प्रबंधाचाच मिळतो व 'माणूस'चे अजीर्ण झाले आहे.

चाळीस पैसे मोजून अंक विकत घेणारे मी एक सामान्य गिऱ्हाईक. इतके अधिकाराने लिहिण्याचेही कारण नाही; पण 'माणूस' आपले वाटते म्हणून हे सर्व.

**ऑक्टोबर ४** **एन. एम. अवद्ध, नासिक.**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



# दिल्ली

## दिनांक ७ ऑक्टोबर

### मध्यपूर्वीय धोरणाची ठिगळाची घोंगडी

शिवाजी महाराजांनी शत्रूला नामोहरम करण्यासाठी त्याची रसद तोडल्याची उदाहरणे इतिहासात वाचायला मिळतात. जवळ जवळ तसलाच प्रकार रबातला झाला. रबातची जी अनेक अंडी दिल्ली राजधानीत प्रकाशात येऊ लागली आहेत त्यातला एक फर्मास किस्सा म्हणजे फकरुद्दीन मियांना रबातहून अक्षरशः हुसकून लावण्यासाठी त्यांचे पिण्याचे पाणीही बंद करण्यात आले होते. भारत सरकारच्या तोंडचे पाणी पळाल्याचे हे एक अभूतपूर्व उदाहरण म्हणावे लागेल.

आता रबातचे उट्टे कसे काढायचे याचा म्हणे भारत सरकार गंभीर विचार करीत आहे. अर्थात् रबातने शिकविलेला धडा लक्षात घेऊन सरकार आपले मध्य-पूर्वीय धोरण आमूलाग्र सुधारील अशी शहाण्याने तरी आशा करू नये; पण मध्य-पूर्वेतल्या समरप्रसंगाबाबत सध्या यूनोपुढे जो प्रस्ताव आहे त्याला एखादी 'भारतीय कलाटणी' द्यावी अशा एका कल्पनेचा भारत सरकार विचार करीत असल्याचे म्हणतात. म्हणजे एकूण अरबांना भारताचा जो पाठिंबा आहे तो चालूच ठेवायचा, विशेषतः इस्रायलने काबीज केलेला अरब प्रदेश मुक्त झाला पाहिजे अशी मागणी चालूच ठेवायची; पण जेरूसलेम व सुएझच्या पश्चिम किनाऱ्यावरून इस्रायलने माघार घ्यावी या मागणीवर मात्र यापुढे जोर द्यायचा नाही.

आता रबातला भारताच्या सरकारी ढुंगणावर पहिली लाथ हाणली ती पाकिस्तानने, अन् तीही अचानक परिषदेच्या दुसऱ्या दिवशी. म्हणे याह्याखानांना कराचीहून तबी आली – "भारताच्या मांडीला मांडी लावून बसलात तर तुमची गर्दनच उडवू!" तेव्हापासून याह्याखानांनी जो आक्रस्ताळीपणा आरंभला तो फकरुद्दीन मियांना हिरवा अर्धचंद्र मिळेपर्यंत थांबला नाही. असे असूनही या प्रकरणी भारत सरकार पाकिस्तानविरुद्ध काय उपाययोजना करणार आहे याचा काहीच मागमूस नाही. इतर चिल्ल्यापिल्ल्यांना मात्र भारत जरब दाखविणार आहे. सर्वात प्रथम भारत सरकार आग पाखडणार आहे ती जॉर्डनवर. भारताने जॉर्डन-

हून रॉक फॉस्फेट आयात करण्याचे कबूल केले होते तो करार मोडून भारताने आपला राग प्रदर्शित करावा अशी कल्पना आहे.

नंतर मोरोक्को. मोरोक्कोने म्हणे ह्याऱ्या प्रकारांचे समाधानकारक स्पष्टीकरण केले नाही तर राजदूत गुरबचनसिंगांना माघारी बोलावले आहे ते परत पाठवावयाचे नाही. मोरोक्कोच्या परराष्ट्रमंत्र्याने परिषदेच्या लॉबीत गुरबचनसिंग अप्रिय व्यक्ति' असल्याचं म्हटलं होतं; पण मागाहून सफाई करण्याचा प्रयत्न केला होता. आता गुरबचनसिंगांना परत पाठवायचे नाही असे ठरले तर मोरोक्कोच्या राजदूताला 'भारत छोडो' आदेश द्यायचा की नाही हा प्रश्नही भारत सरकारला ओघानेच सोडवावा लागेल.

तिसरा आरोपी इराण. गेल्या काही दिवसात औद्योगिक व आर्थिक क्षेत्रात इराणशी भाई-भाईपणा बराच वाढला होता. तेव्हा या भाईजानवर एकदम राग कसा काढावा याबद्दल भारत सरकार दुग्ध्यात पडले आहे. फार तर भगत मंत्री-महाशय या महिन्यात तेहरानला जाणार होते त्यांचा दौरा रद्द करून लाक्षणिक रुसवा प्रकट करण्याचा सरकारचा विचार दिसतो.

आरोपी नंबर चार तुर्कस्थान. आपण रबातला जे काही केले ते भारताला बाहेर घालवण्यासाठी नव्हे तर परिषदेचा बोजवारा उडू नये म्हणून केले असे तुर्की स्पष्टीकरण मिळाले आहे. अर्थात् तुर्कीला जबाब तुर्कीमे देण्याची पद्धत शिवकालीन इतिहासात जमा झाली आहे. भारत सरकारने म्हणे हे स्पष्टीकरण मान्य केले आहे.

आणि भारताचा 'जिगरी दोस्त' इजिप्त ? भारताच्या सहा कोटी मुसलमानांचे प्रतिनिधी परिषदेला हजर होते असे अधिकृत वक्तव्यात म्हणण्याची अजब शक्कल इजिप्तची होती. पण हे विधान चुकीचे असले तरी ही चूक 'सद्हेतुपूर्वक' झाली आहे, तस्मात् माफ करण्यात येत आहे—इति भारत सरकार.

अशी ही भारताच्या मध्यपूर्वीय धोरणाची ठिगळांची घोंगडी तयार होत आहे. इंदिराजी एकीकडे म्हणताहेत की रबातच्या धुळवडीमुळे आमच्या मध्यपूर्वीय धोरणात काही फरक पडणार नाही. पण पुढच्याच महिन्यात पार्लमेंटशी सामना आहे, तेव्हा ही कलंकशोभा फार मिरवणेही धोक्याचे आहे याची बाईंना जाणीव नसावी असे नाही.

## जनसंघाचा अहमदाबादी प्रतिटोला

अहमदाबादच्या निमित्ताने यशवंतरावांनी गृहमंत्री या नात्याने जनसंघाला जो जाहीर दम भरला त्याने जनसंघ काही गर्भगळीत झाल्याचे दिसत नाही. उलट जनसंघाचे अध्यक्ष वाजपेयी यांनी एका पत्रकार परिषदेत ठणकावून आव्हान दिले आहे की अहमदाबाद-प्रकरणाचा सर्व तपशील उजेडात येऊ द्या म्हणजे हा सूर्य हा जयद्रथ होईल. त्यांचे आणखी काही प्रतिटोले : प्रस्तुत दंग्यात जनसंघाचा हात तर

[ पृष्ठ ६३ वर ]

'माणूस'चे प्रतिनिधी एक आठवडाभर दंगलग्रस्त अहमदाबादेत वावरले. विविध नेत्यांच्या, कार्यकर्त्यांच्या त्यांनी मुलाखती घेतल्या. सर्व घटनांचे संगतवार टाचण करून त्यांनी त्यावरील आपले विचारही स्पष्टपणे नोंदवून ठवले. हे सर्व साहित्य एका अंकात प्रसिद्ध करणे जागेअभावी अशक्य असल्याने मुलाखतीचा हा वेगळा भाग प्रथम या अंकी वाचकांपुढे ठेवला आहे. प्रत्यक्ष घटना व त्यावरील विचारप्रदर्शनाचा दुसरा भाग पुढील अंकात प्रसिद्ध होईल.

— संपादक.

# अहमदाबाद दंगल

## इंदुचचा

पुढारीपणाचा टेंभा न मिरवता सर्वसामान्यात मिसळून जाऊन त्यांच्या प्रश्नांशी एकरूप होणारे इंदुलाल याज्ञीक अहमदाबादेत चांगलेच लोकप्रिय आहेत. अहमदाबादमधूनच ते लोकसभेवर सलग दोन वेळा निवडून आले आहेत. इंदुचचा या लाडक्या नावाने गुजराथमधील जनता आपल्या या नेत्याला पुकारते. एका जुनाट चाळीच्या तिसऱ्या मजल्यावर चचाजींची स्वारी विचार करत पडली होती.

त्यांनी आत्मविश्वासाने सांगितले की, "या दंगलीशी गुजराथी समाजाचा तसा बेताचाच संबंध आहे. हिन्दु–मुस्लीम सबधाचा विचार करताना आपण फाजील भावनाविवश होतो. आपण या प्रश्नाकडे भावनेच्या नव्हे तर बौद्धिक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे." असे आपले विचार व्यक्त करून ते पुढे असेही म्हणाले की, "अशा स्वरूपाचे प्रश्न थोड्या फार फरकाने सर्वत्रच आढळतात. इंग्लंडमधील कॉमनवेल्थ नागरीकांचा प्रश्न किंवा अमेरीकेतील निग्रोंचा प्रश्न यांचे स्वरूपही गंभीर आहे. परंतु गंभीर समस्येमुळे घाबरून जाण्याऐवजी आपण त्यातून मार्ग काढला पाहिजे. आणि त्या संदर्भात नवीन पिढीने पुढाकार घेतला पाहिजे. काश्मिरवर मोठ्या अभिमानाने तुम्ही हक्क सांगता, नव्हे तो तुमचा अविभाज्य भाग असल्याची घोषणा करता; पण आपल्या अस्तित्वालाच धोका आहे अशी भावना मुस्लीम मनामधे जर रुजली तर काश्मीरसारखा प्रश्न जास्त गुंतागुंतीचा होईल हे विसरता येणार नाही. बहुसंख्याकांच्या हक्कांवर गदा न आणता अल्पसंख्याकांचे मनातील भिती दूर केली पाहिजे."

## वसंत गजेंद्रगडकर

जन्माने महाराष्ट्रीय असूनही गुजराथच्या जीवनाशी एकरूप झालेले वसंतराव गुजराथ प्रदेश जनसंघाचे चिटणीस आहेत. दंगलप्रकरणी त्यांना अटक करण्यात आली व चार दिवसात सोडूनही देण्यात आले.

ते म्हणाले, " गुजराथच्या दंगलीत कुरापत निर्विवादपणे मुसलमानांनी काढली असली तरी हिंदूंचा पवित्रा आक्रमक होता. आणि त्याचे सर्वात प्रमुख कारण म्हणजे शासनाकडून होणाऱ्या मुस्लीमांच्या लांगूलचालनाने आणि प्रत्येक वेळी त्यांच्यापुढे पडते घेण्याच्या धोरणामुळे हिंदु समाजात निर्माण होणारी चीड. मुस्लीम समाजाची

# विविध प्रतिक्रिया

आर्थिक ताकद आणि या समाजाची मते यामुळे सरकारला—पर्यायाने कॉंग्रेस पक्षाला त्यांचा पाठपुरावा करावा लागतो. कोणत्याही राजकीय पक्षाला याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. प्रश्न आहे तो आपण कोणत्या मर्यादेपर्यंत पुढे जायचे याचा. मुस्लीम लीगच्या अस्तित्वाला आमचा विरोध नाही. परंतु या झेंड्याखाली एकत्र येणाऱ्या व्यक्तींचा पूर्वेतिहास आणि कृती यामुळे त्यांच्याबद्दल मनात शंका निर्माण होते.पाकिस्तान झिंदाबादच्या घोषणा आणि अन्य राष्ट्रविरोधी कारवाया, यांच्याविरुद्ध लीग संघटितपणे उभी राहिल्यास तिच्या अस्तित्वाबद्दल टीका करण्याचे काहीही कारण नाही. परंतु दुर्दैवाने आज तरी तशी परिस्थिती नाही.

## जमनाशंकर पंड्या

शहर कॉंग्रेसचे अध्यक्ष असलेले श्री. पंड्या आज अनेकांच्या टीकेचे लक्ष्य बनले आहेत. ' अहमदाबाद निवडणुका जिंकण्याचे राजकारण खेळून हिन्दु-मुस्लीम दुहीची बीजे जमनाशंकरजींनी पेरली ' असा उघड आरोप अनेक डाव्या पक्षांच्या नेत्यांनी माझ्याजवळ बोलताना व्यक्त केला. जमनाशंकरजींबद्दल कोणाची काहीही मते असली तरी स्थानिक राजकारणातील त्यांचे महत्त्व डावलून चालणार नाही. त्यांच्या ऑफीसमध्ये मी वीस मिनिटे होतो. टेबलावर दोन फोन होते. एक हातात होता तर दुसरा घणघणत होता. या महोदयांची आजही अनेकांना गरज आहे याचेच हे द्योतक नव्हे काय ? ऑफीसमध्ये काम जमण्यासारखे नाही म्हणून मी त्यांना बाहेर काढले. मी विचारलेल्या अनेक प्रश्नांपैकी एकाही प्रश्नाचे समाधानकारक उत्तर ते देऊ शकले नाहीत. मी अगदीच पाठ सोडत नाही अशी खात्री झाल्यावर " भाई, ये

मदत कार्य का बहोत काम अधूरा है। अभी जाना जरुरी है। माफ करना." असे सांगून माझ्या होकार नकाराची फारशी पर्वा न बाळगता जमनाजी सटकले.

## मुरारजीभाई देसाई

गुजराथ विद्यापीठाचे आवार. प्रशस्त सभागृह. दुसऱ्या मजल्यावरील एक हवेशीर खोली. भिंतीला लागून खास देशी पद्धतीची बैठक. त्यावर स्वच्छ चादरी. पाठीशी सुंदर लोड. मध्यभागी ऐसपैस लाकडी पलंग. त्यावर लुसलुशीत गाद्या आणि त्यावर मुरारजीभाईंची स्वारी. चेहरा शांत, काहीसा दुःखी, वर्तन गंभीर, शेजारी सरदारकन्या मणीबेन. हातात चरखा, कृती सुतकताई. भीषण दंगलग्रस्त भागातून हिंडलेल्या माझ्या मनाला ही पार्श्वभूमी कशीचीच वाटली.

भाईंचे उपोषण नुकतेच संपले होते. घटलेले वजन अद्यापी ठिकाणी आल्याचे लक्षण दिसत नव्हते. मनःस्थिती विशेष बोलण्याची नसावी. प्रवेश मिळवला होता तोही 'दर्शन' करण्याच्या हेतूने. स्वाभाविकपणेच जास्त खोदकाम करणे शक्य नव्हते.

दंगलीबद्दल विषण्णता व्यक्त करून मुरारजीभाई म्हणाले, "या मार्गांनी का आपण आपले प्रश्न सोडवणार आहोत ! आज मुसलमानांविरुद्ध उठता, उद्या ख्रिश्चनांना जा म्हणाल, परवा आपापसात मारामाऱ्या सुरू कराल, कुठवर चालणार हे विषारी चक्र? काही विचार ! शांतता प्रस्थापित करा. मुसलमानांच्या मनातील भीती दूर करा, विश्वास दाखवून विश्वास संपादन करा." समवेत एक डॉक्टर महोदय होते. ते म्हणाले, "आमच्या मिसेसही डॉक्टर आहेत. दवाखाना मुसलमान बहुसंख्य वस्तीत. भितीमुळे उघडणे कठीण !"

त्यावर तत्काळ मुरारजीभाई म्हणाले, "भीती ? कुणाची भिती ? खुशाल उघडा, मनात शंकेला थारा देऊ नका."

आणि समजा त्यांच्या सल्ल्याप्रमाणे उघडला आणि काही कमीजास्त झाले तर ? —पण तसे उघड बोलायचे नाही.

"आमच्या भागात काही ट्रान्समिटर आहेत म्हणतात—" इति डॉक्टर.

"पुरावा आहे ? असल्यास पोलिसांना सांगा. ट्रान्समिटर शोधण्याची कामगिरी ते पार पाडतील. उगाच अफवा पसरवू नका. जो येतो तो नवीन अफवा ऐकवतो. अशाने वातावरण सुधारणार नाही हे लक्षात घ्या आणि कार्य करा—" इति मुरारजीभाई.

## हितेंद्र देसाई

हुद्दा, मुख्यमंत्री—गुजरात राज्य. महत्त्व हुद्दा आहे तोपर्यंत ही जाणीव नक्कीच आहे. पुरावा ? हे मुरारजीभाईंचा उल्लेख 'गुजराथनो सर्वोच्च नेता पितृतुल्य मुरारजीभाई' असा करतात. भेटीचे वेळी चेहरा त्रासलेला, काहीसा चिंताग्रस्त. मी

म्हणालो. " Your Govt. is being blamed by all other political parties. " लगेच उत्तर मिळाले, " They have no other business than to do so. No other Govt. could have done anything better under these circumstances" इत्यादी. ' साहेब, गावात मुसलमानांच्या घरातून-मशिदीतून शस्त्रास्त्रे, ट्रान्समिटर्स मिळाल्याच्या वार्ता ऐकल्या. या संदर्भात काही निश्चित माहिती उपलब्ध होऊ शकेल ?" त्यावर साहेब म्हणाले, " समाजहिताच्या दृष्टीने या प्रश्नाचे उत्तर देणे योग्य होणार नाही. परंतु अशा स्वरूपाच्या काही घटना घडल्याची शक्यता असून या संदर्भात योग्य तो तपास चालू आहे."

" सरकारच्या मदत कार्याचा लाभ अनेक गुंड घेत आहेत हे खरे का ? " असा प्रश्न विचारताच ते उत्तरले, "मदत योग्य माणसांनाच मिळावी अशी दक्षता घेतली जात आहे "

" अशा स्वरूपाच्या दंगली पुन्हा उद्‌भवू नयेत म्हणून आपण कोणते उपाय सुचवू इच्छिता ? " अशी पृच्छा ऐकताच त्यांनी ऐकविले की, " एकात्मतेचा प्रश्न निगडीत असल्याने सर्व पक्षांनी पक्षीय पातळीबाहेरून आणि राष्ट्रीय स्तरावरून या प्रश्नाचा विचार केला पाहिजे. "

## सनत मेहता

श्री. मेहता बडोद्याहून निवडून आलेले प्रजासमाजवादी पक्षीय आमदार आहेत. त्यांचे म्हणणे असे की, 'बडोद्यातील दंगल ही अहमदाबाद दंगलवार्तेची उस्फूर्त प्रतिक्रिया होती. कोणत्याही एका संघटनेशी या दंगलीचा संबंध लावणे अन्यायकारक ठरेल. अहमदाबाद दंगलीच्या गांभीर्याची कल्पना शासनास वेळीच न आल्याने प्रकरण हाताबाहेर गेले. दंगलीमध्ये विद्यार्थीवर्ग तसेच सर्वसाधारणपणे पापभिरू समजला गेलेला वर्गही मोठ्या प्रमाणात उतरला होता. जातीय प्रश्नांची सोडवणूक झाली आहे, विशेषतः हिंदु मुस्लीम वाद संपला आहे असे समजणे चूक आहे. या बिकट प्रश्नांची कोंडी फोडायची असेल तर धार्मिक भावनेचे सार्वत्रिक प्रदर्शन आपण कटाक्षाने थांबवले पाहिजे; तसेच धर्म, जातपात आदि बाबींचा विचार न करता सर्व भारतीयांसाठी एकच कोड लागू करण्यात आले पाहिजे. वेगळेपणाची जाणीव जोपासली जाणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. मुस्लीम समाजामध्ये पुरोगामी स्वरूपाचे नेतृत्व निर्माण झाले पाहिजे. "

## अरुण कस्तीआ

श्री. कस्तीआ हे अहमदाबादमधील मुस्लीम विद्यार्थी नेते. डाव्या विचारसरणीचे आणि कम्युनिस्टांशी जवळीक बाळगणारे. त्यांच्या मत असे की, पूर्व नियोजित असलेल्या या दंगलीमध्ये मुसलमानांचा मोठा वाटा होता. त्यांनी तापव-

लेल्या तव्यावर दंगलीच्या भाकरी बडवल्या गेल्या, त्याही तितक्याच तयारीने संघटित असलेल्या बहुसंख्य दंगलखोरांमार्फत. असे दंगे अत्यंत कठोरपणाने मोडून काढले पाहिजेत आणि त्याचबरोबर जातीय एकात्मतेचे वातावरण, विशेषतः तरुण पिढीत तयार होईल याबाबत जागरूक असले पाहिजे.

## कम्युनिस्ट गट

दंगलीच्या संदर्भात डावे व उजवे अशा दोन्ही कम्युनिस्टांची मते मिळती जुळती आहेत. कॉ. दिनकर मेहता (डावे) कॉ. जावेद अन्सारी, कॉ. जी. एम्. वशी (उजवे) या मंडळींनी दंगलीची सपूर्ण जबाबदारी शासनकर्त्यांवर आणि काँग्रेस पक्षावर टाकली आहे. कॉर्पोरेशन निवडणुकीत काँग्रेसने अत्यंत विषारी राजकारण खेळले असून त्याची ही परिणती असल्याने या पापाचे क्षालन काँग्रेसने राजीनामा देऊनच केले पाहिजे अशी त्यांची धारणा आहे. असला भलता उपकार काँग्रेस करणार नाही हा भाग वेगळा. आम्ही वेळोवेळी पूर्वसूचना देऊनही शासनाने काहीच हालचाल केली नाही असा त्यांचा दुसरा आरोप आहे. अशा संकटातून कायमचे बाहेर पडण्यासाठी जातीय पक्षांवर कायद्याने बधने घातली पाहिजेत असा त्यांचा आग्रह आहे. दंगल अजून शमली नसून काही कालावधीनंतर पुन्हा स्फोट होण्याची दाट शक्यता असल्याचे या गटाचे मत आहे.

## मनुभाई पालखीवाला

वयाने ३५-४० च्या घरात असलेला हा तरुण बॅरीस्टर संयुक्त समाजवादी पक्षाचा गुजराथ विधानसभेतील एकमेव आमदार. काँग्रेसच्या राजकारणावर आणि विशेषत: जमनाशंकर पंड्या यांच्या कुटिल राजनीतीवर त्यांनी कठोर प्रहार केले. ते म्हणाले, "मुस्लीम जमातीतील ‘ unsocial element ’ पंड्याजींनी जोपासले आणि त्याची फळे आज सर्वांना भोगावी लागली. काँग्रसची दारे लीगवाल्यांना खुली झाली तरी त्यांचा मूळचा हिरवा रंग मात्र आहे तसाच कायम राहिला. परतु मताच्या पाठी लागलल्या काँग्रेसवाल्यांनी या गोष्टींकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले." पाकिस्तानसाठी अनेक हिंदू–मुसलमान हेर काम करीत असल्याचा आरोप करून, ते म्हणाले, "अहमदाबाद-बडोद्यातील घटनांची तपशीलवार माहिती केवळ काही तासातच पाकिस्तान रेडिओवरून दिली जाते याचा अर्थ काय? जनसंघ-संघवाले प्रत्यक्ष कृतीपासून अलिप्त असल्याचे नाटक करत असले तरी वातावरण तापवण्यात त्यांचा हात होता हे नाकारता येणार नाही. अन्य कोणत्याही पक्षाचा राष्ट्रीय नेता स्थानिक निवडणुकांपासून दूर असताना जनसंघाचे अध्यक्ष वाजपेयी मात्र त्यात रस घेतात, त्याचे दुसरे नेते बलराजजी जातीय विद्वेषाने भरलेली भाषणे करतात, आणि स्थानिक जनसंघीय नेतृत्व मग त्याच पातळीवरून काम करते." अहमदाबाद

दंगल संपूर्णपणे पूर्वनियोजित होती असा आरोप करून श्री. पालखीवाला म्हणाले, "कोणत्या इमारती जाळायच्या, कोणती दुकाने लुटायची याच्या पक्क्या याद्या दोन्ही बाजूंकडे तयार होत्या आणि ठिणगी पडताच पद्धतशीरपणे त्याची कारवाई करण्यात आली. मुसलमानांचे प्राथमिक धोरण आक्रमक असले तरी त्यांना ही भूमिका महागात पडली. गुजरायमध्य स्थायिक झालेल्या अन्य जमातींनी पुढाकार घेऊन ही दंगल घडवून आणली. दंगल शमली असली तरी वातावरण तंग आहे. अशा स्वरूपाचे प्रश्न राष्ट्रीय पातळीवरून परस्परांमध्ये स्नेहभाव निर्माण करून सोडवले गेले पाहिजेत राष्ट्रीय एकात्मतेची व राष्ट्राच्या सुरक्षिततेची सांगड या प्रश्नांशी घातली गेली आहे हे कदापी विसरून चालणार नाही."

## रविशंकर महाराज

हे म्हणाले, "गुजरातमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात जातीय दंगली होतील असे जर कुणी मला पूर्वी सांगितले असते तर मी त्याला मूर्खातच काढले असते. या कठोर वास्तवतेने माझ्या मनास विलक्षण धक्का बसला असून या राष्ट्रीय संकटातून आपल्याला मार्ग काढावाच लागेल आणि त्यासाठी तरुण पिढीला समजूतदारपणाचे धोरण स्वीकारावे लागेल."

## हिंमत शहा

यांनी असे मत व्यक्त केले की, "दंगलीमध्ये हिंदु व मुस्लीम या दोन्ही जमातीतील कामगारांनी मोठा भाग घेतला. दंगलीचे स्वरूप शुद्ध जातीय आहे असे मला वाटत नाही. तरुण पिढीच्या मनात रुजत असलेली निराशा आणि दारिद्र्याखाली पिचत असलेला कामगारवर्ग यांनी जातीय आवरणाखाली आपल्या उद्रेकाचे प्रदर्शन केले आहे. म्हणूनच केवळ जातीय दृष्टिकोनातून या दंगलीकडे पाहणे योग्य ठरणार नाही. दंगलपूर्व काळात सुमारे पाच गिरण्यातील साडेचार-पाच हजार कामगार पूर्णपणे बेकार होते हेही विसरून चालणार नाही. विद्यार्थ्यांमध्ये भवितव्याविषयी शाश्वती निर्माण करणे आणि कामगारांच्या जीवनातील अनेक प्रश्नांची सोडवणूक करणे आवश्यक असून हे प्रश्न सुटल्यानंतर जातीय वैमनस्यातील ताणाव कमी होतील असे उपाय योजणे योग्य ठरेल."

## प्राचार्य पी. जी. मावळंकर

हे गेली १५–२० वर्षे शिक्षणक्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावत आहेत. लोकसभेचे पहिले सभापती कै. दादासाहेब मावळंकर यांचे हे चिरंजीव. विद्यार्थ्यांनी या जातीय दंगलीत मोठ्या प्रमाणात भाग घेतल्याचे दिसून आल्याने मी श्री. मावळंकर यांची प्रतिक्रिया जाणून घेण्यास उत्सुक होतो. आपले विचार सुस्पष्ट करताना

ते म्हणाले, "अहमदाबादमध्ये सुमारे ५० महाविद्यालयांत ३० ते ३५ हजार विद्यार्थी आज शिक्षण घेत आहेत. माध्यमिक शाळांची संख्या २०० च्या घरात असून विद्यार्थीसंख्या एक लाखाच्या घरात आहे. गुजरात विद्यापीठ शिक्षणाचे प्रमुख केंद्र असून १५० महाविद्यालये त्याच्याशी सलग्न आहेत. आज शिक्षण-क्षेत्रात असलेल्या मंडळींनी शिक्षणाला अक्षरशः धंद्याचे स्वरूप आणले आहे. विद्यार्थ्यांबद्दल कुणालाच आस्था उरलेली नाही. यामुळे विद्यार्थ्यांत काहीसा असंतोष निश्चितपणे होता. त्याची दखल घेतली न गेल्याने विद्यार्थ्यांमधील उत्साहाला चुकीचे वळण लागले व प्रवाहपतिताप्रमाणे ते दंगलीत ओढले गेले. विद्यार्थ्यांमधील उत्साह व सामर्थ्य यांना विधायक स्वरूपाचे वळण न दिल्यास अशा दंगलीत यापुढेही विद्यार्थी ओढला जाण्याची शक्यता असून त्यासाठी राजकीय व जातीय पक्षांकडून प्रयत्न केले जाण्याची शक्यता दृष्टिआड करून चालणार नाही. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी शिक्षणकाळात प्रचलित राजकीय घडामोडींचा संगतवार अभ्यास करून भोवतालच्या परिस्थितीची जाणीव करून घेतली पाहिजे. मात्र प्रत्यक्ष राजकारणापासून त्यांनी विद्यार्थीदशा संपेपर्यंत अलिप्तच राहिले पाहिजे."

## मुस्लीम नेतृत्व

अहमदाबाद व बडोदा येथील मुस्लीम नेत्यांशी मी दंगलीबाबत चर्चा केली. यासीम खान पठाण, यसूलखान, महंमद हनीफ आदि स्थानिक पातळीवरील नेते आणि ए. एम. पीरजादा या मंडळींच्या मते, 'या दंगलीमुळे गुजरातमधील मुस्लीम जनतेत असुरक्षिततेची भावना प्रचंड प्रमाणात बळावली आहे. संघटित हिंदूंना तोंड देण्यासाठी मुसलमान संघटित झाले तर त्यात वावगे काहीच नसून त्यांच्या सुरक्षिततेबद्दल त्यांच्या मनात थोडीशी हमी निर्माण होण्यास मदत होणार आहे. अराष्ट्रीय वृत्तीच्या मुसलमानांना शासन केल्यास आम्हाला हरकत असण्याचे कारण नाही. परंतु सरसकट मुसलमानांना अराष्ट्रीय ठरवून भुई बडवण्याची वृत्ती हिंदु समाजाने सोडली पाहिजे."

अराष्ट्रीय मुसलमानांना पकडून देण्याची कामगिरी संघटित मुसलमान का करत नाहीत? तसेच अव्यभिचारी स्वरूपात राष्ट्रनिष्ठा प्रगट करण्यास मुस्लीम समाज पुढाकार का घेत नाही? धर्म-वर्चस्वाखाली असलेल्या आपल्या बांधवांना या वर्चस्वाबाहेर आणण्याचे प्रयत्न मुस्लीम नेतृत्वाकडून का होत नाहीत? या माझ्या तीनही प्रश्नांना एकही जातीय मुस्लीम नेता समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही.

[ उत्तरार्ध पुढील अंकी ]

□ □ □

# श्रेयनामावली

गंगाधर गाडगीळ
मधू मंगेश कर्णिक
द. मा. मिरासदार
आनंद यादव
रंगा मराठे
गजानन जहागिरदार
सूर्यकांत
श्रीकांत मोघे
विजय तेंडुलकर
ग्यानबा
सुधाकर राजे
य. दि. फडके
दादुमिया

**— माणूस**
**दिवाळी अंक**

# पुणे ते पूर्णिया

लेखांक दोन

डॉ. अनिल अवचट

चिखलातून चालताना बहादूर विचारीत होता, 'आपण सरकारी माणसं की पब्लिकची माणसं ?'

त्या सामान्य माणसाचं हे साधं क्लासिफिकेशन ऐकूण मजा वाटली. मग मी त्याला आमच्या भेटीचा उद्देश सांगितला. जमीनदाराविषयी माहीती काढायचा प्रयत्न केला. पण बहादूर दाद लागू देत नव्हता.

पाचपंचवीस झोपडया मागे टाकल्यावर एका प्रशस्त आवारात आलो. ही रघुबंस बाबूंची जुनी कोठी. सगळीकडून एकमजली घरे. पुढे प्रशस्त पडव्या. चार-चार हातावर खांब. आवारात व पडवीवर पडलेल्या बऱ्याचशा खाटा.

सगळीकडे माणसांची वर्दळ होती. पन्नासएक नोकर कामे करीत होते. पलीकडल्या पडवीत पोत्यांच्या थप्प्या लागल्या होत्या. आतही बरेचसे धान्य दिसत होते. ते कोठार असावे.

मागच्या बाजूला एक महालवजा नक्षीकाम केलेली वास्तू दिसत होती. एका बाजूला घुमट व त्यावर कळस होता. ते मंदिर असावे. आवारात ये-जा करणाऱ्यांमध्ये जाडजूड शरीराची, पिळदार मिशांची, गोऱ्या रंगाची काही माणसे संथपणे वावरत होती. त्यांच्या ढबीवरून ती जमीनदाराच्या घरची मंडळी असावीत.

बहादूरने देवडीवरून आत एका प्रशस्त पडवीत मला नेले व तेथल्या काळया रंगाच्या व पिळदार मिशा असलेल्या माणसाला सांगितले की यांना राजासाहबना भेटायचे आहे. त्याने माझ्याकडे लक्षपूर्वक पाहिले व विचारले की, "काय काम आहे ?"

माझ्या भेटीचा उद्देश सांगावा असा तो माणूस मला वाटला नाही. म्हणून मी त्याला सांगितले की, "माझे काम राजासाहबांकडेच आहे. त्यांची मला गाठ हवी आहे."

त्याने माझ्याकडे विचित्रपणे पाहिले. एका बाकाकडे बोट दाखवून 'बैठिये' म्हटले व आत गेला. मी बसून राहिलो. आतून एकेक जण बाहेर यायचा व माझ्या समोरच्या बाजूला उभा राहून माझ्याकडे रोखून पहात उभा रहायचा. एक आला, दुसरा आला, पाच सातजण येऊन उभे राहिले. वातावरणात एकदम सस्पेन्स आला होता.

आतून आणखी एक गृहस्थ आले. जवळ येऊन बसले. तरतरीत नाक, गोरेपान, घारे डोळे, वय अंदाजे साठ.

चौकशीस सुरुवात झाली.

"कहाँसे आये आप ?"

"महाराष्ट्रातून. पुण्याहून."

"पुण्यास काय करता आपण ?"

"डॉक्टर आहे."

चेहेऱ्यावर आश्चर्य दिसले.

"कोणी पाठवले आपल्याला ?"

"कोणी नाही. तसाच आलो."

"काय काम आहे राजासाहबांकडे ?"

मी सांगितलं, "मी एका साप्ताहिकाचा प्रतिनिधी म्हणून आलो आहे."

"काम काय काढलंय ?"

"मी बिहार पहात फिरत आहे. पुण्याचे एसेम जोशी मला भेटले. पूर्णिया जिल्ह्यात शेतकऱ्यांचा सत्याग्रह सुरू होणार असल्याचं ऐकलं. म्हणून प्रॉब्लेम काय आहे ते समजावून घ्यावं म्हटलं. म्हणून आलो. काय प्रॉब्लेम आहे आहे इधला ?"

"प्रॉब्लेम तो कुछ है ही नही इधर." ते गृहस्थ बोलू लागले.

त्यांचं नाव जोगेश्वर बाबू. रघुबंस बाबूंचे प्रधानजी. त्यांच्याविषयी काल रात्री एकलं होतं. कोणी म्हणालं होतं 'रघुबंसपेक्षा जोगेश्वर बाबूला भेटा. तो एक महावल्ली आहे.' योगायोगाने त्यांचीच गाठ पडली.

"प्रॉब्लेम तो है ही नही, लेकिन प्राब्लेम बनाया जाता है। ये जो पोलिटिशियन लोग है न, ये लोग प्राब्लेम बनाते है।"

मी सर्दच झालो. मला हे उत्तर अपेक्षितच नव्हते. मला वाटले की तो त्याची बाजू सांगेल, पण प्राब्लेम मान्य करेलच.

मी विचारले, "असं कसं म्हणता, बटाईदारांच्या प्रश्नाचे काय ?"

त्याला वाटलं की या पोराला जरा माहिती दिसते बरं का !

तो म्हणाला, "त्यांची काही तक्रार नाही. त्यांच्या व आमच्यामध्ये ॲग्रिमेंट आहे. आज पिढ्यान्पिढ्या हे चालत आलेलं आहे."

"बटाईदारांकडून धान्य कोणत्या हिशेबानं घेता. ?"

[ पृष्ठ ५८ वर ]

## द. मा. मिरासदार

ग. दि. माडगूळकर यांना ५० वर्षे पूर्ण झाली. ते आता ५१ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत आणि या निमित्ताने त्यांच्या निवडक साहित्याचा ग्रंथ लवकरच प्रसिद्ध होणार आहे ही बातमी जेव्हा पहिल्यांदा वाचली तेव्हा मला दोन प्रसंग आठवले. आठदहा वर्षांपूर्वी पंढरपूरला अखिल भारतीय सर्वोदय संमेलन भरले होते. विनोबाजींचा मुक्काम पंढरपूरला होता. राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्यापासून अनेक बडीबडी मंडळी या संमेलनासाठी आली होती. एखाद्या आषाढी-कार्तिकीप्रमाणे पंढरपूर पुन्हा एकदा गजबजले होते. कुतूहल म्हणून मीही पंढरपूरला गेलो होतो. आणि अचानक ग. दि. माडगूळकर नि सुधीर फडके पंढरपूरला आले. माडगूळकर अर्थातच माझ्या घरी उतरले. मी आश्चर्याने विचारले.

"अण्णा, तुम्ही आणि सुधीर इकडे कसे? गीतरामायणाचा कार्यक्रम तर नाही?"

अण्णा हसून म्हणाले,

"विनोबानी आमचं गीतरामायण ऐकावं अशी बऱ्याच मंडळींची इच्छा आहे. माझी तर आहेच. तो योग आला आहे. पाहूया कसा जमतो ते."

# सदैव बहरलेला पारिजात

संमेलनाच्या कार्यकर्त्यांनी योग जुळवून आणला. विनोबाजींनी नाव ऐकले होते. त्यांनाही उत्सुकता असावी. पहाटे साडेचारची वेळ मिळाली. साडेचार ते पांच असा अर्धा तास वेळ त्यांनी काढला. अण्णा म्हणाले, स्नान करून जायचे. इतक्या पहाटे उठून पाणी तापवून, स्नान करून वेळेवर पोचायचे म्हणजे देशस्थाच्या घरात धर्मसंकटच. पण अण्णानी गार पाणी चालेल म्हणून सांगितले. रात्री गप्पा मारीत बसलो आणि चांगलाच उशीर झाला. चारला जागे झालो. भराभरा डोक्यावर गार पाण्याच्या बादल्या ओतून आम्ही घाईघाईने निघालो तरी पोचायला पावणे-पाच होऊन गेले. विनोबाजींचे सेक्रेटरी (बहुधा कुणीतरी बाई होत्या) म्हणाले,"

"वेळ होऊन गेली. आता तुम्हाला कार्यक्रम नाही करता येणार. निरुपाय आहे."

अण्णा आणि सुधीर फडके यांच्यापेक्षा बरोबर आलेल्या आमच्यासारख्या चार डोकांची तोंडेच जास्त काळवंडली. सगळेच हिरमुसले झाले. तथापि प्रयत्न करून



# ग. दि. मा.

पाहू म्हणून एक कार्यकर्ते आत गेले, काहीतरी कुजबूज करून आले. उल्हसित चेहेऱ्याने म्हणाले, "चला लवकर. पधरा मिनिटं मिळाली आहेत."

विनोबाजींसाठी राखून ठेवलेल्या खास खोलीत आम्ही गेलो. दहा पधरा मंडळी भुईवर स्तब्धपणे बसली होती. मध्यभागी स्वच्छ कंदील टांगला होता. जवळच एक डेस्क होते. त्या डेस्कजवळ विनोबा बसले होते. कृश शरीर, दाढी, डोळ्याला चष्मा, कानावरून गुंडाळलेले पांढरे स्वच्छ उपरणे. सर्वांनी नमस्कार केला. सुधीर फडके त्यांच्यासमोर पेटी घऊन बसले. अण्णा त्यांच्याजवळच मांडी घालून बसले. हुंकार मिळताच सुधीरची बोटे पेटीवरून सराईतपणे फिरू लागली. त्या शांत, प्रसन्न वेळी ते सूर अधिकच रम्य वाटले. बघताबघता बाबूजी गाऊ लागले—

स्वये श्रीरामप्रभू ऐकती
कुशलव रामायण गाती.

त्या मधुर स्वरांनी, शब्दांनी विनोबा मोहीत झाले. एकाग्र चित्ताने ऐकत राहिले.

गीत संपल्यावर समाधानानें ते म्हणाले,

"गीतरामायणाच पुस्तक आहे ?"

"होय, हे घ्या."

असे म्हणून अण्णानी आपल्याजवळचे पुस्तक डेस्कवर ठेवले. मग काही गीते बाबूजीनी म्हटली. विनोबाजींनी ते ते पान काढून वाचतवाचत ऐकली. पंधरा मिनिटं केव्हाच होऊन गेली. सेक्रेटरी बाईनी साखळीचे लोंबते घड्याळ विनोबांच्या समोर धरले. विनोबा म्हणाले,

"असू द्या. आणखी थोडावळ ऐकेन."

कार्यमग्नतेवर रसिकतेचा विजय झाला. विनोबांनी आणखी काही गीते ऐकली. बाईनी पुन्हा घड्याळ समोर धरले. विनोबांनी म्हटले,

"ठीक आहे, आता पुरे."

अण्णा म्हणाले,

"आता शेवटचं एकच गीत आपण ऐकावं अशी इच्छा आहे."

विनोबा काही बोलले नाहीत. बाईनी पुन्हा घड्याळ दाखवले. बाबजीनी तेवढ्यात पेटीवर भैरवीचे करुण स्वर उगीचच काढले. विनोबा म्हणाले,

"ठीक आहे. एवढ गीत ऐकतो."

मग बाबूजींनी भैरवीचे सूर पुन्हा एकदा आळवले. शेवटचे गीत सुरू झाले.

रघुरायाच्या नगरी जाऊन
गा बाळानो श्रीरामायण.

विनोबांची तंद्री लागली. पुस्तकातले शेवटचे पान काढले. एकेका ओळीवर बोट ठेवीत ते तल्लीन होऊन ऐकत राहिले. बघताबघता त्यांच्या नाकपुड्या थरथरु लागल्या. डोळे भरून आले. अखेरीस जेव्हा 'नका स्विकारू धनाकांचना, काय धनाचे मोल मुनिजना' ही ओळ ऐकली मात्र, त्यांच्या डोळ्यातून अविरत अश्रु-धारा सुरू झाल्या. गीत संपले. 'अवघ्या आशा श्रीरामायण' असे म्हणून बाबूजी पुढे थांबणार तोच अण्णानी त्यांना खूण केली. बाबूजींनी लय वाढवून श्रीराम श्रीराम...असे सूर वाढवले. विनोबाजींच्या डोळ्यातून अश्रूंची धार वहातच राहिली.

एका मोठ्या माणसाच्या मनावर गीतरामायणाने केलेला हा परिणाम मी प्रत्यक्ष डोळ्यानी पाहिला. कार्यक्रम संपल्यावर विनोबानी उभयता कलावंताना मनःपूर्वक धन्यवाद दिले. हे पुस्तक माझ्याजवळ असू द्या असे सांगितल. माडगूळ-करानी ते त्यांना आदरपूर्वक भेट म्हणून दिले.

दहा वर्षापूर्वीची ही गोष्ट. ती आठवली आणि दोन-तीन वर्षापूर्वीचा पुण्यातील एक प्रसंगही डोळ्यापुढे आला. नूतन मराठीच्या पटांगणात सुधीर बाबूंचे गीत-रामायण होते. अनेक वेळा एकूनही त्याची गोडी कायमच होती. मीही त्यादिवशी

कार्यक्रमाला गेलो होतो. खूप गर्दी होती. 'पटांगण' श्रोत्यानी गच्च भरले होते. कुठेतरी पाठीमागेच बसावे लागले. गाणे ऐकताऐकता मी आसपास पहात होतो. बऱ्याच मंडळींच्या हातात गीतरामायणाचे पुस्तक होते. सुधीरच्या स्वराबरोबर बारीक स्वरात अनेक जण ती ती ओळ म्हणत होते. त्या सगळयांचा मिळून एक सामुदायिक स्वर निर्माण झाला होता आणि तो शांतपणे, ऐकणाऱ्याच्या कानी स्पष्ट पडत होता. मला मोठी गंमत वाटली.

मध्यंतरात माझ्या समोरच्या गृहस्थाना मी म्हटले,

"आपलं पुस्तक थोडा वेळ बघूं का ?"

त्या गृहस्थाने मांडीवर ठेवलेले आपले गीतरामायणाचे पुस्तक माझ्या हातात ठेवले, बजावले.

"हातातच घेऊन पहा हां. खाली जमिनीवर ठेवू नका."

"ठीक आहे."

असे म्हणून पुस्तक घेतले आणि मी ते चाळू लागलो. इकडची तिकडची गीते पुन्हा एकदा वाचली. मध्यंतर संपून पुन्हा गीतगायन सुरू झाले. मी समोरच्या त्या गृहस्थांच्या मांडीजवळ पुस्तक खाली ठेवीत म्हटले,

"हं, हे घ्या आपलं पुस्तक. थँक्स."

विलक्षण चपळाईने त्याने आपले दोन्ही हात पुस्तकाखाली धरले आणि वरच्यावर पुस्तक सावरीत गृहस्थ दुखावलेल्या सुरात म्हणाले,

"मी तुम्हाला मघाशीच बजावलं होतं ना, की पुस्तक जमिनीवर ठेवू नका म्हणून ? तरी तुम्ही ठेवत होताच–"

"माफ करा. माझ्या लक्षात नाही राहिले."

ओशाळलेल्या मुद्रेने मी दिलगिरी प्रदर्शित केली. कार्यक्रम पुढे सुरू झाला. माझे मन मात्र आश्चर्याने विचार करीत राहिले. मनात आले की माडगूळकरांच्या गीतरामायणाला लोकमानसात केवढे हे अनन्यसाधारण स्थान ! निष्ठावान वारकऱ्याने जसे ज्ञानेश्वरी ग्रंथाला जपावे तशी ही माणसे या पुस्तकाबद्दल श्रद्धा ठेवून वागत आहेत. कवीचे हे भाग्य खरोखर हेवा करण्यासारखे नाही काय ? कलावंताला यश मिळते. फार मोठे यश मिळून जाते. कीर्ती मिळते. राजसभेतले सन्मान अनेकाना मिळतात. द्रव्य तर मिळतेच मिळते. ह्यात आता काहीच अवघड राहिलेले नाही. पण लोकांच्या अंतःकरणात स्थान मिळणे ही गोष्ट दुर्मीळ. गीतरामायणाने हे स्थान मिळवले आहे. कवी म्हणून माडगूळकरांच्या जीवनाचे सार्थक झाले आहे. यापेक्षा अधिक काय मिळवायचे असते ?

गेल्या पंचवीस वर्षात माडगूळकरानी अनेक चमत्कार केले. ते पुढे आले ते नकलाकार आणि नट म्हणून. नंतर त्यांची ओळख झाली ती गोड भावगीतांचे लेखन करणारे कवी म्हणून. मग मात्र त्यांचे कर्तृत्व एकदम बहरले. 'रामजोशी'चा

तुरा डोक्यात खोवून त्यानी मराठी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. वीस वर्षे ते या सृष्टीत एखाद्या राजासारखे वावरले. त्या काळात पटकथा-संवाद-गीते म्हणजे माडगूळकर हे सर्वमान्य समीकरण होते. हे राज्य चालवीत चालवीत नव्या साहित्यात चपखल बसतील अशा अनेक कथा त्यानी लिहिल्या. ललित लेख लिहिले. कादंबरी लिहिली. आणखी बरेच लेखन केले. चित्रपटातून अनेक भूमिका केल्या. अनेक क्षेत्रात त्यांनी जिद्दीने संचार केला. तरीसुद्धा 'कवी' हीच त्यांची 'प्रकृती' असे मला नेहमी वाटत आले आहे. बाकीच्या गोष्टी या त्यांच्या भूमिका आहेत. त्या त्यानी उत्तम वठवल्या आहेत. एखादा कुशल नट ज्या सफाईने आणि तद्रूपतेने आपल्या भूमिका करतो तशा. पण भूमिका वेगळी आणि मूळचा मनुष्य वेगळा. माडगूळकरानी अनेक क्षेत्रात यश मिळवले. पण तरी ते कवी म्हणूनच जन्माला आले आहेत असे वाटते. रसाळ, मधुर प्रासादिक मराठी शैलीचा असा कवी आज तरी मराठीत दुसरा नाही !

पण माडगूळकरांच्या काव्य-लेखनाबद्दलही मनात अढी आणि पूर्वग्रह असणारे साहित्यिक आहेत. माडगूळकर हे गीतकार आहेत, कवी नव्हेत असे या मंडळींचे मत आहे. खूप विचार करूनही त्यांच्या या म्हणण्यातील मर्म मला कधीच उलगडलेले नाही. गीत हे काव्य असत नाही हा सिद्धान्त कसा काय होतो ? लय, ताल, शब्दांचा गोडवा, नादमाधुर्य याना गीतात महत्त्वाचे स्थान असते हे खरे आहे. ही बंधने पाळून गीत लिहावे लागते. पण कोठलेही बंधन आले की त्यातील काव्य नाहीसे होतेच हा दुराग्रह का, हे कधीच कळल नाही. 'मुक्तछंद' हेही अखेरीस एक सैल पण बंधनच आहे ना ? मग एखादे उत्तम गीत हे उत्तम काव्य का ठरू शकत नाही ? का गीत हे म्हटले जाते आणि रसिकाना समजते हे त्याचे करंटेपण आहे ? माडगूळकरांचे काव्य समजते आणि गुणगुणावेसे वाटते हा तर त्यातील आक्षेपार्ह भाग नव्हे ना ? नवी कविता ही दिवसेन्दिवस इतकी वैयक्तिक होत चालली आहे की तिचे स्वागत करणाऱ्या टीकाकारानाही आता त्याचा अर्थ समजेनासा झाला आहे. अशा परिस्थितीत कोणती कविता टिकेल आणि कोणती टिकणार नाही हे सांगायला कशाला पाहिजे !

माडगूळकरांची कविता जुन्या, बाळबोध वळणाची आहे. ती संतावाङ्मयाचा अमृतकुंभ बरोबर घेऊन आली आहे. संस्कृत परंपरेचाही वारसा सांगणारी आहे. शाहिरी रंगात तर आकंठ बुडाली आहे. तिचा तोंडवळा कधी एकनाथाच्या काव्यासारखा भावगंभीर आहे तर कधी श्रीधरासारखा प्रासादिक आहे. भाषेचा ठसका मुक्तेश्वराची आठवण करून देणारा आहे आणि शाहिरी वाङ्मयाचे खरे वारसदार आज तरी मराठीत माडगूळकर हेच एकमेव आहेत. काव्याच्या क्षेत्रात त्यानी केलेली ही किमया खरोखरीच अलौकिक आहे.

माडगूळकरांची कविता वाचीत असताना कधी कधी ती फारच सोपी वाटते.

असली ओळ आपल्यालाही लिहिता येईल असे उगीचच मनात येते. पण सोपे लिहिणेच अतिशय अवघड हे लवकर लक्षात येत नाही. 'आला नाही तोवर तुम्ही जातो म्हणता का ?' या ओळीत तसे विशेष काय आहे ? पण माडगूळ-करांच्या लेखणीतून ती उतरते ती एक वेगळेच सौंदर्य घेऊन. 'एक मराठी काव्य हरपल गंगेच्या काठी' ही ओळही साधीच आहे. पण ती कानी पडल्यावर मन हलकेच तरंगत कुठल्यातरी अज्ञात भूतकाळात प्रवेश करते आणि एक प्रकारची तंद्री लागते.

'शरदाचे चांदणे, मधुवनी फुलला निशिगंध.
वाजवी पावा गोविंद"

या दोनच ओळीत कालिंदीच्या वाळवंटातील शुभ्र चांदणे आणि रासक्रीडेचे धुंद वातावरण डोळ्यासमोर उलगडते. 'औंदा बाई आले मी लग्नाला' हे शब्द खेड्यातल्या पोरसवदा कामिनीचे लडिवाळ रूप घेऊनच येतात.

प्रभातसमयो पातला
आता जाग बा विठ्ठला...
...दिठींदिठी लागली तुझिया श्रीमुखकमळावरी
श्रवणमुखी रंगली तुझिया नामाची माधुरी
प्राणांची अरती, काकडा नयनी चेतविला
आता जाग बा विठ्ठला"

ही गोड भूपाळी कानावर पडली की पहाटे उठून, स्नान करून प्रसन्न मनाने आपण देवळाच्या गाभाऱ्यात प्रवेश करतो आहोत असा भास होतो. नंदादीपाच्या मंद, सात्विक उजेडात उजळलेले 'श्रीमुखकमळ' आपल्याला कसे स्वच्छ दिसू लागते आणि मग, पहाटेच्या वेळची चिमण्या पाखरांची गोड किलबिल कानावर पडली की जसा अनिर्वचनीय आनंद व्हावा तसा आनंद मिळतो.

गवत उंच दाटदाट
वळत जाय पायवाट
वळणावर आंब्याचे
झाड एक वाकडे

शब्दांतील चित्र आपल्याला नकळत त्या पायवाटेचाच सुखद प्रवास घडवते. माडगूळकरांची कविता अशी रूप, गंध, आणि स्पर्श घेऊनच येते आणि एखादे पीस अलगत खाली उतरावे तशी आपल्या मनात उतरते. ही चित्रपटासाठी लिहिलेली गीते आहेत, केवळ प्रासंगिक आहेत, हे कधीकधी खरेसुद्धा वाटत नाही ! वाकडे, गुंडगुळा, आब्द, आवश्यकता असले रुक्ष, गद्य शब्द माडगूळकर सहज कवितेत आणतात. बहुधा ते खटकतही नाहीत. गीतरामायणाच्या रचनेच्या वेळचा एक प्रसंग मला आठवतो. माडगूळकरानी नवे गीत नुकतेच लिहिले होते. 'या इथे लक्ष्मणा

बांध कुटी, या मंदाकिनिच्या तटनिकटी ' हेच ते गीत. एक प्रसिद्ध कवी त्याना भेटायला आले. माडगूळकरानी हे गीत त्याना वाचून दाखवले. ते कवी म्हणाले,

"गीत छान झालं आहे. पण 'लक्ष्मणा' हा शब्द इथं जरा खटकतो. तो कठोर आणि गद्य शब्द आहे. त्याच्याऐवजी दुसरा एखादा नादमधुर शब्द—"

"घालता येईल– " अण्णा शांतपणाने म्हणाले, "पण मग ते गीत तुमचे होईल. माडगूळकरांचे होणार नाही !"

'लीनते चारुते सीते' हे माडगूळकरांचे गाजलेले गीत. पण ते लिहिले तेव्हा सुधीर फडके म्हणाले, "या गीताला जन्मात कधी चाल लागणं शक्य नाही."

माडगूळकर थट्टेने म्हणाले, "तर मग आपण पुढच्या जन्मात याची चाल लावू. रेडिओतर्फे जाहीर करू की, गीतरामायणाचा राहिलेला भाग आता पुढील जन्मी आपल्याला ऐकायला मिळेल."

पण फडकेही जिद्दीचे कलावंत. तेही हट्टाला पेटले. माडगूळकर गीत बदलायला तयार नाहीत हे पाहिल्यावर त्यानी ते आव्हान स्वीकारले. गीताला चाल लावली. तीही किती लोकप्रिय झाली हे सर्वांना माहीतच आहे.

अण्णांचा परिचय झाला त्याला आता अठरा वर्षे झाली. कदाचित जास्तीच. त्यावेळी ते एरंडवणा उद्यानाजवळच्या पवारांच्या बंगल्यात रहात होते. मी वृतपत्र–क्षेत्रात धडपड करणारा एक तरुण होतो. दिवाळी अंकासाठी कविता मागायला गेलो तीच पहिली भेट असावी. पण व्यंकटेशबरोबरच्या मैत्रीने, थोड्याशा लेखनाने आणि 'आपल्या मुलखातले' या भावनेने त्यानी मला लवकर जवळ केले. दिलखुलास, मोकळा आणि दिलदार स्वभावाचा हा कवी पुरेपूर देशस्थी बाण्याचा आहे एकदा 'आपले' म्हटले की मग अंतर नाही. व्यवसायातल्या स्पर्धेत भलेबुरे अनुभव काही जणाना आलेही असतील. पण तसे व्यवहारात पुष्कळदा वागावेही लागते. अनेक मोठीमोठी माणसेही प्रसंगी कठोर झालेली मी पाहिली आहेत. त्यावरून एखाद्याच्या व्यक्तिमत्त्वाचे पूर्ण मूल्यमापन करणे इष्ट ठरत नाही. चित्रपटव्यवसाय हा मुळातच इतका गुंतागुंतीचा आणि स्वार्थाने भरलेला आहे की त्यात टिकून राहण्यासाठी डावपेचाने राहणे फारसे गैर आहे असे मला वाटत नाही. पण एवढे खरे की माडगळकरानी वीस वर्षे मराठी चित्रपटसृष्टीत सतत चौथाई–सरदेशमुखी वसूल केली ती निःसंशयपणे आपल्या गुणावर आणि परिश्रमावरच. केवळ राजकारणावर मुळीच नव्हे. माडगूळकरांचा प्रभावच तसा होता. मोठेमोठे निर्माते, दिग्दर्शक, नट–नटी त्यांच्यापुढे किती आदराने वागत आणि वागतात हे मी प्रत्यक्ष डोळ्यानी पाहिले आहे. हा धाक आणि आदर शांताराम आणि भालजी यांच्याही बाबतीत आहे. पण ते निर्माते होते आणि माडगूळकर फक्त लेखक आणि कवी होते हा भेद लक्षात घेण्याजोगा आहे. हा कवी दारिद्र्यातून वर आला आहे आणि त्यामुळे त्यांच्या स्वाभिमानाला एक तिखट धार आहे. कधीकधी निरापराध माणसानाही

मार लागून ती घायाळ होतात. शांतारामबापूंशी एका लहानशा कारणावरून मत-भेद आणि कटुता निर्माण होताच या कवीने चांगल्या पगाराची नोकरी क्षणाचाही विचार न करता सोडून दिली. प्रकृतीने संतापी असलेला हा माणूस मनाने अत्यंत भावनाप्रधान आणि निर्मळ आहे. एखाद्या माणसाबद्दल राग आल्यामुळे अण्णांनी त्याला उद्देशून चार कठोर शब्द जरी उच्चारले तरी पुन्हा त्यांच्या मनात काही उरत नाही. या माणसाने पुष्कळ काही सोसले आहे. स्वतः प्रतिभावंत कवी असून दुसऱ्याकडे पोटासाठी लेखनकामाठी केली आहे. घरच्या लोकांसाठी अपार कष्ट आणि मानसिक यातना सोसल्या आहेत. हे ध्यानात घेऊन, जो त्यांच्या केव्हातरी व्यक्त होणाऱ्या कडवट प्रतिक्रियेकडे दुर्लक्ष करतो त्याला माडगूळकरांचे निर्मळ, भाविक, श्रद्धाशील अंतःकरण चट्कन उमगते. लहानशा प्रसंगानेही डोळ्यात पाणी येणारा हा कवी आहे. परवा 'गदिमा' पुस्तकाच्या प्रकाशनाच्या वेळी श्री. ना. सी. फडके यांची कन्या अंजली बोलली, "आमच्या नव्या पिढीला माडगूळकरानी श्रद्धेचे, भक्तिभावाचे देणे दिले आहे. जीवनात श्रद्धा ठेवण्यासारखे काही आहे, उत्कटपणे भक्ती करावी असे काही आहे हे माडगूळकरानी आम्हाला शिकवले. तरुण पिढीवर त्यांचे हे फार मोठे उपकार आहेत." असे ती म्हणाली तेव्हा माडगूळकरांचे डोळे पाण्याने भरले होते ! ...

अण्णा पुण्यात आले आहेत अशी बातमी लागली की पंचवटीत फोन करायचा.

"अण्णा आहेत का ?"

"मीच बोलतोय्"

"मुंबईहून केव्हा आलात ?"

"झाले सहा महिने. का ?"

असे उत्तर मिळाल्यावर काय बोलायचे ही पंचाईतच. चेष्टा, टिंगल ही हाडी-माशी मुरलेली.

"काही नाही. तुमच्याकडं येणार होतो."

"मग ये की."

"तेच येऊ का हेच विचारायसाठी फोन केला."

"माझ्याकडं यायला परवानगी लागते काय ?"

जास्त न बोलता फोन खाली ठेवणे शहाणपणाचे असते.

पंचवटीच्या फाटकात प्रवेश केला की बाहेरच्या व्हरांड्यात ऐसपैस मांडा ठोकलेले अण्णा दिसतात. आपण पायरी चढायच्या आतच 'या, स्टोरीरायटर...' या किंवा अशा शब्दात स्वागत होते. समोर जाऊन कोचावर बसले की थट्टा, चिमटे, सुरू होतात. बहुधा आसपास चार मंडळी बसलेली असतात. कुणावर केव्हा संक्रांत येईल हे सांगता येत नाही. अशा वेळी गप्प बसायचे आणि गंभीर मुद्रेने हळूच दुसरा विषय काढायचा. मग कविराज खुलतात. खऱ्या गप्पागोष्टी सुरू होतात.

अण्णा मनापासून बोलत रहातात. मग कधी ते कुणाची तरी त्याच्या आवाजात नक्कल करतील. कधी एखादी चटका लावणारी आठवण सांगतील. कधी कुणाबद्दल-तरी सात्विकसंतापाने एखादी न्याय्य तक्रार तर्कशुद्ध पद्धतीने मांडतील. नकळत मैफल रंगत जाते. मधेच पुन्हा ही तंद्री भंगते. काहीतरी निमित्त मिळते आणि पुन्हा चिमटे घेण्याची सवय डोके वर काढते.

"काय तुम्ही लोक दिवाळी अंकाला 'हंड्रेड रुपीज' घेता म्हणे."

"देतात संपादक, आम्ही घेतो."

"आम्हाला हंड्रेड रुपीज कुणी देत नाही."

"तुम्हाला हंड्रेडनी काय होणार!"

पण तिकडे दुर्लक्ष करून अण्णा शेजारच्या माणसाला सांगत राहतात—

"ही पोरं आता ऐकत नाहीत. कथेला शंभर रुपये घेईन म्हणून संपादकाना दम देतात. आपली दम द्यायची ताकद नाही. देतील ते घ्यायचं एवढंच आम्हाला ठाऊक."

मग हा हंड्रेड रुपीजचा ठेका त्या बैठकीत एकसारखा वाजतो. गवई जसा मधून-मधून समेवर येतो तसे अण्णा पुन्हापुन्हा त्या समेवर येतात. समुद्रात पोहताना लाट आली की डोके खाली करायचे आणि लाट डोक्यावरून गेली की पुन्हा वर निघायचे, तसे करावे लागते. ती सम हसत हसत सोडून द्यायची आणि पुन्हा आलापांचे सौंदर्य ऐकत रहायचे. अण्णांच्या गप्पातले हे पथ्य ज्याला कळले तो बैठकीत टिकतो. बाकीचे बापडे घाबरून पळ काढतात.


पुरंदऱ्यांची दौलत

श्रीमंत बाजीराव पेशवे / तुळशीबागवाला / खासा फिरंगी मारिला / जिद्द / खासगीवाला / खंडेराव दरेकर / तलवारीचे पाते / पालखी / पुरंदऱ्यांची दौलत

नऊ पेशवेकालीन कथा

ब. मो. पुरंदरे
किंमत : साडेतीन रुपये
राजहंस प्रकाशन

" माडगूळकर हे शब्दांचे 'कमांडर' आहेत. त्यांनी 'फॉल इन्' म्हटल्याबरोबर शब्दांची पलटण घाईघाईने कवितेच्या ओळीत दाखल होते ", असे पु. ल. देशपांडे एकदा म्हणाले होते. अण्णांचे गीतलेखन खरोखरीच असे शीघ्र आहे. सरस्वतीचा यांच्यावर वरदहस्त आहे. मात्र त्यात दैववादाचा, चमत्काराचा भाग फार थोडा, परिश्रमाचाच भाग अधिक, हे जवळच्या माणसांना चांगले ठाऊक आहे. उमेदवारीच्या काळात अण्णानी किती वाचले आहे, किती पठण केले आहे आणि किती ऐकले आहे याची अपरिचिताना कल्पना नसते म्हणून त्याना तसे वाटते. ही जुनी तपश्चर्याच त्यांच्या उपयोगाला पडते. एखाद्या सिद्धीचे रूप घेऊन त्यांच्या लेखणीत उतरते आणि मग मोत्यासारख्या सुंदर अक्षरात झराझरा कल्पना कागदावर उतरत जातात. पुष्कळाना वाटते की, माडगूळकर बैठक घालून बसतात आणि भराभरा नुसते लिहित राहतात. असे नसते. पुष्कळदा योग्य शब्द, उचित कल्पना सापडत नाही म्हणून ते संत्रस्त झालेले मी पाहिले आहेत. उजव्या हातात तंबाखू घेऊन ती डाव्या हाताने चोळीत विचाराच्या तंद्रीत ते कितीतरी वेळ बसून राहतात. कधी तक्क्याला रेलून आढयाकडे पहात कविता शोधीत असतात. एकदा का या कवितेचे अव्यक्त रूप त्यांच्या मनात व्यक्त झाले की मग त्यांना वेळ लागत नाही. भराभरा हे निर्गुण कविताब्रह्म शब्दाशब्दांच्या अवयवातून सगुणरूप धारण करीत जाते. कधी एकदम साक्षात्कार व्हावा असे ते कागदावर क्षणात प्रकटते !

सगळ्या फुलझाडात पारिजातकाचे झाड मला फार आवडते. रंगाची आणि सुगंधाची इतकी उधळण करणारे झाड दुसरे नाही. झाडाची जेवढी सावली तेवढा फुलांचा सडा पडलेला, ताजी, टपोरी आणि एकजात सारखी फुले. श्रावणातल्या पहाटे हा सडा दिसला नाही तर तो श्रावण वाटतच नाही. आणि पहाटेचा रंगही फिका झाल्यासारखा वाटतो. फुलांची एवढी उधळण करून झाड एखाद्या विरक्त योग्याप्रमाणे स्तब्ध उभे असते. त्याच्या अंगाखांद्यावर काही शिल्लक आहे असे दिसत नाही. पण दुसऱ्या दिवशी पहाटे पुन्हा सुगंधाची लाट येते. पुन्हा पहिल्याइतकाच सडा पडलेला असतो. ओंजळ भरून फुले गोळा करावी तर झाड आपल्याकडे बघून हसते आहे असा भास होतो.

मराठी सारस्वताच्या दाराशी माडगूळकरांचा हा पारिजात सदैव बहरलेला आहे. ओंजळ भरून गीतांची सुगंधी फुले खुशाल गोळा करावीत. झाडाला त्याची दादही नाही. सगळी फुले टपोरी, ताजी आणि एकासारखी एक. दुसऱ्या पहाटेला पुन्हा आपला सडा आहेच. जितके खोड जुने तितकी ही फुलांची उधळण मोठी. किती घ्याल ? किती वेचाल ?

मराठीचा हा परिजात वृक्ष असाच सदैव बहरलेला राहू दे !

□ □ □

दिवस उगवून तो आभाळात कासरा दोन कासरे वर आला म्हणजे तो रस्त्याच्या कडेला उभा राहिलेला दिसायचा. नुसता उभा नाही. नजर खाली लावून विडीचं थोटकं हुडकत असलेला. सकाळी उठलं की त्याचं ते काम. उठायचं आणि डोळ चोळत चोळत घरापासून जी सुरुवात करायची ती थेट विश्वनाथच्या दुकानापर्यंत. रस्त्याच्या धुळीत, केरकचऱ्यात विडी लवकर दिसायची नाही. लोकांनी ओढून फेकलेलं उगीच थोडंस थोटूक; कुठंतर पडलेलं. रस्त्याच्या फफूटचात दिसेनासं झालेलं. पण त्याच्या खाणाखुणा त्यास चांगल्या परिचित. कांड्याकरकोच्यानं मासा दिसला की झडप घालून उचलावा तसा तो विडीचं थोटूक दिसलं की उचलत होता आंगठ्याला लगतच्या बोटाचा आधार देऊन. अगदी अचूक दोन बोटाची चोंच करून. एक दोन तीन...असे सापडतील तसे. त्याची साठवण डाव्या



हाताच्या मुठीत. आणि ते आख्खा दिवस ओढत राहायचे. हाताच्या सर्दीनं ओलावलेलं थोटूक लवकर इंगळावर पेटायचं नाही. बऱ्याचदा ते फुकून पेटविण्यातच जळायचं. मग दुसरं पेटवू लागायचा. पेटलंसं दिसलं की तोंडात घालायचं. धूर निघाला तर पेटलं. नाही निघाला तर नाही. पुन्हा खात्री म्हणून बोट लावायचं. पोळलं तर पेटलेलं नाही तर विझलेलं. मनाचं साधं अनुमान. विचाराचा उघडा हिशेब. एव्हाना कुण्या घरवालीनं अंगणात फेकलेला लाल गुंजाळ इंगूळ कोळसा झालेला असे. त्यावर तो फूक मारी. कुठंतर लाल दिसे. त्यावर थोटूक दाबी. नि पुन: फुकू लागे. फरऽऽ फरऽऽ. पण सगळच विझून थंड होई. परत दुसऱ्या इंगळाची वाट. खरं तो मागायचा नाही. पहिलाही मागितलेला नसतो. गप्प चवड्यावर बसून राहायचं. हातात ते जळकं थोटूक तसंच धरलेलं. घरवालीचे जेव्हा लक्षात येई तेव्हा ती घरच्या मुलाना म्हणे "अरे, चुलीतला विस्तु थोडा बाहेर घेऊन ये. घरातलं पोर

# 'तंद्रीपार'

चारुता सागर

विस्तव उलतण्यावर ठेवून बाहेर येई. त्याच्याकडं लांबन फेकून देई. तो बसल्या पायानं तिथंवर सरके. तोंडात थोटूक धरून पाठीची कमान करी. विस्तवावर लावून जोरात ओढी. धुराने गाल फुगल्यावर बोटाच्या चिमटीत थोटूक धरी. नी धूर सोडीत चालू लागे. ते संपले की त्यालाच दुसरे पेटवी. आणि ओढत राही. हातातली सगळी थोटकं संपेपर्यंत ओढत राही. अखंड ओढीत राही.

रस्त्यावर कुठंतरी तो आम्हाला दिसला की आम्ही पोरं ओरडत असू " अरे सायेब, अरे सायेब, तो बघ. तो बघ." आम्ही त्याच्याकडं पळत जायचो चांगले आठ दहा जण. पण जवळ जात नसू. भीती वाटायची. आम्ही सगळी मुलं लहान लहान. त्यानं काय केलं तर? खरं तो काही करायचा नाही. आपल्याच तंद्रीत असायचा. गप्प उभा राहिलेला. स्थितप्रज्ञासारखा. पोरं मात्र खोडकर. त्याला " सायब्या, ए सायब्या " म्हणून चिडवीत. खडे फेकीत, त्यातला एखादा दुसरा खडा लागला म्हणजे तो वर बघे. थोड्या अवधीत आमचा घोळक बराच वाढलेला असे. आम्हाला अवसान येई. आम्ही परत आवाज चढवत ओरडू लागत असू. एका ठेक्यावर आणि लय धरून " सायब्याऽ, सायब्या." तो इकडं तिकडं नजर फिरवी. दिसेल तसला दगड उजव्या हाताने उचली, डाव्या हाताच्या तळव्यावर ठेवी नि मग आमच्याकडं तोंड करून फेकण्याच्या पावित्र्यात हात उगारू राही. तोवर आम्ही कशाच्या तरी आडोशाला पांगलेले असू. त्यानं चपण्या हातानं फेकलेला दगड घंईऽऽऽ करून बंदूकीच्या गोळीसारखा लांब निघून जाई.

त्यानं जन्म घेतला तेव्हा त्याच्या आईनं त्याचं नाव ठेवलं साहेबलाल. पहिल्या दोघींची नावं होती सुभेदार आणि जमादार. म्हणन हा साहेबलाल. पहिल्या दोन पोरा इतकंच देखणं पोरगं. पोरगं वाढलं. मोठं झालं. खरं पण एकेकाचं नशीब असतं ज्याच्या त्याच्या संगं जन्माला आलेलं. पोराला जनरीतीचा परिचयच होईना.

लहानपणी आईबाप निवर्तले, संभाळ केला वडील भावाने. त्याला तो बावा

म्हणायचा. मधला भाऊ फलटणीत. तो रजवर आला की त्याला आपल्या जुन्या विजारी, खमीसं द्यायचा. डोक्याला एक जाड पुठ्ठ्याची साहेबी टोपी. हे पहिलंच जीर्ण. कुठंतरी इगरे. फाटे. हळूहळू त्याच्या एकेक धांदोटया निघत. गळून पडत. पाठ उघडी पडे. मग चार सहा दिवसानं भाऊ दुसरं देई. सायबी विजार, खमीस नि सायबी टोपी. फक्त नसायची काय ती हात फिरवायची साहेबी छडी. नसेना का, पण एवढ्याच पोषाखावरून आम्हाला तो साहेब वाटायचा. आणि तो कुठं दिसला रं दिसला, आम्ही ओरडायचो "आरे सायेब, सायेब. तो बघा." बिळातून उंदीरं बाहेर पडल्यागत पोरं घरातन बाहेर पडत. त्याच्याकडं डोळं तणावून बघत. आणि टाळ्या पिटत मूळच्या आवाजात आपला आवाज अधिक करीत "अरे सायेब. अरे सायेब."

आमच्या विलक्षण कुतूहलचा तो, दिवस डोक्यावर आला की नदीच्या रोखाने वळे. नदी गावापासून एका हाकेवर. तो नीट सरळ नाकाच्या रोखाने चालू लागे. रस्त्याच्या वळणाने वळे. प्रसंगी दगडाला बगल मारी. क्वचित दगडा बोटाची भेट होई. फफोटयानं पांढऱ्या झालेल्या बोटाला लांल गुंजाळ टिळा लागे. पाय एकेक मोजून पडे. जणू अमक्या पावलात त्याची व नदीची भेट होत असावी. या दुपारच्या वेळी आम्ही नदीत डुबक्या मारीत असू. डुबूक डुबूक बेडकासारख्या. धुणाऱ्या बायांच्या अंगावर पाणी उडे. त्या वस्‌कन कावत. मग पाणी तुडवीत लांब वळत असू.

अशा वेळी सायेब नदीत पोचलेला. किनारी उभा राहिलेला. त्याचा क्षणभर विचार. पाणवठ्याच्या खाली जायाचं कां वर ? कुठं तरी जायाला हव. भूक लागलीया. पण माणसं नाहीत असं ठिकाण कसं नितरास !

पात्रात प्रवाहाच्या मधाशाला उभा राहातो. गुढघाभर खळाळत वाहाणारं पाणी. पायाला ओढ लागते. पायाखालाची वाळू घसरत असते. अंतराळी होणारे पाय तो दाबत असतो. गुडघ्यावर विजार भिजत जाते. पाणी पायाना घुसळत असते. मासे वरून खाली खालून वर पळत असतात. मास्यामागे त्याची नजर. काही मासे अंमळशाने त्याच्या पायाभोवती फेर धरतात. त्यांना त्याचा तळपाय दिसतो. नखे दिसतात. काही मासे जवळीक साधून लचके तोडतात. सायबास केवळ बोचल्याचे जाणवत. तो बगळ्यागत खाली मान घालून वाकतो. पाण्यात नजर स्थिरावते. पोहता पोहता आमचे डोळे त्याच्याकडे खिळतात. एकदम तो हाताची झडप पाण्यात घेतो तोच आमच्यातला एक ओरडतो. "अरे धरला बघ. सायेबानं मासा धरला बघ." खरं का खोटं आम्ही प्रत्यय घेतो. पाण्यातून मूठ बाहेर आल्यावर हातात मासा असतो. वळवळतो. फडफडतो. मूठीतन निसटू नये म्हणून धरतो. खसकन दातानं त्याचं मुंडक तोडतो. आणि कचाकचा सबंध मासा चावतो. आमच्या अंगावर काटा सलतो. तोंडं आंबट होतात. कसंच वाटतं. जिवंत मासा

सोंडात घालून खाणे म्हणजे कल्पनाच कसनूसी " अरे खाल्ला बघ. त्यानं ससलाच्या ससला मासा खाल्ला बघ." एकजण ओरडतो. तो पहिला सपवून दुसरा खात असतो. त्याच्या चेहऱ्यावर चविष्ट पदार्थ खाल्याचं समाधान तरळत असत.

प्रत्येक झडपेत त्याला मासा सापडतोच असे नाही. अनेकदा हात रिकामाच बाहेर येई. पुन्हा माश्याला हेरत राही आणि चवाट्यात आला की त्यावर झडप घेई. माणसाच्या वासानं जवळ आलेला मासा त्याच्या पज्यात अडके. एक वेळ पळता साप पकडणं फार सोपं; पण प्रवाहातला मासा पकडणं फार कठीण. परंतु ही चलाखी त्यानं सवयीनं आत्मसात केली होती. माश्यावरची तल्लफ भागायला त्यास दोन तीन तास लागत. एवढ्या वेळात तो पाचपंचवीस मासे हजम करी. पाणवठ्यावर तरण्या ताठ्या बायका. भर जवानीतल्या पोरी. गुडघ्याच्यावर कचकून कासोटा घातल्यानं त्यांच्या जर्द पिवळ्या, नजर हुरहुरून लावणाऱ्या पिंढऱ्या मांड्या. धुताना छातीवरचा घरंगळून गेलेला पदर. सायेब एन पंच-वीसीतला. पण आपल्या तंद्रीत. आणि बायकाही त्याला लाजत नसत. बायका लाजतात फक्त अभिलाषेने पाहाणाऱ्या पुरुषी नजरेला.

तिसरे प्रहरी तो शेताकडे वळे. शेत नदीपासून मैलावर होतं. एवढं अंतर कमी करायला तासभर मोडे. आजूबाजूस शेतं. शेतातून माणसं. पण त्याची दखल कुणी घेत नसे. तोही खाली मान घालून हत्तीवानी डुलत चाललेला असे. शेतातलं एखादं पोरगं आईला म्हणायचं, " आई तो बघ साहेब!"

तो एक क्षण त्याच्याकडे बघे नी म्हणे " असू दे तिकडे."

" अग शेताला चाललाय."

" तूही जाकी त्याच्या मागं". ती वैतागून म्हणे. पोरगं गप्प होई. साहेबाची स्वारी गाडीवाटेनं चाललेली असे. शेतावर त्याचं काम असं काही नाही. फक्त सकाळी भाई गेलेला. मागावून त्याची भाकरी घेऊन भाईची बायको गेलेली. घराला कुलूप.

लांबून भाईची नजर जाते. उघड्या माळावरनं सायेबाची मूर्ती त्याला येत्याली दिसते. तो बायकोला फर्मावितो, " जा गे उसकू रोटी दे जा."

तो म्हणते, " आना तो दे"

तो अर्ध्या हाकेवर येता भाईची हाक जाते. " सायबा, आरे रोटी खा तो." नजदिक उभा राहतो खाली मान घालून. भाई काम थांबवून त्याच्याकडं बघतो. पापणी स्थीर करून म्हणतो, " भूक बीक लगती है क्या नही. कहा घुमत फिरता है?"

बांधाच्या कडेला जांभळीचं झाड. त्याची दाट सावली. त्याखाली झोपडी वजा गवताची कोप. तिथं पाटीखाली ठेवलेली भाकरी त्यास मिळते. तो हातावर घेतो. भाकरीवरची चटणीची भुकटी भुरभुरणाऱ्या वाऱ्यानं उडू नये म्हणून तो तुकडा

पालथा घालून दाबून धरतो. तरी वाळवंटल्या रेतीगत ती उडू लागते. त्याच्या डोळ्यात जाते. तशीच दीड एक भाकरी खातो. खापराच्या केळीवर ठेवलेल्या नारळीच्या बेलटीनं आठ नऊ बेलटी पाणी पोटात ओततो. खिशातला बीडीचा जळका तुकडा काढतो. आगटीतला विस्तव उकरून काढून पेटवितो आणि तिथंच आडोशाला ओढत बसतो.

दिवस मावळून झांझड होते. उरलेले काम भाई उद्यावर सोडतो. घरी निघता निघता आवाज देतो. "अरे सायेब, घरको चल रे." यावर तो दिसायचा नाही. हाक पुन: द्यायची. "अरे, चला क्या!" शब्दाचा कधी त्याने उपयोग केलाच नाही. तो कोपीपुढे उठून उभा राहिलेला दिसायचा. भाई जवळ आला की त्याच्या मागोमाग व्हायचं. भाईची त्यास कधी भीति वाटायची नाही. भाईच तो. पर भाभीला मात्र घाबरायचा. ती त्याच्यावर खिसकायची. खायाला आल्यासारखी धावून यायची. तो कापायचा. मागं सरायचा.

अनेकदा तो दुपारचं शेताकडं जायाचा नाही. नदीतनच माघारी फिरायचा. पोटात गिळलेल्या मास्यावर दुपार निघायची. तिसरे प्रहरी मात्र पोटात वख॰ वखायचं. कुणाच्यातरी दारात भाकरीसाठी बसणार. पण मागायची नाही. घरच्या बायका त्याच्या बसण्याकडं दुर्लक्ष करीत. पुन्हा त्यांच्या विचारात बदल होई. बराच वेळ बसलाय. एवढ्या विचारानं त्यास आर्धी कोर भाकरी वाढीत. भाकरी तिथंच बसून चावायची, आणि पाणी प्यायला नदीला जायचं. भाकरीवाचून पोटात जेवढी पोकळी तेवढी पाण्यानं भरून घ्यायची. ओंजळ त्याची. नदीचं पाणी त्याचं.

सांजचं भाई विचारी, "दुपारको क्यो न आया रं जंगल को? पण तो कसलंच काही बोलायचा नाही. वाचा वापरायचीच नाही. जणू हा त्याचा अलिखीत नियम. पाळ्यात कालविलेली रोटी खायाची, व एका कोपऱ्यात दुमटं व्हायचं. तिथंच


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, अजूनही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**वेस्टर्न इंडिया कं. (वी. एन.) पो. कतरीसराय (गया)**

गुरांचा गोठा. तो एकदा कलंडला म्हणजे सकाळचाच जागा व्हायचा. त्याचं काही एक काम नसायचं तरी भाई तांबडं फुटायला हाका मारायचा, "साहेब, आरे सायेब, आर ऊठो तो. कितना सोनेका!" 'ऊं' करून तिथंच तो वळवळायचा. काळं घोंगडं मेंढरागत हलायचं. घरवाली म्हणायची, "सोया है. सोना दो. उठकर तो क्या करनेवाला है!" मग तो गप्प व्हायचा. नि साहेब निवांत एक डुलकी मारायचा.

एक साल खूप पाऊस पडला. नदीचं तास भरून चाललं. गढूळ पाण्यात मासं फुठलं! सायबाची मोठी पंचायत झाली. हिरव्या मासाची दाताला लागलेली चटक. दात सळसळू लागले. त्याला वाटे दाताखाली काही तरी घ्यावं. कचा कचा चावावं. तो पाण्याकडे बघत उभा राह्याचा. एखादा मासा कुठं नजरंत दिसतो का बघायचा. आणि एकाएकी त्याची नजर वळवळली. निरगुडीच्या फांदीत पाण्यातून वाहून आलेला साप आडकला होता. थंडीने गारठून गेला होता. तो पटकन जवळ झाला. नि झपकन मुंडक्याला पकडलं. तसं तोंडात घालून कच्कन मुंडकं तोडलं. थू करून खाली टाकलं आणि बाकीचा कचा कचा चावून खायाला सुरवात केली. ही गोष्ट त्याच दिवशी गावभर झाली. माझ्या तर अंगावर काटा थरारला. सायेबानं साप खाल्ला. माणूस का कुठं साप खातो? गावातली पोरंसुद्धा मला म्हणाली, "तुला कळालं का? सायेबानं हिरवा साप की रं खाल्ला." साप खाल्यावर माणूस मरतो. सायेब आता सकाळपर्यंत मरणार. तो मरावा अशी माझी इच्छा नव्हती. पण तो मरणार होता. सकाळी उठल्या उठल्या मी बातमी ऐकणार होतो. त्या रात्री मला धड झोपही आली नाही.

सकाळी लवकरच उठलो. कबरस्थानाकडं पाहिलं. माणसं जमली असतील. काही उकरत असतील. कदाचित दफनसुद्धा झालं असेल. पण तसं काहीच दिसलं नाही. कबरस्थानात एकही माणूस नव्हतं. नाही म्हणायला एक म्हैस चरत होती. कडेला एक बाई बसली होती. तासाभरानं न्हाव्याचा भिम्या सांगत आला, "आरं रात्री सायेब मेला नाही. विश्वीनाथाच्या दुकानापुढं बिड्या हुडकतोय. मी चांगलाच हादरलो. साप पचविणारा सायब म्हणजे! मला भीतीच वाटायची.

मी शाळेस जाताना तो कधी दृष्टिस पडे. कधी नाही. नदीवर मात्र नित्य नेम दुपारचा असायचा. पाणवठ्यावरच्या बाजूस धारेत उभा असलेला. अलिअलीकडे त्याच्या अंगावर एका लंगुटीखेरीज काही नव्हतं. सगळी वस्त्रे अवयव गळावीत अशी गळाली होती. लंगूटीपण गळाली असती. परंतु त्याला त्याची संवय झालेली, खाली घसरली की वर ओढायची. एक हात सदा ती सावरण्यात असायचा.

आणि हस्त नक्षत्रातला एक दिवस होता. नदीवरनं तो शेताला गेला. घटकाभरात तावरा दिवस ढगानी झाकूनी गेला. थोडया वेळात पावसाला सुरवात झाली. हात्तीच्या सोंडतन पाणी पडावं असा पाऊस पडू लागला. शिवारात सारं

पाणी खळाळू लागलं. मधी थोडी उघडीप पडली. कुरणाच्या बाजूस उभी राहिलेली गुरं वळवित भाई तसाच घरच्या वाटेला लागला. नी सायेब तिथेच कोपीत बसून राहिला. भाईनं हाक दिली असती " सायेब, घरको चल रे. बरसात खत्तम हुअी." तर त्याच्या मागं हात हालवित तरा तरा आला असता. खरं गुरांच्या नादात तो तसाच आला. त्याला वाटलं उघडीप पडलीया. येईल पाठोपाठ.

पाऊस नदीच्या आकटावर पडतच होता. फिरून तो इकडहि आला. आग्या पाऊस. रानात पाणी मावेना. ढगात काळोख गडद होऊ लागला. दिवस मावळला. दिशा अंधारू लागल्या. सायेब तसल्या पावसात उठला. अगावर पाऊस घेत काकडत गावच्या वाटेला लागला. वाटेतलं गढूळ पाणी खळाळून वाहात होतं. त्यातला एखादा काटा पायात घुसत होता. पुढचं काही दिसत नव्हतं. पण वाट पायातली. चापचत चापचत तुडवीत होता.

नदीचं तास दुतडी भरलं होतं. परुषभर लाटा उसळचा घेत होत्या. असल्या. भरपुरातनं आल्याड पल्याड कोणी जाऊ येऊ शकत नव्हतं. त्यात पाण्याला चढ. लाटांचा आवाज कानावर भेसूर यायचा. सायेब काठावरउभा राहिला. बराच वेळ उभा राहिला. डोळचापुढून पाणी पळत होतं. पायाला लाटा थडकत होत्या. रानातलं पाणी थोडं उन. अन हे नदीतलं पाणी विंचवावानी. हळू हळू तसाच तो प्रवाहात झाला. कडेलाच मांडचाइतकं पाणी लागलं. पुन्हा कमरेइतकं. त्याला आता ओढ लागली. पायाखालची वाळू घसरू लागली. अन् जेव्हा त्यास छाती इतकं पाणी लागले; प्रवाहाच्या वेगाने पायच अंतराळी झाले. दुसऱ्याच क्षणी तो एका लाटेच्या तडाख्यानं अधांतरी झाला नि ओहटीला लागला. लाकडाच्या ओंडक्या-सारखा वाहू लागला. या लाटेवरून त्या लाटेवर हेलकावू लागला. बुडू लागला. नाकातोंडात पाणी जाऊ लागलं. गटकाळचा खाऊ लागला.

गावच्या शिवेला पार खाली चिंचेचं एक भलं मोठं झाड आहे. त्याखाली गावची मसनवट. लोक भांडणात अपशब्द म्हणून त्या झाडाचा उपयोग करतात. काय चिंचखाली न्यायचा आहे काय ! कुणी मेलंच तर माणसं तिथंवर जातात. एरव्ही जनावरही तिथं कुणी फिरकू देत नाही. झाडावर मात्र अनेक जीवजंतु. असल नाग, धामिणी, इजाट, वटवाघळा नि घुबडं. अशी. असू नयेत ती सगळी. चिंचेची एक डहाळी पात्रात लोंबत होती. सायबा नेमका त्यात वसनासारखा आडकला.

पावसाचा रात्रभर डोळा उघडला नाही. सारखी चिटचिट लागून राहिली. हवेत गारठा भरून राहिला. आपलं शरीर वाहात नसून एका फांदीत सापडलंय. त्याला जाणविलं. हळूहळू फांदीला चापचत वर झाला. एक जाडजूड खोड बघून त्याला चिपकून बसला. नि अम्मळशानं ओरडायला सुरवात केली. " बाबाऽऽगा ऽऽ ओ बाबा ऽ ऽ गा ऽ ऽ ऽ ओ ऽ ऽ ऽ. अधून मधून तो रात्रभर ओरडत राहिला. पुराची खळाळ, पावसाची रपरप. कुणाला आवाज ऐकू जातोय ? एका दोघा शेतकऱ्यांच्या

कानावर तो आवाज आला. खरं स्मशानातला आवाज अधिक भेसूर वाटला. ते घोंगडी अधिक दुमटून झोपले.

उजडता उजडता ही बातमी भाईला लागली. तो लगा लगा धावला. रात्रभर तो सायबाच्याच विवंचनेत होता. पुराचं पाणी थोडं ओसरलं होतं. तो चिचंखाली उभा राहिला. आणि वर न्याहाळू लागला. एका उंच गेलेल्या खोडात तो बसला होता. हाताची मिठी फांदीला मारलेली होती. भाईला ते दृश्य बघून पोटात कालवन आल. ओल्या आवाजात हाक मारली. "अरे सायब! नीचे उतर. मैं आया हूँ" सायेबा.

पण तो गप्प गप्प.

"सायेबा, नीचे उतर रे. उतरा क्या" तो उतरता नाहीसा पाहून त्यानं पुन्हा आवाज दिला. "ठेर ठेर वहाँच ठेर. मै आता हू उप्पर. तुझे उतरना नही आयेगा. तू नीचे जायेगा."

तो सरसर झाडावर चढला. जवळ घेतला. "सायब. सायब" आवाज दिला पण सायब बोलेना. तेव्हा त्याचा चेहरा वर करून पाहिला. घाबऱ्या घाबऱ्या अंगाला हात लावला. थंडगार. त्याचा त्यावर विश्वास बसेना. तो त्याला हालवून हाका मारू लागला "सायेब. सायेब. अरे देख तो. मै आया हू, मै तेरा भाई, सायेबा."

पण सायेब त्याच्या हाकेपलीकडे नदीपार झाला होता. आणि भाईसाठी आपला पार्थिव देह ठेवला होता. फांदीची मिठी सोडवून भाईनं तो देह आपल्या कवेत घेतला आणि हालवून हाका मारू लागला "सायेब, आरे सायेब."

□ □ □

लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध!
डोंगरे बालामृत
के. टी. डोंगरे अँण्ड कं. प्रा. लि. मुंबई-१.

# मुक्तिसंग्राम

सुहास भालचंद्र बापट

फार मोठ्या प्रमाणावर झालेल्या सामाजिक अगर राजकीय उलथापालथीपासून मराठी कादंबरी आजतागायतही तशी अलिप्तच राहिलेली दिसते. अश प्रकारच्या घडामोडींशी आमच्या लेखकांचा जिवंत संबंध आलेला नसावा किंवा जे या घडामोडीत असतील त्यांनी आपले अनुभव व्यक्त केले नसावेत किंवा या बाबतीत ते अपुरे पडले असतील. 'रानभूल'सारखा एखादा अपवाद सोडला तर मराठी कादंबरीची ही सामाजिक अलिप्तता मनाला टोचते. परिणामतः मराठी कादंबरीचे 'पुढे जाणे' हे एकांगीच राहिले आहे. (असे होण्याचे कारण? लेखकाची वर्गीय मर्यादा की एकंदरीतच व्यक्तिगत जीवनाला पडलेल्या मर्यादा?)

या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्रातील हरिजन समाजाने केलेल्या बौद्धधर्म स्वीकाराच्या प्रश्नावर लिहिलेली हिं. गो. बनसोडे यांची 'मुक्तिसंग्राम' ही कादंबरी तिच्या विषयाच्या वेगळेपणामुळे मन आकर्षून घेते.

या कादंबरी-लेखनाची पार्श्वभूमी सांगताना लेखक प्रस्तावनेत म्हणतो—

'किर्लोस्करवाडीच्या उगवतीला तीन मैलावर असलेले पलूस गाव...तिथली माणसं देवमाणसं...सारं निरागस, जिव्हाळ्यानं ओथंबलेलं!...पण बौद्धधर्मदीक्षेमुळे पंचक्रोशी खवळून निघाली....एवढ्या मोठ्या समाजाला धर्मांतर का करावे लागत आहे?...जुलूम करणारे जुलूम का करतात? हे गरीब लोक या नव्या मार्गाने काय साधणार?...या प्रश्नांनी मनात खळबळ माजली. ऊर चिबला. हृदय द्रवले. वेडे झाले. बडबडू लागले. या प्रश्नावर लिहिले पाहिजे.' इत्यादि.

यावरून सहज लक्षात येईल की अनावर भावनाप्रक्षोभ आणि वैचारिक संवेदनाशीलता या दोन प्रेरणा या लेखनामागे आहेत, आणि त्याचबरोबर एक प्रकारचा भाबडा दृष्टिकोनही आहे. या प्रेरणांनी आणि दृष्टिकोनाने लेखकाच्या अनुभवाला कोणता आकार दिला आहे हे बघण्यापूर्वी प्रस्तुत विषयावरील सर्वसामान्य लेखनाचे स्वरूप बघणे इष्ट ठरेल.

हिंदुधर्मीय अस्पृश्यांनी केलेल्या धर्मांतरावर उभय बाजूंकडून बरेच लिहिले गेले आहे. क्वचित उभयपक्षांनी अशा लेखनात अतिरेक आणि कडवटपणाचाही आवि-

ष्कार केला आहे. वस्तुतः या प्रश्नाची सर्वांगीण व्यापकता लक्षात घेऊन त्याची समतोल चिकित्सा झाली पाहिजे. असे न होता धर्माभिमान, परंपराभिमान, काहीतरी नवे केल्याच्या अपरिपक्व उत्साहातून जुन्यावर केलेले अदूरदर्शी प्रहार, कायदेबाजपणा इत्यादि चित्रविचित्र वृत्तींचे मिश्रण या प्रश्नावरील वादात आणि लेखनात झालेले दिसते. ज्यावेळी महाराष्ट्र सरकारने नवबौद्धांच्या आर्थिक, शैक्षणिक सवलती काढून घेण्याचा निर्णय घतला होता त्यावेळी झालेली उलटसुलट चर्चा वाचकांच्या स्मरणात असेलच; एकूण असे लेखन अथवा वादविवाद मूळ समस्या सोडविण्याच्या दृष्टीने फारसे फलदायी ठरलेले दिसत नाहीत. असे का होते ?

याचे कारण म्हणजे कोणतीही समस्या जेव्हा सामाजिक पातळीवर चर्चिली जाते तेव्हा एका गोष्टीचे नेहमी विस्मरण होते. ती गोष्ट म्हणजे कोणत्याही प्रश्नामागे उभा असलेला 'माणूस'; अनेक सुसंगती आणि विसंगतींचे गाठोडे बनलेल्या या माणसाच्या प्रकृती आणि विकृती-विशेषांनी निरनिराळ्या काळात निरनिराळी रूपे धारण केली आहेत. पण त्या विशेषांमध्ये काही मूलभूत बदल झाला आहे का ? झाला नसल्यास त्याची कारणे ? आणि महत्त्वाचे म्हणजे त्या विशिष्ट समस्येला या विशेषांनी कोणते रूप दिले आहे ? या प्रश्नांची सामाजिक पातळीवर चर्चा होऊ शकत नाही. कारण एखाद्या समस्येचा किती खोलवर जाऊन विचार करावयाचा याला एक अपरिहार्य अशी सामाजिक मर्यादा पडते.

आणि येथे साहित्याचे कार्य सुरू होते. म्हणजे समस्यांची चर्चा करणे अगर त्यांच्यावर तोडगा शोधणे हे साहित्याचे कार्य नाही. ते त्याने करू नये. केल्यास त्याची वस्तुनिष्ठता व्यक्तीगतच राहील. पण अशा समस्यांच्या संदर्भात माणसाचा अनुभवात्मक शोध घेणे हे अवश्य साहित्याच्या कक्षेत येईल. या शोधातून त्या त्या समस्यांची जिवंत जाणीव करून देणारी, भावनात्मक परिणाम घडविणारी निर्मिती दिसली पाहिजे. अनुभवाने माणूस शिकतो हे म्हणणे साहित्याच्या निर्मिती आणि आस्वाद या दोन्ही प्रक्रियांबाबत खरे आहे. फरक एवढाच की साहित्य माणसालाच माणूस म्हणजे काय हे शिकवते, वाचून दाखवते; मात्र यासाठी उत्कट, व्यापक असा अनुभव हवा व तो पेलण्याची लेखकाची ताकद हवी.

धर्मांतराच्या समस्येच्या संदर्भात 'माणूस' शोधण्याचा प्रयत्न लेखकाने या पुस्तकात केला आहे काय ? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी येते.

## रंगतदार ग्रामीण चित्रपट

जाणवते ते असे की कादंबरीतील सर्व चित्रण स्थिर पातळीवरचे आहे. अगदी हुबेहूब ग्रामीण मराठी चित्रपटासारखे. या चित्रणात एकीकडे हा दलित समाज, त्याची स्थित्यंतरे व दुसरीकडे परंपराग्रस्त, रूढीप्रिय हिंदुसमाज असा संघर्ष यावा हे क्रमप्राप्तच आहे. पण या संघर्षाचे स्वरूप केवळ प्रसंगनिष्ठ, नाट्यमय रहावे, त्या संघर्षातील व्यक्तींची केवळ सुष्ट आणि दुष्ट अशी स्थूल विभागणी व्हावी,

त्यातही सुष्टांचा नायक अपरिहार्यपणे सद्‌गुणसंपन्न व धीरोदात्त असावा, पुन: त्याच्यावर प्रेम करणाऱ्या दोन स्त्रिया असाव्या, त्या प्रेमातही पुन: बहिणीचे प्रेम, प्रेयसीचे प्रेम अशी नावानिशी विभागणी व्हावी, पाटील आणि त्यांच्या साथीदारांच्या रूपाने खलनायकी फळी उभी रहावी – या सर्व गोष्टी मूळ समस्येला एका सांकेतिक कथावस्तूचे रूप चढवतात; आणि परिणाम होतो केवळ एक रंगतदार ग्रामीण चित्रपट पाहिल्याचा.

असे होण्याचे कारण म्हणजे लेखकालाच त्याच्या अनुभवाचे रूप पुरेसे स्पष्ट झालेले नसावे. प्रस्तावनेत लेखकाने अशा घटनांचा त्याच्या मनावर झालेला परिणाम 'खळबळ होणे, ऊर चिंबणे' वगैरे शब्दात व्यक्त केला आहे. साहजिकच वाचकाची किमान अशी अपेक्षा की निदान ही भावनांची खळबळ, भावनावेदना, आपल्या अनुभवाला यावी. तसे होत नाही. एकतर वैचारिक दिशा शोधण्याचा प्रयत्न आणि भावनात्मक संघर्ष यापैकी कशाला प्राधान्य द्यायचे हे निश्चित झालेले नसावे; त्यामुळे कादंबरीत त्यांची सरमिसळ झालेली आहे. व कादंबरीचा अनुभवतोल बिघडला आहे. कादंबरीचा शेवट हा अशा तोल ढळण्याचे महत्त्वाचे उदाहरण आहे. नवबौद्धांवर झालेला, माणुसकीला काळिमा फासणारा अन्याय हा भावनाप्रक्षोभाचा मुख्य विषय असल्यामुळे तिकडे जास्त लक्ष द्यावयास हवे आणि त्याचाच परिणाम वाचकावर झाला पाहिजे; पण कादंबरीतील भावनासंघर्ष मानवी हत्येऐवजी, त्याआधी येणाऱ्या पुरात पोहून जाण्याच्या प्रसंगानीच निगडित झाला आहे. दुसरे कारण म्हणजे लेखकाचाच भाबडा दृष्टिकोन: भाबडेपणा उत्कट असतो पण तो जन्म देतो ढोबळपणाला: तेच या कादंबरीचे झाले आहे.

त्यामुळेच विविध व्यक्तीरेखा, कथानकाची बांधणी, वातावरण निर्मितीक्षमता इ. कादबरीला आवश्यक असणारे गुण लेखकाच्या अंगी असूनसुद्धा ही कादंबरी तिच्यातील समस्येवर अन्याय करते.

[ मुक्तिसंग्राम : हि. गो. बनसोडे : अभिनव प्रकाशन, मुंबई : मूल्य पाच रुपये. ]

# स्मृतिसुगंध

## जयवंत चुनेकर

रंगभूमीवर आपले बहुतांश आयुष्य वेचलेल्या व्यक्ती आपले त्या क्षेत्रातले भले-बुरे अनुभव नोंदवून ठेवीत आहेत, ही एक स्वागतार्ह गोष्टच मानायला हवी. चिंतामणराव कोल्हटकरांची 'बहुरूपी,' बाबूराव पेंढारकरांचे 'चित्र आणि चरित्र'

गणपतराव बोडसांचे ' माझी भूमिका ', भालचंद्र पेंढारकरांचे ' जपून टाक पाऊल जरा ', नानासाहेब चापेकरांचे ' स्मृतिधन ', नानासाहेब फाटकांचेच ' मुखवटयांचे जग ' ही त्या प्रकारची काही पुस्तके.

नुकतेच हातावेगळे केलेले नानासाहेब फाटकांचेच ' स्मृतिसुगंध ' हे ह्याच परंपरेतले आणखी एक पुस्तक.

ह्यापूर्वीच्या नानासाहेबांच्या ' मुखवटयांच्या जगा 'त त्यांनी वृंदावन, सुधाकर, झुंझारराव, हॅम्लेट आदी आपल्या भूमिकांचे अभ्यासपूर्ण विवेचन आणि विश्लेषण केले. ह्या पुस्तकात त्यांच्या स्वतःच्या भूमिकांसंबंधी विवेचन नाही. रंगभूमीवर वावरत असताना त्यांच्या सहवासात ज्या व्यक्ती आल्या त्यांची व्यक्तिचित्रे (की स्मृतिचित्रे ?) प्रामुख्याने त्यांनी रेखाटली आहेत.

" मुखवटयांच्या जगा 'चे स्वरूप उघड उघड एकमार्गी होते. ह्या पुस्तकाचे स्वरूप मात्र बरेचसे संकीर्ण आहे. त्यात गणपतराव जोशी, बापूराव पेंढारकर, केशवराव – दोन्ही, भोसले आणि दाते, – सौ. जयमाला शिलेदार ह्या कलावंतांची व्यक्तिचित्रे आहेत, तसेच डॉ. भालेरावांसारख्या पडद्यामागच्या ' Stalwart 'ला वाहिलेला हृद्य श्रद्धांजलीही आहे; ' मत्स्यगंधा ' नाटकाचे परीक्षण आहे, तसेच रंगभूमीवरील अभिनयादी विविध अंगांसंबंधीच्या प्रश्नांची उत्तरे देण्याचाही यत्न ह्यात आहे; आणि ह्यात आयुष्याच्या उतरणीला लागल्यानंतर आयुष्याचे सिंहावलोकन करणारे तत्त्वचिंतक मनही आहे.

' मराठी रंगभूमीचा अभिनयसम्राट ' म्हणून मानल्या गेलेल्या गणपतराव जोशींबद्दल अलीकडील पिढीला फारशी माहिती नाही. सांगोवांगी ऐकलेल्या गोष्टीवरूनच त्यांचे चित्र काय उभे राहाते तेवढेच. अर्थात् एखाद्या कलावंताच्या अभिनयाचे तो प्रत्यक्ष पाहणाऱ्याने केलेले वर्णन हे अखेर तो न पाहाणाऱ्या वाचकाच्या संदर्भात अनुभूतीचा आभासच निर्माण करते. ते वर्णन जेवढे समर्थ, सच्चे तितकी त्या अनुभूतीची तीव्रता कमी – अधिक. नानासाहेब स्वतः एक श्रेष्ठ नट असल्यामुळे, एका नटाच्या दृष्टीने त्यातही त्यांच्या उमेदवारीच्या काळात त्यांनी एका विद्यार्थ्याच्या भूमिकेतून गणपतरावांचा अभिनय पाहिला असल्याने, त्यांनी केलेले वर्णन प्रत्ययकारी झाले आहे. अखेर अभिनयात शब्दांच्या पलीकडे जाण्याचे फार मोठे सामर्थ्य असल्याने, तो शब्दात पकडण्याला एक अपरिहार्य मर्यादा आड आली आहेच. पण तरीही ' राणा भीमदेव 'मधील भीमदेव, ' पमारत्न ' (पन्ना रत्न ?') मधील महाबळसिंह किंवा ' माझी बहीण 'मधील कोपनशील ह्या गणपतरावांच्या भूमिकांमधील त्यांच्या आवाजाच्या किमयेचे नानासाहेबांनी केलेले वर्णन प्रत्ययकारी वाटते ह्यात शंका नाही. तीच गोष्ट ' पानिपतचा मुकाबला ' ह्या नाटकातील भाऊसाहेबांच्या भूमिकेबद्दल. ही वर्णने वाचताना अंगावर रोमांच उभे राहातात. (पृ. ६-७) हे नानासाहेबांचे यश म्हणायला हवे.

‘असा मालक मिळणार नाही’ ह्या छोटेखानी लेखात ‘ललितकले’चे तिच्या उत्तर–कालातील मालक बापूराव पेंढारकर यांच्या मालक म्हणून उदारचरित व्यक्तिमत्त्वाचे दिग्दर्शन आहे.

केशवराव भोसल्यांबद्दल नानासाहेबांनी सांगितलेल्या आठवणीत फारसे नवे काही नाही. त्या ह्यापूर्वीही ‘स्मृतिधन’ सारख्या पुस्तकात येऊन गेल्या आहेत. स्वतः नानासाहेबांवर केशवरावांच्या व्यक्तिमत्त्वाचे उमटलेले ठसे एवढेच ह्याचे स्वरूप आहे. नानासाहेब काही शैलीदार नव्हेत; तशी त्यांच्या लेखनात अपेक्षाही नाही. पण गणपतराव, केशवराव यांच्याबद्दलच्या आठवणी सांगताना ते सहजपणानें एखाद दुसरे सुंदर वाक्य लिहून जातात. केशव–गंधर्व संयुक्त प्रयोगाचे आपल्या मनावर झालेल्या संस्काराचे वर्णन त्यांनी एकाच वाक्यात चांगले टिपले आहे. ‘वसंतऋतूत कोकिळेच्या मधुर पंचम स्वरांचा आस्वाद घेतल्यानंतर ह्याच ऋतूत कधीकधी येणाऱ्या वळवाच्या पावसाच्या वेळी जी दोघांची गंभीर घनगर्जना आपण ऐकतो व चकीत होऊन त्याही गर्जनेत स्वरांचे सौंदर्य अनुभवतो, तसाच काहीसा प्रकार नाटकाचे वेळी माझ्या मनावर सारखा होत होता.’ (पृ. ३३). केशवरावांना ‘संयुक्त मानापमाना’च्या यशाने आलेल्या उन्मादात (= धुंदीत) त्यांनी “जीवनातली आत्यंतिक इच्छा पूर्ण झाली, आता मी जीव देतो,” असे काढलेले उद्‌गार (पृ. ३५) आणि त्यानंतर दोन महिन्यांनी झालेला त्यांचा अंत ह्यांचा संबंध लावतांना ‘जगण्यासारखे होते तोपर्यंतच केशवराव जगले,’ असे फाटकांप्रमाणे वाचकांच्या मनातही येऊन जाईल आणि मन हळहळेल.

नटश्रेष्ठ दात्यांच्या नाटकातल्या भूमिका आजच्या पिढीतल्या प्रेक्षकांनी पाहिल्या असतील, नसतील; पण त्यांच्या चित्रपटातील भूमिकांवरून दात्यांच्या अभिनयाचा दर्जा केवढा उंच आहे, त्याची कल्पना यायला हरकत नाही. नानासाहेबांनी दात्यांवरच्या लेखात त्यांच्या (दात्यांच्या) नाट्यकर्तृत्वाचे वेधक दर्शन घडविले आहे. ह्यातही गणपतराव जोश्यांच्या आवाजाप्रमाणे दात्यांचा आवाजही कसा किमयागार आहे, याचे विवेचन केले आहे. दात्यांच्या मुद्राभिनयाचे आणि डोळ्यांचा अभिनयासाठी वापर करण्याचे कौशल्य किती अप्रतिम आहे, ह्याचे ‘अमृतमंथन’ चित्रपटातला त्यांचा ‘राजगुरु’ पाहाणाऱ्याने अनुभवलेच असेल. नानासाहेबांनी दात्यांच्या अभिनयाचे केलेले वर्णन मूळातूनच पाहाण्यासारखे आहे. त्यातही राम (‘सत्त्वपरीक्षा’), औरंगजेब, (‘आग्र्याहून सुटका’) ह्या त्यांच्या भूमिकांचे विवेचन पाहावे. (पृ. ४२-४३) ते सारे वाचल्यानंतर नानासाहेबांनी त्यांच्यासाठी वापरलेले ‘टॅलेन्टेड अॅक्टर’ हे शब्द किती योग्य आहेत ते पटावे.

‘माझी मानसकन्या’ हा सौ. जयमालाबाईंवरचा लेख नानासाहेबांनी मोठ्या जिव्हाळ्याने लिहिला आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वातून दिसणारे एका कुलस्त्रीचे दर्शन नानासाहेबांनी थोडक्यात पण ठाशीवपणें घडवले आहे.

रशियन राज्यक्रांतीविषयी प्रचारात्मक
साहित्य विपुल आहे. उजेडात आलेल्या
नवीन माहितीच्या आधारे लिहिलेला
मराठीतील हा मात्र एकमेव ग्रंथ आहे.

# व्होल्गा जेव्हा लाल होते

प्रस्तावना : ना. ग. गोरे

लेखक : वि. स. वाळिंबे

मूल्य : अठरा रुपये

राजहंस प्रकाशन : १०२५ सदाशिव पेठ : पुणे ३०

पण ह्या सबंध पुस्तकात नानासाहेब जर अधिक कुणाच्या आठवणीत रंगले असतील, तर ते डॉ. भालेरावांच्या. डॉक्टरांच्या रसिकतेचे, सहृदयतेचे नानासाहेबांनी अतिशय मार्मिकतेने दर्शन घडविले आहे. उदा. मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक उत्सवात संघाने सादर केलेल्या ' शारदे 'त चितोबा गुरव ह्या वयोवृद्ध गुणी नटाने अप्रतिम भूमिका केली. संघाची बक्षिसे देण्याची पद्धत नसल्याने, डॉक्टरांनीं नटमंडळींनाच त्यासाठी अवाहन केले व चितोबांना सुमारे हजार बाराशे रुपयांची थैली अर्पण केली. (पृ. ७३–६४) दुसरे उदाहरण : नानासाहेबांनी ' भाऊबंदकी'तील राघोबासाठी (= नानांसाठी) करवून घतलेल्या नवीन वेषभूषेबाबत. (पृ. ६९.) लेखाच्या अखेरीस नोंदलेल्या प्रसंगाने सबध लेखाला एक करणरम्य झालर जोडली गेली आहे. एका कृतज्ञ मनाने, गहिवरून दुसऱ्या एका रगभूमीच्या श्रेष्ठ पथिकाला वाहिलेली ही श्रद्धांजलीच आहे जणु !

'मत्स्यगंधा ' हे कानेटकरांच्या नाटकाचे एका अनुभवी, श्रेष्ठ नटाच्या दृष्टिकोनातून केलेले विवेचन. नाटकाचे कथानक विस्ताराने सांगताना जाता जाता काही सूचना केल्या आहेत, एवढेच. वाङ्मयाच्या सामीक्षकापेक्षा, एका कलावंताने केलेले नाटकाच्या कथावस्तूचे वर्णन एवढेच त्याचे निराळपण मानता येईल, पण एकापरी काही नवा दृष्टिकोन यात शोधणाऱ्या वाचकाचा अपेक्षाभंगच होईल.

नानासाहेबांच्या ह्या पुस्तकातले एक अवश्य उल्लेख करायला हवा, असे प्रकरण म्हणजे ' काही प्रश्न आणि उत्तरे ' हा रंगभूमीचा अभिनय, नाट्य–लेखन, संगीत इत्यादि विविध अंगांचा विचार करणारा लेख. त्यातही प्रामुख्याने अभिनयाच्या अंगाचा. आणि नानासाहेब अखेरीस नट आहेत, हे पाहाता त्याच अंगाचा विचार अधिक व्हावा, हे प्रस्तुतच आहे. ह्या लेखातील त्यांची उत्तरे सर्वांनाच पटतील असे नाही. स्वतः फाटकांचाही तसा आग्रह नसावा. पण तरीही त्यामागे एक चिंतनशील विचारी मन उभे आहे. त्यामागे काही शोध घेण्याची वृत्ती आहे, प्रामाणिकपणा आहे ह्याची जाणीव मात्र निश्चितच होते. किंबहुना पुस्तकातल्या अखेरच्या तिन्ही लेखांमध्ये नानासाहेबांच्या वृत्तीचे हे वैशिष्टच प्रकर्षाने जाणवावे. ह्या साऱ्या मुक्तचिंतनामागे तत्त्ववेत्त्याचे मन आहे. आयुष्याच्या उताराला सवेदनाशील मनाची अशीच अवस्था होत असावी काय ?

' विचार मंथना 'च्या अखेरीस व्यक्त झालेले विचार निश्चितच चिन्त्य आहेत. आणि नानासाहेबांसारख्या आपले आयुष्य ह्या क्षेत्रात व्यतीत करणाऱ्या एका विचारी कलावंताचा अनुभव त्यामागे आहे, ह्यामुळेच त्याचे महत्त्व अधिक जाणवावे.

ह्या पुस्तकातले बहुतांश लेखन हे आठवणींना धरूनच केलेले असल्याने, त्याचे ' स्मृतिसुगंध ' हे नाव यथार्थ वाटते. पण त्यामुळेच त्यात काही उणीवाही राहून गेल्या आहेत.

गणपतराव जोश्यांवरील लेख '' अमृत 'च्या १९५४ च्या दिवाळी अंकात आला

होता; १९४४ च्या नव्हे, हा मुद्रणदोष असेल तर गोष्ट वेगळी. नानासाहेब चापेकरांबद्दलचा उल्लेखही, त्यांना 'ललित कले'त देण्यात येणाऱ्या पगाराबद्दल, स्वतः चापेकरांनी सांगितल्यापेक्षा ('स्मृतिधन') भिन्न आहे. नानासाहेब फाटकही एकदा त्यांना (चापेकरांना) २०० रु. (पृ. ३१) व पुढे २८० रु. पगारावर (पृ. ९६) कंपनीत ठेवून घेतले, असे सांगतात.

पुस्तकाची छपाई करतानाही अधिक काळजी घेतली असती, तर त्यातले ढोबळ मुद्रण दोषतरी टाळणे अशक्य नव्हते. (हा दोष प्रकाशकांचा?) त्यामुळे 'चापेकर' हे योग्य नाव 'चाफेकर' असे, किंवा 'शिरवाडकर'चे 'शिरवाडर' असेही झाले नसते. खेरीज संकलनाचा म्हणून अखेरचा हात फिरला असता, तर लेखांची मूळ प्रसिद्धी स्थळे–दिनांक देणे जरूर आहे, हे लक्षात आले असते.

पण ह्या उणीवांमुळे ग्रंथाला कमीपणा येतो, असे नाही. पुस्तक वाचून झाल्यावर अखेर ठसा उमटतो, तो एका सुसंस्कृत, अनुभवसंपन्न, शोधक व्यक्तिमत्त्वाचा!

[ स्मृतिसुगंध : नानासाहेब फाटक : पृ. १८० : सोमैय्या पब्लिकेशन्स प्रा. लि., मुंबई : मल्य रु. ७·५० ]


◻ ◻ ◻


## पुरंदऱ्यांची नौबत

बुलंद बुरूज / हूल / कोजागिरीची रात्र / पंत
फोंडा! फोंडा! / नावजी बलकवडे
पिऱ्या बेरड / इमान

आठ शिवकालीन कथा

ब. मो. पुरंदरे
किंमत : साडेतीन रुपये
राजहंस प्रकाशन



# सुखदेव

४७ वर्षापूर्वीची ही एक क्षुल्लक घटना !

लायलपूरच्या स्टेशनात लाहोरकड जाणाऱ्या गाडीची वाट पहात उभ्या असलेल्या गर्दीत एक १६-१७ वर्षांचा कॉलेजकुमार उभा होता. फलाट दणाणत गाडी आली अन् प्रवासी बोचकी सांभाळून जागा शोधू लगाले. ह्या मुलाने पाहिले की एका डब्यात सत्ताधारी ब्रिटिशांचे काही सैनिक दरवाजा अडवून बसले होते व कुणाही प्रवाशाला डबा रिझर्व आहे असे सांगून हुसकावून लावत होते. त्या काळात इंग्रज सैनिकांच्या वाटला कोण बापडा जाणार! डबा बराचसा रिकामा दिसत असूनही प्रवासी हिरमुसले होऊन पुढे जात होते. ह्या पोराला कसला झटका आला कोण जाण ! तो विजेसारखा धावला व सैनिकाला लायाडत आत शिरून स्वस्थपणे एका रिकाम्या बाकावर बसला. सैनिक जवान क्षणभर गोंधळले; पण सत्तेची आठवण होताच त्याला धाकदपटशा दाखवून बाहेर जायला सांगू लागले. हा मुलगा शांतपणे म्हणाला की मी आपणहून जाणार नाही. तुमची हिम्मत असली तर बाहेर हाकलून दाखवा !

एका काळचा गुलाम पोराचे ते धीरगंभीर आव्हान स्वीकारण त्या साम्राज्यशाहीच्या सशस्त्र टोळक्याला कितीसे कठीण होते. त्यांनी आपल्या बटांखाली त्याला

वसंत पोतदार

हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मीची

# तिसरी आहुती

तुडवून काढले व अर्धमेला झाल्यावर उचलून फलाटावर भिरकावून दिले. पोर शुद्धीवर आले तेव्हा गाडी निघून गेली होती. सुजलेले, रक्ताळलेले शरीर, पण त्यावर शुश्रूषा न करता दुसऱ्या गाडीने ते मूल लाहोरला आले. पंजाब नॅशनल कॉलेजच्या वसतीगृहात त्याला अशा जखमी, विकल व भेसूर अवस्थेत पाहून त्याच्या मित्रांना धक्काच बसला.

१९२२-२३ चा तो काळ. महात्माजींच्या असहयोगात सारा भारत सामील झालेला. १९२१ चे आंदोलन महात्माजींचे भारतातील पहिलेच ठळक कार्य. आंदोलन सुरू झाल्यावर काही कालानंतर त्यांनी हे पुढे टाकलेले पाऊल पुन्हा पूर्ववत मागे घेतले व ताकतवर ब्रिटिश सरकारला 'होशीयार' करून मौनव्रत धारण करते झाले. गुलाम भारतातले तरुण रक्त मात्र गांधीमार्गापासून प्रेरणा घेऊन सळसळत होते. शस्त्रसंन्यास, सत्याग्रह ह्या नव्या प्रयोगांचे संमोहन मोठमोठ्या विचारवंत पुढाऱ्यांना पडले होते तिथे मिसरूड फुटलेल्या तरुणांचे काय विचारता?

पण वर वर्णिलेला तो तरुण महात्माजींच्या तपःसाधनेची परीक्षा पहाणारा होता. बारा वर्षाचा असतानाच त्याच्या प्रांतात अमृतसरला जलीयांवाला बागेत उडालेली रक्ताची कारंजी त्याने स्वतः पाहिली नसली तरी वर्णने ऐकली होती व

त्याप्रसंगी मार्शल लॉ मध्ये त्याचे काका लाला अचितराम पकडले गेले असताना तो त्यांना जेलमध्ये भेटायलाही गेला होता. देशभक्तीचे बीज तर पक्के पेरले गेले होते; पण हजारो माणसांना अमृतसरला कसायाच्या निर्घृणतेने चिरडून टाकणारी पाशवी सत्ता सत्याग्रहाने पश्चात्तापदग्ध होऊन भारतातून आपणहून निघून जाईल ह्यावर त्याचे बालमन विश्वास ठेवायला तयार नव्हते. पण त्याचे सर्व साथीदार गांधीवादावर श्रद्धा ठेवणारे असल्याने त्यानेही प्रथमतः सच्चाईने आंदोलनात भाग घेतला. पुढे महात्माजींनी आंदोलन अकस्मात मागे घेतल्याने त्याच्या श्रद्धेला तडा गेला. तरीही सत्याग्रहाचा प्रयोग करून अनुभव मिळवावा व मगच निश्चित निर्णय घ्यावा असे ठरवूनच त्याने सैनिकांच्या डब्यात प्रवेश केला होता. सत्याग्रहाचे खरपूस बक्षीस मिळाल्यावर त्याने वसतीगृहातील विद्यार्थी-मित्रांसमोर गांधीमार्गाचे जे विश्लेषण केले ते खरोखरीच त्याच्या वयाच्या मानाने अत्यंत अचूक व तर्कशुद्ध होते.

तो म्हणाला की, " राष्ट्रस्वातंत्र्य सोडाच; गाडीत जागा मिळविण्यासाठी तरी सत्याग्रहाचा मार्ग साफल्य मिळवून देऊ शकतो का हे मी अजमावून पहाण्यासाठी हा प्रयोग केला." पुढे तो म्हणाला, " मानवधर्माच्या स्वाभाविक प्रवृत्ती म्हणजे भय व आत्मरक्षा ! मग आत्महनन ज्याने होते तो सत्याग्रहाचा मार्ग मानवी प्रकृती व प्रवृत्तीसाठी अस्वाभाविकच नाही का ठरणार ? सत्याग्रहाचं ध्येय म्हणजेच आत्महननाचं ध्येय फारच थोडया माणसांकडून निष्ठापूर्वक ह्या ध्येयपालनाच्या अस्वाभाविक व असाधारण मार्गक्रमणाची अपेक्षा केली जाऊ शकते; अन् सर्वसाधारण जनतेचा आदर अन् सहानुभूती पाठीशी असली तरच ही इनीगिनी माणसं ही अपेक्षापूर्ती करू शकतात. मला असं वाटतं, गांधीजींचंही हेच मत असावं. जेव्हा त्यांनी सामुहिक सत्याग्रह सुरू केला अन् तो अक्रियात्मक स्वरूपाचा ठरला असं त्यांना उमजळं तेव्हा त्यांनी त्याचं सामूहिक स्वरूप बदलून लगेच त्याला व्यक्तीगत रूप दिलं व स्वतः एकटयाने आणि काही थोडया निष्ठावान चेल्यांपुरता मर्यादित सत्याग्रह त्यांनी चालू ठेवला."

एकाही गोऱ्या अधिकाऱ्याचा अगर घरभेद्या फितुराचा वध न करताही ब्रिटिश न्यायालयाने ज्याला हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मीचा सर्वश्रेष्ठ संघटक, प्रचारप्रमुख व एकूण एक कटामागील मेंदू (ब्रेन बिहाइंड द कॉन्स्पीरसी) म्हणून फाशीची सजा फर्मावली तो सुखदेव म्हणजेच ह्या मुलगा होय.

सुखदेवांचे स्वभावचित्रण करणे फार मुष्कीलीचे काम आहे. त्यांची देशभक्ती संशयातीत पण स्वभाव हेकेखोर, निर्णयशक्ती प्रखर, दिलाने अतिशय उदार पण पेहरावाने अत्यंत गबाळे. गोष्ट पटली आहे तोपर्यंत इमानी पण पटूनही ती व्यवहारात दुबळी दिसली की तिचा अव्हेर करणे या त्यांच्या गुण अगर दोषविशेषांमुळे कित्ये कवेळा त्यांच्या साथीदारांसाठी सुखदेव म्हणजे एक आफत वाटत होती.

न्यायालयात तर त्यांनी स्वतः केलेल्या कृत्याचा कबुलीजबाब दिला तेव्हा भगतसिंगासकट सर्वच क्रांतीकारकांची निराशा झाली. पिन्नक प्रवृत्तीचा, सनकी मनोवृत्तीचा आणि तापट स्वभावाचा सुखदेव नीटपणे समजलाच नाही अशी कबुली त्यांच्या कित्येक सहकाऱ्यांनीच दिली आहे. पण त्यामुळे तो कातडीबचाऊ व फासाच्या विळख्यातून मुक्त होऊ पहाणारा देशभक्त होता असा गैरसमज करून घेऊन लेखन करणाऱ्यांनी स्वतःला आणि आपल्या वाचकवर्गाला कृतघ्नतेचेच धडे दिले आहेत. सुखदेवांची सफाई वेगळ्याने करून देण्याऐवजी त्यांचे जीवन जसे होते तसेच मी सांगणार आहे. वाचकांना त्यांच्या निखळ देशभक्तीची, आपल्या सहकाऱ्यांसाठी जीव तोडून झटणाऱ्या नायकाची, कुशल संघटनकार्याची व विलक्षण बुद्धिमत्तेची यथार्थ कल्पना येईलच. राजगुरूंची 'झोप' जशी क्रांतीकार्यात कधीच बाधक ठरली नाही तसाच सुखदेवांचा 'झोक' (एककल्लीपणा) बाधक ठरला नाही.

पंजाबात लायलपूर येथे सुखदेवांचा जन्म झाला तेव्हा त्यांच्या वडलांचा स्वर्गवास होऊन तीन महिने झाले होते. सुखदेव आईचे संस्कार व काका अचितराम ह्यांच्या छत्राखाली वाढले. त्यांनी लायलपूरच्या घनपतमल आर्य शाळेत सातवी पर्यंतचे शिक्षण घेतले व सनातनधर्म हायस्कूलातून १९२२ साली ते दुसऱ्या वर्गात मॅट्रिक पास झाले. त्यांचे कुटुंब आर्यसमाजी असल्याने काकाने त्यांना डी. ए. व्ही. कॉलेज-लाहोर येथे शिक्षण घेण्यास सांगितले. काका त्यावेळी कारागृहात होते. जलीयांवाला हत्याकांडात मार्शल लॉ भंग करण्याच्या आरोपावरून त्यांना अटक झाली होती. परंतु काकांना अत्यंत आदर देणाऱ्या ह्या एकांडचा शिलेदाराने ही आज्ञा धुडकावून लावली व लाहोरच्याच पंजाब नॅशनल कॉलेजात नाव घातले. शहीद स्वर्गात जाऊन एकत्र येत नसतात, ते पृथ्वीवरूनच एकोप्याने हातात हात घालून जात असतात ह्याची काकांना कल्पना नव्हती. कारण सुखदेव नॅशनल कॉलेजात गेले तेव्हा भगतसिंग त्याच कॉलेजात शिकत होते व त्यांची मैत्री तेथेच इतकी दाट झाली की ती आजपर्यंत आमच्या स्मृतीत अमर झाली आहे.

आजचे प्रसिद्ध हिंदी लेखक व आझादानंतरचे पार्टीप्रमुख श्री. यशपाल त्याच कॉलेजात होते व श्री. जयचंद्र विद्यालंकार प्राध्यापक होते. सुखदेवांच्या क्रांतीजीवनाला सुरुवात झाली ती इथूनच. देशभक्तीचा सूर लागला तो इथूनच.

प्रथम हा सूर प्रार्थनेचा होता, तुतारीचा नव्हता. प्रा. जयचन्द्रांसारख्या देशभक्ताने विद्यार्थ्यांना गांधीप्रणीत सत्याग्रहाची प्रेरणा दिली. भगतसिंग, यशपाल, सुखदेव आंदोलनाचे अग्रेसर होऊन इतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करू लागले. पण सुखदेव एकूणच झक्की. त्यांचा चुलतभाऊ जयदेव व यशपाल मध्यरात्रीपर्यंत अभ्यास करीत; पण सुखदेवांचा पत्ता नसे.

ज्यावेळी जे सुचेल व पटेल ते अंगीकारायचे व त्यातच अतिरेकी श्रद्धा ठेवायची ही त्यांची जन्मजात संवय! कॉलेजात कुणीतरी सांगितले अन् ह्यांना पटले की,

'शरीरसंपदा उत्तम असली तरच राष्ट्रकार्य शक्य आहे, अन्यथा नाही. झाले.' लगेच त्यांच्यात अंतर्बाह्य पालट झाला. अखाडेबाजी, जोर-बैठका व मॉलीश तास दोन तास करून ते इतर कामे करू शकत होते. पण सुखदेवांनी सर्वप्रथम डोक्याच्या केसांना फाटा देऊन गोटा केला. लुंगी व पायघोळ सदरा विकत आणला व हात इतके रूंदाऊन ह्या पोशाखात चालू लागले की जणू छाती रुंदावल्याने त्यांना हात जवळ करणेच अशक्य. चोवीस तास व्यायामाच्या गोष्टी व हा पेहराव. इतरां-बरोबर संध्याकाळचे फिरायला निघाले तरी ह्याच पैलवानी पोशाखात. इतर छानछोक्या कॉलेजकुमारांना हे असह्य होई. ते ह्या गड्याला सांगायला गेले तर हा म्हणे, "तुम्हे मेरे साथ चलनेमें शर्म लगती है तो लो मैं रस्तेके उस तरफ-से चलता हूँ।" असे तिरसटासारखे उत्तर देऊन हे खलीफा एकटेच निघून जात.

अशा वागणुकीला सुखदेव विचारस्वातंत्र्य म्हणत असत. हे स्वातंत्र्य तें जितक्या जिद्दीने पाळीत तितक्याच निष्ठेने इतरांनी पाळावे ह्या वर आग्रह.

पैलवानीवर पुस्तके वाचताना ह्यांना 'जुजुत्सू' ह्या जपानी युद्धकलेचे ज्ञान मिळाले. तें असे की, मुष्टीयुद्धाच्या सुरुवातीलाच जर प्रतिस्पर्ध्याच्या नाकावर धाडकन् ठोसा हाणला तर काही काळासाठी कितीही बळकट गडी शुद्ध हरपतो. सुखदेवांनी 'जुजुत्सू' आत्मसात केले पण त्यांच्या युयुत्सू वृत्तीला कुणाच्या तरी नाकावर ठोसा मारून प्रात्यक्षिक करून पाहण्याचे वेड लागले होते. ते त्यावेळी गांधीमार्गी होते. गांधींच्या आदेशानुसार प्रत्येक महीन्याच्या १८ तारखेला ते कड-कडीत उपास करीत होते.

अशाच एका १८ तारखेच्या संध्याकाळी लुंगी लाऊन कुणा बलदंड माणसाच्या शोधासाठी ते निघाले. उपासाने शरीर क्षीण झाले होते; पण हस्तगत केलेल्या कलेचे प्रात्यक्षिक करून पाहण्याचा उत्साह दांडगा होता. बराच वेळ फिरूनही कुणी भक्कम दांडगट सापडेना. शेवटी एक टग्या गावला. तो भरकटल्यासारखा देह सावरीत ह्यांच्या पुढ्यातून जात असतानाच ह्यांनी असा ठोसा हाणला की तो आडदांड गडी ह्यांच्या 'जुजुत्सू'ने जर्जर होऊन रस्त्यावर आपटला. प्रात्यक्षिक झाले. पावती मिळाली तर आता धूम ठोकायला काहीच हरकत नव्हती. पण तो पडला इतकी पावती सुखदेवांना पुरेशी नव्हती. त्याची भोवळ किती वेळ टिकते, नाकातून रक्त निघते का, एक-दोन दात पडतात का वगैरे चिकित्सा करायची असल्याने हे त्याच्या तोंडापर्यंत वाकून त्याच्या हावभावांचे व हालचालींचे निरीक्षण करू लागले. दोन-पाच मिनिटांनी तो शुद्धीवर आला व अकस्मात चढाई करणारा आपला शत्रू आपल्या अंगावरच वाकून उभा आहे हे पाहिल्यावर, शत्रूने दुसरा वार करण्यापूर्वीच त्याची मरम्मत केलेली बरी म्हणून त्याने सुखदेवांचे हात धरून त्यांना आपटले व बेदम पिटाई सुरू केली. इतर लोकांनी पाहिले की एक राकट इसम एका पोरसवदा दिसणाऱ्याला हाणीत आहे व ते कोवळे पोर चुपचाप मार

खात उभे आहे म्हणून त्यांनी मधे पडून मारामारी थांबवली. दांडग्या माणसाने वाटसरू पंचांना आपली सफाई दिली की, काही कारण नसताना, पूर्वशत्रुत्व नसताना ह्या पोराने मला ठोसा हाणला. सुखदेवांना हा प्रकार विचारता त्यांनी फक्त इतकेच सांगितले,

"पहले मैंने मारा, फिर उसने मारा। ठीक ही तो है। किसीकी भी गलती नही है।"

उपासाने व माराने विव्हल झालेल्या सुखदेवांशी यशपाल वगैरेही वाद घालू शकले नाहीत. सुखदेवांनी असे सांगितले की, "मी माझ्या स्वतंत्र बुद्धीने वागलो तर त्यांनी त्यांच्या स्वतंत्र बुद्धीने का वागू नये?"

ह्यावर कोण अन् काय बोलणार!

ह्या प्रसंगानंतरच सुरुवातीला सांगितलेली घटना घडली अन् सुखदेवांची अहिंसा-भक्ती संपुष्टात आली. भगतसिंगांचे तर घराणेच क्रांतीकारकांचे होते. त्यांची व त्याच कॉलेजात दोन वर्षे पुढे शिकत असलेल्या भगवतीचरण व्होरा यांची ओळख झाली व क्रांतीचा एक नवा मार्ग व्होरांकडून भगत व सुखदेवला सापडला. रशिया-प्रणीत समाजवादी क्रांतीचा मार्ग. हि. सो. रि. आर्मीचे सगळेच सभासद अगदी आझाद-राजगुरूंपासून-मार्क्स-लेनीनभक्त व कम्युनिस्ट असले तरी आज ते असते तर सध्याच्या भारतीय कम्युनिस्टांशी त्यांचे सूत जमणे कठीण होते. आजचे कम्युनिस्ट भगतसिंगजयंती व पुण्यतिथी साजरी करतात; पण महात्माजींच्या नावाचे जे भांडवल खादीधारी गेली बावीस वर्षे करीत आहेत तसे भगतसिंगांचे कम्युनिस्ट करीत नाहीत ही त्यांची भगतच्या आत्म्यावर कृपाच म्हणायची! त्या दृष्टीने भगतसिंग गांधींच्या इतपत महात्मा झाला नाही हे सुद्धा त्याने स्वत:वर केलेले उपकारच म्हणायचे. भगवती, भगत, सुखदेव ह्यांनी दिल्ली व उत्तर प्रदेशच्या क्रांतीदलांशी संबंध जोडण्याची खटपट चालू केली. श्री. लाला लजपत-रायांनी वडीलांच्या नांवे 'द्वारकादास पुस्तकालय' हे ग्रंथालय चालवले होते. तेथे समाजवादावर अनेक पुस्तके ह्यांना मिळाली. तिघेही बुद्धीने तल्लख. भगवतीभाई वयाने मोठे असल्याने त्यांचे वाचन जास्त होतेच. भगतसिंग फासावर चढेपर्यंत पुस्तक वाचीत होते; पण सुखदेव बैठक मारून कधीच वाचन करीत नसत. स्मृती अति तीक्ष्ण असल्याने वाचलेले-ऐकलेले त्यांच्या पक्के लक्षात रहात असे. भगत खालो-खाल समाजवादावर सुखदेवांचेच प्रभुत्व होते हे सत्य पार्टीतील कुणाही सदस्याने नाकारले नाही.

ह्या तिघांनी उत्तर प्रदेशमध्ये हिंदुस्थान रिपब्लिकन आर्मीचे अध्वर्यू श्री. शचीन्द्र-नाथ सन्याल ह्यांच्याशी संबंध जोडले. सन्यालांनी 'पार्टीचे कार्य काय?' यावर छापवून काढलेले कागद भगतने लाहोरला आणले व सुखदेवांनी ते व्यवस्थितपणे आयोजाग वाटले. त्यांच्या प्रचारकार्याची सुरुवात इथूनच झाली. भगत व सुखदेव

सदा कॉलेजातून पळ काढून क्रांतीकार्यात मग्न असत. पंजाबच्या सर्व गावातून हि. रि. आर्मीच्या प्रचारासाठी सुखदेव भटकत असत.

सन्यालांनी योजलेला काकोरी कट फितुरांमुळे फसला. सरकारी खजिना त्यांनी लुटला; पण सर्वच क्रांतीवीर पकडले गेले. रामप्रसाद बिस्मील व इतर तिघांना तर फांशीची शिक्षा झाली. भगत, सुखदेव हे दुय्यम स्वयंसेवक ह्यामुळे निराधार झाले. पण महत्प्रयासाने भगतने काकोरी कटातून सहीसलामत निसटलेल्या आझादांची गाठ घेतली, भूमीगत क्रांतीकारकांना शोधून काढले व पुढाकार घेऊन आठ-नऊ सप्टेंबर १९२८ ला फिरोजपूर जवळच्या जंगलात एक सभा योजली. ह्या सभेत पंजाबतर्फे भगतसिंग व सुखदेव, राजस्थानतर्फे कुन्दनलाल, बिहारातून फणीन्द्रनाथ घोष व मनमोहन बॅनर्जी आणि उ. प्र. मधून शिव वर्मा, ब्रह्मदत्त मिश्रा, जयदेव कपूर, विजयकुमार सिन्हा व सुरेन्द्रनाथ पांडे हे क्रांतीकारक हजर होते. चन्द्रशेखर आझाद येऊ शकले नाहीत; पण त्यांनी ठरणाऱ्या सर्व निर्णयाबाबत आगाऊ अनुमती देऊन ठेवली होती. ह्या सभेच्या योजनेची खटपट भगतसिंगाची अन् सभेत घेतल्या जाणाऱ्या निर्णयांची सूत्रे सुखदेव हलवीत होते.

सर्वप्रथम संघटनेचे नाव हिंदुस्थान रिपब्लिकन आर्मी ऐवजी हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मी असे ठेवावे, ह्या भगत व सुखदेवांच्या सूचनेला मान्यता मिळाली. पार्टीने मुख्यत: समाजवादाच्या तर्कशुद्ध प्रणालीचा प्रचार सर्वसाधारण जनतेत करावा, सरकारच्या शोषणनीतीविरुद्ध खुद्द सरकारशीच झगडावे व यासाठी लागणारा खर्च सरकारी खजिने लुटून भरून काढावा, त्याशिवाय एखाद्या सरकारी अंमलदाराने काही पाशवी कृत्य केले तर त्याला अद्दल घडवावी असेही ह्या सभेत ठरले.

सभेतील सूचना, सूचनांच्या शंकांना बिनतोड उत्तरे अन् कामाची वाटणी ह्यात सुखदेव सांगतील ते सर्वात जास्त मंजूर होत होते.

कामाची वाटणी झाली अन् सुखदेवांनी पंजाबचे संघटन स्वत:कडे घेतले. कॉलेजात आल्यावर त्यांनी यशपालला पार्टीत कार्य करण्यास सांगितले. पण प्रत्यक्ष कार्याऐवजी पदवीधर होईपर्यंत मी अप्रत्यक्ष सहाय्य करीन असे त्यांनी सांगितल्यावर सुखदेवांनी यशपालला सुचविले की दोन-तीन नवे विश्वासू सभासद त्याने पार्टीला मिळवून द्यावेत. थोड्याच दिवसात यशपाल तीन तरतरीत मुलांना घेऊन सुखदेवांपाशी आले. लागलीच तीन-चार पत्रे सुखदेवांनी एकाला दिली अन् सांगितलं की "आत्ताच्या आत्ता सायकल हाणीत लाहोरच्या छावणी स्टेशनवर जा अन् लाहोरकडे येणाऱ्या कुठल्याही गाडीच्या मेल डब्यात ही पत्रे टाकून ये." पत्रावर पत्ता होता जवळच्याच एका मोहल्ल्याचा, म्हणून त्या मुलाने साधारण बुद्धि वापरून तेथील एका पोस्टाच्या पेटीत पत्रे टाकली. सुखदेवांनी त्याला लागलीच नापसंत केले. दिलेल्या हुकुमात तर्क लढवणे त्यांना पसंत नव्हते. कुठल्याही क्रांती-नायकाने आपल्या सहकाऱ्यांकडून 'का' व 'असे कशाला' असली उत्तरे ऐकून घेतली नव्हती.

सुखदेवांनी पंजाबप्रमुख म्हणून कार्याला सुरुवात केली असली तरी पार्टीच्या बैठकींच्या निमित्ताने ते वारंवार दिल्ली, आग्रा, कानपूर, लखनऊ इ. गावातून फिरत असत. मात्र वेष नेहमी गबाळा व घाण. अत्यंत मळके कपडे व चपले-सारखे वापरता येतील असे बूट ते घालीत असत. ह्या बाबतीत अगर कुठल्याही खासगी बाबतीत ते आझादांसकट कुणालाही चकार शब्द बोलू देत नसत.

एकदा अशाच मळक्या, मवाल्याच्या पोषाखात भगतसिंग व जयदेवबरोबर ते दिल्लीच्या चावडीबाजारात फिरत होते. तिघेही फरारी असल्याने दबूनच जात होते. एका घरापाशी एक वेश्या तिच्या दलालाशी बोलत उभी होती. सुखदेवांचा पेहेराव पाहून त्या वेश्येला वाटले की आपल्याच एखाद्या बहीणीचा हा दलाल असावा. ती सुखदेवांकडे पाहून दात विचकत गरजली.

"ऐ...देखो, ये मर्दुआ कहता है मुझसे शादी करलो।"

क्षणाचाही विलंब न करता सुखदेव पक्क्या दलाली ढंगात उत्तरले,

"ऐसा ना करना बीबीजी। फिर हम लोगोंकी रोजी कैसे चलेगी!"

अड्ड्यावर येताच जयदेव भडकून म्हणाले, "सुननेवाले हम लोगोंके बारेमें क्या सोचते होंगे?"

"यहीं की मैं किसी वेश्याका दलाल हूँ और तुम दोनो मेरे शिकार." असे म्हणत सुखदेवांनी हसायला सुरुवात केली.

विनोदबुद्धी सामान्य पण स्वतःच केलेल्या क्षुद्रातिक्षूद्र विनोदावर सुखदेव इतका वेळ हसत रहात की इतरांचे डोके भणाणून जात असे. पण हसणे थांबले की क्षणार्धात सुतकी चेहरा करून इतके विचारमग्न होत की ती स्मशानशांतताही साथीदारांना असह्य होत असे, आणि त्यांच्या सहवासात हा प्रकार हटकून घडे.

परंतु त्यांचे हे हसणे जयदेवला आणखीनच खटकले. तो सारखा सारखा सुख-देवांच्या वागणुकीवर टीका करू लागला, तेव्हा सुखदेवांनी गंभीर होऊन एक बेमालून युक्तिवाद मांडला.

"अगर इस अपरीचीत शहरमें लोग हमें क्रांतिकारी दल का सदस्य न समझ-कर वेश्याका दलाल समझे, तो यह हमारी सफलता है।"

आणि लगेच जयदेवला म्हणाले, "और उधरसे गुजरनेमें अगर किसी ब्रह्म-चारीको खतरा हो तो वह आंखोपर हाथ रख ले या पट्टी बांध कर चला करे" असे म्हणून पुन्हा त्याने हास्याचे मजले चढविण्यास सुरुवात केली.

जयदेवशी झालेल्या झगडयात त्यांनी बिनतोड उत्तरे तरी दिली होती, पण इतर अनेक प्रसंगी केवळ हट्ट म्हणून ते इतरांना आपल्या मनाप्रमाणे वागायला लावत असत. १९२८ मध्ये शिव वर्मा कानपूरहून फरारी झाले अन् बरेच दिवस अमृतसरला सुखदेवांकडे येऊन टिकले. फरारी म्हणून हे दिवसभर घरातच दडून बसत; पण सुखदेव मळके कपडे अन् डोक्यावर टोपी घालून दिवसभर गावात

चकरा मारीत हिंडत असत. एके दिवशी सुखदेव कपड्यांचे पार्सल घेऊन घरी आले. वर्मा पुस्तक वाचीत आराम पडले होते. पुस्तक हिसकावून घेऊन म्हणाले,

"क्या सारा दिन घरमें घुसे बैठे रहते हो। यहां तुम्हें कौन पहचानता है? चलो, कही घूम आये।"

उन्हाळ्याच्या दिवसात टळटळीत उन्हात फिरायला जाण्याचा प्रस्ताव फक्त सुखदेवच देऊ शकत होते.

वर्माने लाख वेळा कळवळून विनवले की दुपारचे नको, पुस्तक इंटरेस्टींग आहे वगैरे. पण सुखदेवांच्या डोक्यात फिरायची लहर आली होती. शेवटी वर्मा उठले तर सुखदेवांनी दुसरा हट्ट धरला की, त्यानी विकत आणलेल्या पंजाबी पोशाखातच वर्माने बाहेर पडावे. सलवार, पंजाबी कुर्ता व पगडीत त्यानी वर्माला कोंबले अन् दोघेही रणरणत्या उन्हात घराबाहेर पडले.

विषयांतर होत असूनही स्वत: शिव वर्मा, जे आजही जिवंत आहेत, सुखदेवांच्या ह्या स्वभावविशेषाविषयी जे आपल्या लेखात लिहितात ते तसेचे तसे उधृत करीत आहे. श्री. वर्मा लिहितात,

"सुखदेव जहां अपने शरीरके बारेमें बिल्कुल उदासीन था वहां अपने साथीयोंको खिलाने और पहनानेमें उसे बडी खुशी होती थी। इस बारेमें सुखदेव भगतसिंगसे बिल्कुक उल्टा था। भगतसिंग अपने शौक, अपना खाना पीना, अपनी पोशाकके सामने दूसरे साथीयोंकी आवश्यकताकी बात बहुत कम सोचता था। इसके विपरित सुखदेव अपने साथीयोंके शौक और उनकी आवश्यकताओंके सामने अपनी बात बहुत कम सोचता था।"

पंजाबी कपड्यात वर्माला पाहून सुखदेव म्हणाले,

"हां, अब तुम पंजाबी लगते हो, चलो।"

"तुम भी कपडे बदल लो" वर्मा घराबाहेर निघता निघता म्हणाले.

"चल चल! आया है बडा गार्जीयन बन कर! मैं कपडे अपडे नहीं बदलता।"

"लेकीन मेरी इस पोशाकके साथ तुम्हारा इन कपडोमें चलना कहां तक ठीक होगा।"

"लोग समझ लेंगे कि मैं तेरा नौकर हूँ, बस!"

ह्यावर वर्मा नाकासमोरचा रस्ता धरून चालू लागले. सुखदेवांना सुवासिक फुलांचा गजरा फार आवडत असे. वाटेत त्यांनी दोन हार विकत घेतले. एक स्वत:च्या गळ्यात टाकला व दुसरा वर्माला दिला. वर्माने हार आपल्या डाव्या हाताशी गुंडाळला. सुखदेवांनी त्यांना हार गळ्यात घालायचा आग्रह केला तर त्यांनी तसे करण्यास साफ नकार दिला. सुखदेव एकदोन मिनिटे रस्त्यातच स्वस्थ थांबले व नंतर म्हणाले,

"तुझ फूलोंकी खुषबू अच्छी नही लगती तो जा और कुछ सूंघ" असे म्हणून त्यांनी वर्मांकडून हार हिसकावून घेतला व आपल्या डाव्या मनगटावर लपेटून चालू लागले.

सुखदेवांचा आवडता खाद्यपदार्थ म्हणजे भुट्टे, रस्ते चलते २–४ भुट्टे ते विकत घेत व एकाला तोंडात धरून खात खात चालत. वाटेत एखादा ओळखीचा इसम भेटला तर हातातला दुसरा भुट्टा काढून त्याला देत व खायचा आग्रह करीत. आताही दुर्दैवाने मक्याची कणिसे वाटेत दिसली. त्यानी चार विकत घेतली. एक वर्माला दिले, एक मुरलीसारखे तोंडाशी धरले अन् उरलेली दोन बगलेत दाबून पुन्हा मार्गक्रमण सुरू केले.

का कू करीतच वर्माने भुट्टा खायला सुरुवात केली. मळक्या कपड्याचा, गळ्यात व हातात सुवासिक फुलांचे हार घातलेला, बगलेत व तोंडात भुट्टे धरलेला सुखदेव आणि प्रथमच पंजाबी नवा कोरा पोषाख घातल्याने अखडून चालणारा व भुट्टा खाणारा वर्मा ह्यांची दुक्कल कुठल्याही विनोदी जोडगोळीहून नक्कीच त्या भकास उन्हात महान विचित्र दिसली असेल.

सुखदेव जसे हट्टी तसेच झक्की पण होते. एकदा आग्रा येथील मुक्कामात त्यांना आपल्या सहनशक्तीची परीक्षा घेण्याची हुक्की आली. लहानपणी त्यांनी डाव्या हातावर 'ओऽऽम् व 'सुखदेव' ही अक्षरे गोंदवली होती. अटक झाल्यावर ह्यामुळे आपले नांव कळेल म्हणून एके दिवशी त्यांनी बॉम्ब फॅक्टरीतील ॲसीड हातावर टाकले. हातावर खोलवर जखमा झाल्या अन् हात सुजून फुलला. दुसऱ्या दिवशी स्नानाच्या वेळी त्यांनी सदरा काढल्यावरच इतरांनी तो सडलेला हात पाहिला. आझाद व भगतसिंग नाराज झाले तर सुखदेव हसत हसत म्हणाले.

"शिनाख्त (ओळख) की निशानी मिटानेकेलिये और एसीडमें कितनी जलन है इसको आजमानके लिये मैंने यह प्रयोग किया।"

नंतर ४–५ दिवसपर्यंत त्यांना सर्व जण औषध लावायला सांगत राहिले; पण त्यांनी तिकडे संपूर्ण दुर्लक्ष केले. काही दिवसांनी त्यांनी पाहिले की अधूनमधून काही अक्षरांच्या खाणाखुणा अजून शिल्लक आहेत. ते लाहोरला गेले व एका सायंकाळी भगवतीभाईंकडे पोहोचले. भाई बाहेर गेले होते व दुर्गाभाबी स्वयंपाकात मग्न होत्या. सुखदेव भाईंच्या खोलीत जाऊन बसले व मेणबत्ती पेटवून त्यावर अत्यंत शांतपणे हात ठेऊन गोंदवल्याच्या खाणाखुणा जाळू लागले. ह्यावेळी त्यांना कुणाच्याही आडकाठीशिवाय आपली लहर यशस्वी करायची होती. बऱ्याच वेळाने भाबी खोलीत आल्या व झडप घालून मेणबत्ती विझवली. रागावून सुखदेवना भाबींनी कारण विचारले तर बोलल काहीच नाही. फक्त एकवार हास्य करून निघून गेले.

आग्रा मुक्कामात एकदा एक सदस्य आजारी पडला म्हणून ब्रँडीची पूर्ण बाटली

आणली होती. पैकी २-४ चमचेच संपली होती. सुखदेवने बाटली पाहिली तेव्हा मद्याची नशा कितपत अंमल करते हे कुतूहल त्यांच्यात निर्माण झाले. इतरांची नजर चुकवून ते आर्धी बाटली फस्त करून गेले. थोड्याच वेळाने त्यांना भगत-बरोबर दिल्लीला जायचे होते. जायला उठले तर पाय डगमगले. भगतसिंगने कारण विचारले तर खरे ते सांगून मोकळे झाले. भगतसिंगने सांगितले की, "आता नशा आला आहे तर तू आत्ता दिल्लीला येऊ नको. संध्याकाळच्या गाडीने ये!" सुखदेव नेहमीप्रमाणे उलटून म्हणाले,

"मैं तो यह जानना चाहता हूँ कि आखीर इसके नशेमें ऐसी कौनसी बात है कि लोग इसके पीछे दीवाने रहते हैं। और यह अनुभव मैं होशमेंही रहकर कर सकता हूँ। बेहोशीका अनुभव कभी सही अनुभव नहीं कहा जा सकता।"

सामान सांभाळून सुखदेव बाहेर पडले पण इतर सर्वांना त्यांची काळजीच वाटत होती. नंतर भगतसिंगने सांगितले की वाटेत एक-दोन वेळा त्यांचे पाय लडखडले; पण बोलण्यात व व्यवहारात त्यांनी दर्शविले सुद्धा नाही की ते नशेत आहेत.

सुखदेवांचा सर्वात प्यारा दोस्त म्हणजे भगतसिंग. 'प्रेम' नावाच्या भावनेचे जे काही भांडार त्यांच्यापाशी होते ते त्यांनी एकट्या भगतसिंगवर उधळून दिले होते. एखाद्या अड्ड्यावर ते अकल्पितपणे एकत्र आले तर इतका जल्लोश करून आलिंगने देत की जसे अनेक जन्मानंतर भेटत आहेत. त्यानंतर गप्पागोष्टी, हास्यविनोद, देशकार्याविषयीच्या चर्चा, त्यातून कडाक्याची भांडणे ह्यामध्ये त्यांना इतरांच्या अस्तित्वाचा विसर पडत असे.

सॉंडर्सवधानंतर पार्टीने असेंब्लीवर बाँब फेकून निवेदने करावी व पोलीसांना आत्मसमर्पण करावे ही योजना आखली. सुखदेवानी बैठकीत भगतसिंगनेच हे कार्य काय करावे हा प्रस्ताव मांडला व तो मंजूर होताच ते पंजाबात निघून गेले. नंतर काही सदस्यांनी भगतसिंगच्या आत्मसमर्पणास विरोध केला. इतक्या लवकर भगत-सिंगसारखा नायक जर कारागृहात अडकला तर पार्टीचे भवितव्य झाकाळून जाईल असे त्यांनी सुचविले. ते आझादांनीही मान्य केले व दुसरी तातडची बैठक होऊन त्यात भगतसिंगांना ह्या कामगिरीतून मुक्त करण्यात आले. सुखदेव ही खबर ऐकून तावडतोब पंजाबातून आले आणि केन्द्रीय समितीने निर्णय का बदलला म्हणून भगतवरच भडकले.

भगतसिंगने त्यांना समजावून सांगितले की सॉंडर्सवधाचा गुन्हेगार म्हणून माझा शोध होत असतानाच जर मी आत्मसमर्पण केले तर फांशी अटळ आहे ह्या धोरणाने, व इतक्या लवकर मी कारागृहात फसलो तर पुढील योजना लंगड्या पडतील, ह्या उद्देशाने समितीने मला असेंब्ली बाँब योजनेतून वगळले आहे. पण सुखदेव काहीच ऐकून घेण्याच्या तयारीत नव्हते. ते सुसाट बोलत सुटले. मित्रभाव विसरून टीकास्त्र चालविताना ते इतके सुद्धा म्हणाले,

"तुममें अहंकार आ गया है, तुम समझने लगे हो कि तुम्हारेहि सरपर दलका दारोमदार है, तुम मौतसे डरने लगे हो, कायर हो......"

हे बोलण्याचा त्याचा उद्देश सरळ सरळ असा होता की "तू जर असे समजतो की तुझ्याशिवाय इतर कुणीही बाँब फेकल्यानंतर न्यायालयात आपल्या पार्टीचे विचार सुसंगतपणे मांडू शकणार नाही तर मग तुझ्याऐवजी इतरांनी जावे ह्या केन्द्रीय समितीच्या निर्णयाला तू मान्यताच कशी दिली ?"

म्हणायचे होते हे पण बोलले भलतेच. मानसिक संतुलन कधीही बिघडू न देणाऱ्या भगतसिंगांना ह्या अपमानास्पद वक्तव्याचा भारी राग आला व ते म्हणाले,

"ठीक है। मैंही जाऊंगा किन्तु आगेसे तुम मुझसे कभी बात न करना।"

ह्या वाक्याने सुखदेव विव्हल झाले. ते इतकेच म्हणाले, "मैंने अपने मित्रके प्रति अपना कर्तव्य पूरा किया।"

दुसऱ्या दिवशी ते लाहोरला पोहोचले तेव्हा त्यांचे डोळे रडून रडून सुजले होते.

८ एप्रिल १९२९ ला भगतसिंग व बटुकेश्वर दत्त असेंब्लीत स्फोट करायला निघणार होते. ७ एप्रिलला सुखदेव भगवतीभाई दुर्गाभाबी, सुशीला दीदी व भगवतीभाईंचा मुलगा शचीन ह्यांना घेऊन तातडीने दिल्लीला आले. ह्या मंडळींनी दिल्ली प्रवासाचे प्रयोजन विचारल्यावर इतकेच म्हणाले की "भगतसिंगला भेटायचे असेल तर आजच भेटा. ह्यापुढे कधीच भेट होणार नाही" दुसऱ्या दिवशी भगतसिंग का भेटणार नाही हे विचारणे दलाच्या शिस्तीविरुद्ध असल्याने कोणीच विचारले नाही. दिल्लीत ह्या सर्वांना कुदसियाबागेत थांबायला सांगून सुखदेव अबोला धरलेल्या भगतला घेऊन तेथे आले. दुर्गाभाबी व भगतसिंग ह्यांचे नाते सख्ख्या दीर-भावजयीहून गाढ होते. त्यांना पाहून भगतसिंगला फारच आनंद झाला. तासभर सर्वांनी मजेत घालवला; पण सुखदेव सुन्न बसून होते.

दुसऱ्या दिवशी भगतसिंगाने तो महान ऐतिहासिक बाँबस्फोट केला व दत्त-समवेत आत्मसमर्पण केले.

भगतसिंगच्या अनुपस्थितीत सुखदेवांवर दलाची जबाबदारी दुपटीने आली. पंजाब व उत्तरप्रदेशात अनेक ठिकाणी त्यांनी बाँब तयार करण्याचे कारखाने काढले. खुद्द लाहोरात तर बाँब तयार करण्याच्या शिक्षणासाठी त्यांनी जयगोपाळला ज्युबिली ट्रेनींग स्कूलमध्ये घातले. त्यांच्या योजना अत्यंत दूरदर्शीपणाच्या असत. ब्रँडरथ रोडवर सिराजुद्दीन मिस्त्रीचा melting process चा कारखाना होता. बाँबचा स्फोटक मसाला भरायला लागणारी नळकांडी व टोप्या सुखदेवानी तेथे करायला टाकल्या. ही विचित्र मशीनरी त्या कामगारांनी कधीच केली नव्हती. सहज जिज्ञासेने सुखदेवाना त्यांनी पृच्छा केली तर म्हणाले की, "गॅसचे इंजीन आम्ही बनवीत आहोत त्यासाठी ह्या वस्तूंची जरूरी लागते. गुलाम रसूलच्या कारखान्यातही काही पार्टसूची ऑर्डर दिली अन् तेथेच सुखदेवांवर दुर्दैव ओढवले.

वर सांगितल्याप्रमाणे बाँबचे कवच तयार करण्याचे काम हातावेगळे करून सुखदेवानी किशोरीलाल, प्रेमनाथ व यशपालला घेऊन लाहोरला एका तिमजली घराच्या वरच्या माळचावर बाँबचे रसायन करण्यास सुरुवात केली. यशपाल आर्टस्‌चा पदवीधर असल्याने तो ह्या शास्त्रात अनभिज्ञच होता. इतर दोघेही शिकाऊ होते. एकटे सुखदेवच पूर्णपणे पारगत होते. मर्क्युरी फलमिनेट तयार करण्यासाठी एका चिनाच्या तबकडीत पारा टाकून त्यात त्यांनी तेजाब मिसळ-ण्यास सुरुवात केली. प्रयोग यशस्वी होत होता; पण त्या मिश्रणांचा घाण वास कमीत कमी दोनशे गजांपर्यंत पसरत होता. ते घर भरवस्तीतले असल्याने यश-पालने रहस्यभेद होण्याची शंका व्यक्त केली. पण सुखदेवानी त्यांची शंका झटकून सांगितले,

"जो काम करना है, किया ही जायेगा।"

काही दिवसांनी एके सकाळी यशपाल बाँब कारखान्याकडे सायकलीवरून येऊन बघतो तर घराभोवती पोलीसांचा गराडा ! सुखदेव किशोरीलाल व प्रेमनाथसकट पकडले गेले होते. पकडीचे कारण रसायनाचा दुर्गंध नसून गुलाम रसूल लोहार होता. त्याला तयार करायला दिलेल्या विचित्र वस्तूंची शका येऊन त्याने पोली-सला खबर दिली होती. पोलीस मागावरच होते. जेव्हा किशोरीलाल गुलाम रसूलकडे तयार माल घ्यायला गेले तेव्हा त्यांचा पाठलाग करून पोलीसांनी कार-खान्याची जागा न्याहाळली अन् छापा घालून सुखदेवांना अटक केली.

सुखदेवाना 'रंगे हाथो' अटक होताच त्यांनी अलमाऱ्यांतून तयार बाँब व साहित्य काढून पोलीसांना दिले व निमूटपणे त्यांच्या स्वाधीन झाले. प्रतिकार म्हणजे मरण हे त्यांना अचूक उमजले होते व असे मरण त्यांच्या विक्षिप्त स्वभा-वाला रुचणारे नव्हते.

त्यांना न्यायालयात दाखल केले गेले तेव्हा भगतसिगादी अनेक क्रांतीकारक तेथे मौजूद होते. नव्यानेच आलेल्या सुखदेवाना सरकारी वकीलाने प्रश्न विचारले अन् त्यांनी सरळ सरळ सर्व कृत्यांचा कबुली-जबाब दिला. त्यांनी सांगितले की 'साम्राज्यशाहीविरुद्ध आम्ही लढलो, पंजाब नॅशनल बँकेवर दरोडा घालण्याची माझीच योजना, पण ती फसली. सॉंडर्स वध मी केला नसला तरी मी हिरीरीने त्यात भाग घेतला; असेंब्लीत बाँब फकण्याची कल्पनाही माझीच; अन् निर-निराळ्या ठिकाणी बाँब कारखाने काढणे, व्हाइसरॉयची गाडी उडवणे, देश-भक्तांना एकत्रित करणे अन् ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या सिंहासनाखाली सुरुंग धुडकावून तिला ठिकऱ्यांच्या स्वरूपात नेस्तनाबूत करणे ह्या सर्व हिंदुस्थान सोशॅलीस्ट रिपब्लिक आर्मीच्या कटांचा सूत्रधार मी स्वतः आहे."

अजूनही कोणत्या जागी बाँब कारखाने चालू आहेत ह्याचेही त्यांनी पत्ते दिले.

समोरच्या कठड्यात उभे असलेले भगतसिगादी क्रांतीवीर सुखदेवांच्या ह्या क्रूर

सत्याच्या गौप्यस्फोटाने हादरले. सुखदेवांकडून त्यांना ह्या घरभेद्या वृत्तीची अपेक्षा नव्हती. पुढे जाऊन त्यांना सुखदेव समजले. कसे समजले ? सुखदेवांनी असे वक्तव्य का दिले ? ह्याचेच स्पष्टीकरण इथे करायचे आहे.

सुखदेवांनी प्रखर देशभक्तीच्या गर्वाने सरकारला सांगितले की मी आणि आम्ही जे करायचे आहे ते केले, आता तुम्हाला जे करायचे ते खुषाल करा ! केलेल्या कार्याची अशी कबुली छाती फुगवून अन् मान ताठ ठेऊन ह्यापूर्वी तात्या टोपे, वासुदेव बळवंत व चाफेकर बंधूनीही दिली होती; खुदीराम बोस, कन्हाइ दत्त, मदनलाल धिंग्रा व अनंतराव कान्हेऱ्यांनीही दिली होती. त्या सिंहाच्या छाव्यांनी वधाची कृत्ये केली असल्याने त्यांचे हौतात्म्य अटळ होते. पण एकाही वधकृत्यात भाग न घेताही हे निर्भीड निवेदन करून सुखदेवांनी काळेपाणी हा देशभक्तीचा दुसरा दर्जा पार करून फासाचा पहिला दर्जा गाठला.

त्यांच्या वक्तव्याने सर्वात जास्त हानी झाली ती त्यांची स्वतःचीच ! त्यांना न्यायालयाने फासाचा विळखा घातला.

आता प्रश्न हा उरतो की त्यांनी इतर बाँब कारखाने व तेथे वास्तव्य करणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांचे पत्ते पोलीसाना दिले हे फितुरीचे लक्षण नव्हे काय ?

यावर त्यांचे जिव्हाळ्याचे स्नेही, त्यांच्याच दलातील काळे पाणी भोगणारे क्रांतीकारक व आज उत्तर प्रदेशच्या विधान सभेत असलेले शिव वर्मा आपल्या ' संस्मृतीया ' पुस्तकात ज लिहितात ते तसेच्या तसे येथे उधृत करीत आहे.

श्री. शिव वर्मा लिहितात,

" उसने उन्ही स्थानों और मकानोंका पता दिया जिनके बारेमें उसे पता था की वे छोड जा चुके हैं । सरहानपूरके जिस मकानमे मैं (शिव वर्मा), डॉ. गयाप्रसाद और जयदेव रह रहे थे, उसका पता दो ही व्यक्ती जानते थे–सुखदेव और फणीन्द्र । सुखदेव चाहता तो हमारा पता देकर पुलीसको अपनी सच्चाईका इत्मीनान दिला सकते थे । लेकीन उन्होंने ऐसा नहीं किया । हम सरहानपूरके उस मकानमें उस समय तक रहते रहे जब तक फणीन्द्र नहीं पकडा गया । इसी प्रकार सुखदेवने किसी भी व्यक्तीका असली नाम और पता पुलीसको नहीं दिया । बयानके पीछे भावना थी–हाँ, हमने यह सब किया, अब तुम जो चाहो करलो । उसके बयानने स्वयं उसेही सबसे अधीक नुकसान पहुंचाया । "

कैदेत सर्व बंदीवानांनी राजनैतिक कैद्यांचे अधिकार प्राप्त होण्यासाठी केवळ पाण्यावर राहून उपोषण करण्यांस सुरुवात केली. हे उपोषण मध्येच बंद करून सुखदेवानी दलाची शिस्त भंग केली असा आरोप त्यांच्यावर केला जातो. त्यांनी उपवास का व कोणत्या विचाराअंती सोडला हे अभ्यासिल्यास त्यांच्या निर्णयावर कुणीही ठपका आणू शकत नाही.

दहा दिवस पाण्यावर सर्वांनी काढले तोपर्यंत सरकारने त्यांची दखल घेतली

ही. ११ व्या दिवशी मात्र बळजबरीने दूध घशात ओतण्यांचा निर्णय सरकारला घ्यावा लागला. हे देशभक्त मेलेल्या मातेचे दूध प्यालेले नाही हे सरकारला कळून आले. २ डॉक्टर व १०–१२ तगडे कैदी घेऊन दारोगा ी प्रत्यक कोठडी उघडायचे, प्रत्येक सदस्य कसून विरोध करायचा व यथेच्छ मार खाऊन तो हतबल झाला की त्याला घट्ट धरून नळी घशात कोबून डाक्टर दूध पाजायचे. करता करता सुखदेवांची पाळी आली. ते कोठडीत दरवाजाची साखळी उघडेपर्यंत स्वस्थ बसून होते. पण दरवाजा उघडताच गनीम आत येण्यापूर्वीच ते तीरासारखे बाहेर पडले व पटांगणात सुसाट वेगाने धाऊ लागले. दारोगाजीचे दल विस्मयचकीत होऊन क्षणभर पहातच राहिले. १० दिवसांचा उपाशी असामी इतक्या वेगाने धावू शकतो ह्याची त्यांना कल्पना नव्हती. बड्या मुष्कीलीने त्यांना काबूत आणले तर त्यांनी सूट हात चालवून मारपीट सुरू केली. दारोगाजी भयकर चिडले. इतर कैदी केवळ प्रतिकार करीत होते; पण झपाटलेला झक्की माणूस चक्क मारीत होता, ओरबाडीत व चावीतही होता डॉक्टरांकडे नेण्यापूर्वी दारोगाने आपल्या राकट कैद्याकरवी सुखदेवांना यथेच्छ चोप देण्यास सुरवात केली.

मार खाताना नेहमी सुखदेव इतके कटु मिस्कील हास्य करीत रहायचे की मारणाऱ्यांना प्रथम चीड व नतर स्वतःचीच शरम वाटू लागायची. ते बेदम मार खात होते आणि एखाद्या टिवल्याबावल्या करणाऱ्या शाळकरी मुलासारखे हसत होते. दारोगा भयकर भडकले व सुखदेवांना अंगावर उचलून डॉक्टरपर्यंत घेऊन जाण्याचा त्यांने हुकूम फर्मावला. कैद्यांने मारणे बंद केले व सुखदेवाना अगावर प्रेतास रखे लादून चालू लागले. ज्या कैद्याने एक पाय आपल्या खांद्यावर आवळून धरला होता त्या कैद्याजवळ येऊन हंटर अपटीत दारोगा त्याला व्यवस्थितपणे घट्ट धरायचा हुकूम देऊ लागला. दारोगा इतक्या जवळ आलेला पहाताच सुखदेवांनी झटक्यासरशी पाय मोकळा करून इतक्या जोरात त्याच्या छाताडावर लाथ हाणली की तो दोन पावले लांब फेकला गेला. सर्व कारागृह हा सिनेमा श्वास रोखून पहात होते. सर्वांना वाटले, आता सुखदेवची हाडे आणखी मोकळी होणार; पण दारोगाजी त्या लत्ता प्रहाराने इतके शरमिंदे झाले की मान खाली घालून ते निघून गेले. सुखदेव कडवट हास्य करीतच होते.

डॉक्टरांच्या पुढयातही त्यांनी प्रतिकाराची शिकस्त केली पण शेवटी डॉक्टर रबरी नळीने त्यांना दूध पाजण्यात यशस्वी झाले. १० दिवसांच्या कडकडीत उपासानंतर का होईना, आपला प्रतिकार निकामी ठरला ह्या पराजयाची जाणीव सुखदेवांचा अहंकार भेदून गेली. त्या रात्रभर ते अस्वस्थतेने बराकीत चकरा टाकीत होते दुसऱ्या दिवसापासून रोज २ वेळा डॉक्टरांनी दूध ठोमवण्याचा उपक्रम सुरू केला. रोज सुखदेवांशी निकराची झटापट होऊन शेवटी डॉक्टर विजयी होत. पहिल्या दिवशी दूध पोटात जाताच सुखदेवानी घशापर्यंत बोट

फिरवून ते ओकून टाकले. पण दुसऱ्या दिवशी घशाला ह्या अंगुळीक्रमाची सवय झाली. दूध बाहेर पडले नाही. तिसऱ्या दिवशीच्या झटापटीनंतर त्यांनी जवळपास उडत असलेली माशी मुठीत पकडून तोंडात टाकली व ढेरसार पाणी त्यावर प्याले. त्यामुळ ओकारी होऊन सव दूध बाहेर आले. पण नंतरच्या २ दिवसात दूध पोटात व्यवस्थित बसले अन् त्यामळे त्यांचे घटलेले वजनही थोडेफार वाढले.

शेवटी सरकारला अपयशी ठरविण्यासाठी त्यांनी एक नविन उपाय हुडकून काढला. पायाच्या टाचेजवळची एक नस कापल्यास रक्तस्त्राव बराच होतो हे त्यांना कळले. त्यांनी एक ब्लेड मिळवली व रात्रीचे नस कापायला सिद्ध झाले. पण लगेच विचार आला की जर अता रक्तस्त्राव होऊन मरण ओढवले तर इतरांना वाटेल की फाशीला घाबरून सुखदेवानी आत्महत्या केली. हा विचार येताच त्यांनी ब्लेड फेकून दिले अन् नवी योजना करण्यात त्यानी सारी रात्र जागून काढली. १६ व्या दिवशी डॉक्टर त्यांच्या तगड्या लवाजम्यासह सुखदेवांच्या खोलीत यताच ते उठले व डॉक्टरांच्या हातातून दुधाचा पेला घेऊन निमूटपण त्यांनी तोंडाला लावला.

सुखदेवानी साथीदारांशी सल्ल मसलत न करता उपोषण सोडले हा त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये फार मोठा चर्चाविषय ठरला. त्यांचेच जिवाभावाचे सख त्याच्यावर उघडउघड टीका करू लागले. काहींनी तर त्याना पाहून तोंड फिरवले. पण सुखदेवानी आपल्या निर्णयाच्या सफाईसाठी चकार शब्द काढला नाही. बस्स ! त्यांनी निर्णय घेतला होता अन् अता त्यात बदल घडवून आणणे कुणालाही शक्य नव्हते.

भगतसिंग व दत्त दुसऱ्या कारागृहात होत व दर रविवारी त्यांना त्यांच्या साथीदारांना भेटण्यासाठी इकडच्या कारागृहात आणले जाई. पुढील रविवारी ते सेंट्रल जेलमधन आले तेव्हा भगतने सुखदेवांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. सुखदेवांनी स्पष्ट सांगितले,

"भूख हडतालकी सफलता है किसीके मरनेमें । अनशनसे डॉक्टर मरने नही देते और गला काटकर मैं मरना नही चाहता।"

भगतसिंगांनी ह्यावर त्यांना उपाय सुचविला की सरळ पेल्यातून दूध पिण्याऐवजी डॉक्टरांकरवी रबरी नळीतून त्यांनी दुग्धप्राशन करीत रहावे. असे केल्यानेही सामुदायीक उपोषणाचा हेतू सफळ होईल.

सुखदेव हसून इतकेच म्हणाले,

"मैं अपनेसे धोका नहीं कर सकूंगा।"

त्यांचे हे उत्तर कुणालाही निरुत्तर करणारे होते.

१९३० च्या सुरुवातीला बंदी क्रांतीवीरांनी दुसऱ्यांदा उपोषण-योजना आखली. सुखदेवांनी स्वतःहून आपले नाव दाखल केले तेव्हा इतरांना वाटले मागील कृत्याचा पश्चात्ताप होऊन हा दाखल होत आहे म्हणजे आता तरी प्रामाणिक राहील. ह्या

वेळी १५ दिवसपर्यंत सरकारने उपाशी कैद्यांची विचारपूससुद्धा केली नाही. अकस्मात १५ व्या दिवशी संध्याकाळी सुखदेवांची प्रकृती पार ढासळल्याचे निदर्शनास आले. जेल अधिकारी व डॉक्टरांची एकच धावपळ सुरू झाली. सुखदेवांचे हात पाय अकडले, वाचाशक्ती हरपली अन् तोंडाला छाले आले. सुखदेवांच्या मृत्यूने संपूर्ण भारतात वादळ उठण्याची शक्यता होती म्हणून वैद्यकीय इलाजांसाठी जेलच्या इस्पितळात एकच धावपळ सुरू झाली.

घडले हे होते की सुरुवातीपासून सुखदेवांनी जलप्राशनसुद्धा बंद ठेवले होते. अत्यंत गुप्तता राखून त्यांनी पाण्याविना पंधरा दिवस काढले होते. त्यांच्या साथीदारांना डॉक्टरांनी सांगितले तेव्हा हे रहस्य कळले. डॉक्टर पाणी घेऊन त्यांचे खाटेजवळ आले त्याक्षणी सुखदेव सहजस्फूर्तीने प्रतिकारासाठी उठले अन् खाट सोडून पळू लागले; पण थोड्याच अंतरावर जाऊन ते कोसळले अन् बेशुद्ध पडले. त्या बेहोशीतच डॉक्टरांनी नाकातून नळी टाकून त्यांना पाणी पाजले व पाच मिनीटांनंतर ते शुद्धीवर आले.

पाणी पोटात गेले हे कळताच त्यांनी खिलाडी वृत्तीने आपला पराजय मान्य केला अन् भूक-हरताळ समाप्त करून टाकला.

पुन्हा सर्व साथीदार चिडले. त्यांच्यावर बहिष्कार टाकण्याची भाषाही बोलू लागले. पण सुखदेव अशा वेळी कुणालाच आपल्या निर्णयाचे महत्त्व पटवून देत नसत अगर सफाई देऊन इतरांची मने वळविण्याची धडपड करीत नसत. ह्या त्यांच्या स्वभावाचा एक विशेष गुण होता.

खटला चालू असतानाही त्यात त्यांनी हिरीरीने कधीच भाग घेतला नाही. ज्यांच्या साम्राज्याच्या छत्राखाली भारतीयांचे रक्त कधीच सुकले नाही त्या कठोर व पाशवी शत्रूपक्षाकडून न्यायाची अपेक्षा त्यानी कधीच केली नाही. ब्रिटिश साम्राज्यशाहीतील बड्यातल्या बड्या अधिकाऱ्यापासून ते क्षुल्लक प्याद्यापर्यंत त्यांनी कधीच कुणाशी एकही गोड शब्द उच्चारला नाही की त्यांच्यापासून सौजन्यपूर्ण व्यवहाराची तिळमात्र आशा धरली नाही.

फासावर चढण्याच्या काहीच दिवस अगोदर त्यानी महात्माजींना लिहिलेल्या पत्रातून सशस्त्र क्रांतीवर त्यांचा किती दृढ विश्वास होता ह्याची कल्पना येते. पत्रातील महत्त्वपूर्ण भागच मराठीत देत आहे—

" ह्या देशात समाजवादी लोकशाही पद्धतीची स्थापना करणे हाच आम्हा क्रांतीकारकांचा ध्यास आहे. ह्या ध्यासात अन् ध्येयात अणूभरही नवीन संशोधनासाठी जागा नाही. ...मला वाटतं, महात्माजी, आपणालाही माझे म्हणणे पटावे ! निदान, मला वाटते, आपली अशी धारणा नक्कीच नसावी की क्रांतीकारक तर्कहीन व अविचारी असतात व त्यांना फक्त वध, स्फोट अशा विनाशकृत्यांमध्येच आनंद वाटतो. आम्ही आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की सत्य

ह्याच्या पुरेपूर विपरीत आहे. आम्ही क्रांतीवीर प्रत्येक पुढचे पाऊल टाकताना आमचा सभोवार व परिस्थिती डोळसपणे न्याहाळतो. आम्हाला आमच्या जबाबदारीची जाणीव हरक्षणी,हरघडी असते. आम्ही विधायक अन् रचनात्मक कार्याला आमच्या क्रांतीसंहितेत अग्रक्रम देतो, भले मग त्यासाठी प्रसंगी आम्हाला विनाशक कृत्यही करावी लागोत."

"तो सुदीन दूर नाही जेव्हा आमच्या नेतृत्वाखाली अन् आमच्याच झेंड्याभोवती भारतीय जनसमुदाय संघटीत होईल अन् समाजवादी लोकशाहीच्या उच्च ध्येयाकडे वाटचाल करताना आढळेल."

स्वतःच्या प्राणदंडाचा उल्लेख करून सुखदेव ह्याच पत्रात एके ठिकाणी लिहितात,

"ज्यांना प्राणदंडाचा हुकूम जाहीर झाला आहे अन ज्यांनी सुदैवाने आज भारतात अमाप कीर्ती संपादिली आहे असे (आम्ही) लाहोर कटातील तीन राजबंदी आमच्या क्रांतीसंघटनेचे सर्वेसर्वा नाहीत. सत्य हे आहे की ह्यांचा प्राणदंड घटवून 'काळे पाणी' शिक्कामोर्तब झालं तर देशाचं तितकं कल्याण होणार नाही जितके की, ह्यांना फासावर लटकावल्याने होईल."

"इन्कलाब झिंदाबाद"

भगतसिंग, राजगुरु व सुखदेव ह्यांची फाशी टाळणे शक्य असूनही तसे न करणाऱ्या युगदेवाना सुखदेवानी शेवटल्या वाक्यात असा तडाखा हाणला होता.

असे होते सुखदेव! सनकी, झक्की, बिघडलेल्या मेंदूचे! म्हणूनच त्यांना 'कटाचा मेंदू' ठरवून ब्रिटिश न्यायालयाने फासाच्या फंद्यात अडकविले होते.

असे 'बिगडे दिमाग' देशप्रीतीने झपाटलेले वेडे, पागल स्वतःहूनच हे पागलपण स्वीकारतात, कारण ह्या पागलपणातूनच स्वातंत्र्य सूर्याचा—सुखाचा (?) उदय होतो असे म्हणताना शायर फर्मावितो—

"इन्ही बिगडे दिमागोंमे धनी खुषीयोंके लच्छें हैं।
हमे पागलही रहने दो पागलही अच्छे हैं।"

[ पृष्ठ १३ वरून ]

"पन्नास–पन्नास."

म्हणजे शेतकऱ्यानं काबाडकष्ट करून धान्य पिकवलं की हे निम्मं धान्य आयत्या वेळेस येऊन घेऊन जाणार.

"पण कायद्यानं तर सव्वीस–चवदाचा हिशोब व्हायला पाहिजे की नाही ?"

उभी असलेली दहाबारा मंडळी या प्रश्नानं हादरल्यासारखी दिसली. जोगेश्वरबाबू काय उत्तर देतात याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिलं होतं.

तेवढ्यात एक जाडा जुडा भगवा नेहरूशर्ट व पायजमा घातलेला ढेरपोटा माणूस पुढे आला व बाकावर येऊन बसला.

त्याचं नाव वीरभद्र. रघबंसबाबूचा हा दुसरा हात म्हणून ओळखला जातो.

तो म्हणाला "देखिये डाक्टरसाब, अगर हम लोग सब खेती ट्रॅक्टर लगाकर कर देते तो ये सब गरीब जनताको कौन पूछेगा ? वे किधर जायेंगे ? वे तो मर ही जायेंगे। लेकिन हम क्या सोचते है, गरीब को खाने दो। इसलिये इस हिसाबसे हम देते है। इससे उसे भी काम मिलता है, और हमे भी धान मिलता हे। आखिर हमारा भी तो पेट है न ?" असे त्याने त्याच्या पोटावरून हात फिरवीत विचारले.

मला त्या विरोधाभासाची गंमत वाटली. वीरभद्र त्याच्या विशाल पोटावरून हात फिरवीत विचारत होता, "काय करता, पोट तर भरायला पाहिजे !" पण उभ्या असलेल्या कोणालाही तो विरोधाभास जाणवलेला दिसला नाही

"असं नाही. आमच्या महाराष्ट्रात 'लँड टू द टीलर' (कसेल त्याची जमीन) ही पॉलिसी आहे. तो तीन स्टेजमध्ये कायदाही झाला आहे. त्यामुळे तेथे सर्वसामान्य शेतकऱ्याकडे स्वतःची जमीन आहे. इथं तसं नाही. तसं का नाही ?"

"हे पहा. आमची जी जमीन आहे ती पूर्णपणे कायदेशीर आहे. आमच्याकडेसुद्धा सीलींगचा कायदा आहे. त्याप्रमाणं प्रत्येकास चाळीस एकर जमीन ठेवता येते. आमच्या घरात परिवार मोठे आहेत. शंभर माणसे असली तर आम्ही चार हजार एकर जमीन कायद्यानं ठेवू शकतो. कायद्याच्या बाहेर काही असलं तर बोला ! इधर जो चलता है वो सब कानूनसेही चलता है।"

मी मनात म्हटलं, कारण तो कानून तुम्ही तुमच्यासाठीच बनवून घेतला आहे. आपल्याकडे सीलींग प्रत्येक परिवारास आहे. तिकडे जे आहे ते माणसांना आहे. त्यामुळे घरात नुकत्याच जन्मलेल्या मुलाच्या नावावरसुद्धा चाळीस एकर जमीन ठेवतात. ह्या परिवारात अस्तित्वात नसलेल्या कित्येक माणसांच्या मुलांच्या नावावर जमीनी लावून त्यांनी सीलींगमुळे एक इंचभर जमिनीचा तुकडाही गमावला नाही आहे.

संभाषण अडून बसल्यासारखे झाले. कारण मूळ भूमिकेतच फरक होता. मी म्हटले, "ते राहू द्या. इतर बाबतीतील प्रश्नांचे काय ?"

"कोणते प्रश्न ?"

"सिकमी हक्कांचा ?"

जोगेश्वरबाबूंचा चेहेरा तटतटला.

"कसले हक्क ? आणि ते का द्यायचे ! कोठे मिळवायला गेले होते जमीन हे ?"

"असं नाही. ज्या जमिनीवर ते काम करीत आहेत, त्यांचं कळ म्हणून राहूद्यात पण बटाईदार म्हणून तरी नाव लागायला हवं की नाही ? त्यांना काय संरक्षण आहे आज ?'

' आम्ही द्यायला तयार आहोत संरक्षण."

"कुणाला ?"

"जो हिशोबानं धान्य देईल त्याला."

मी हसलो. म्हणालो, "कोणता हिशोब, पन्नास पन्नासचा ?"

"हो. तोच हिशोब. दुसरा कोणता असू शकतो ?"

आता स्वरूप उघडे होऊ लागले होते.

बटाईदारांची नावे लावण्यास त्यांचा सक्त विरोध होता. त्यापायी कदाचित त्यांनी दुसरी कोणतीही किंमत दिली असती. पण एकदा नाव लागले की त्याला सिकमी हक्क प्राप्त होतो. तो हक्क मिळाला की धान्य सव्वीस-चवदाच्या हिशोबाने मिळणार. पुढेमागे एखादा पुरोगामी कायदा आला तर हा पुरावा समजून कुळेच मालक होणार.

हा हक्क म्हणजे जमीनदारीच्या मुळावरच घाव होता. आणि जोगेश्वरबाबूंना याची जाणीव होती

मी विचारले, "तुम्ही बटाईने शेतकऱ्याला जी जमीन देता, तीच जमीन त्याला पुढच्याही वर्षी देता का ?"

"हो. हो. तीच जमीन शक्यतो देतो. पण तो चांगला वागला तर !"

या 'चांगला वागला तर'मध्ये सगळी गोम आहे. ही एक भयंकर अशी गर्भित धमकी आहे. शेतकऱ्यांची ही नाडी जमीनदाराच्या हातात असते. म्हणून तो जमीनदारापुढे लाचार असतो. त्यामुळे जमीनदार मागेल त्या हिशोबाने धान्य द्यावे लागते. त्यामुळेच जमीनदाराने काहीही जुलूम केला तरी गप्प बसावे लागते. त्याच्या घरची कामे करावी लागतात. त्यास निवडून द्यावे लागते. रोज सकाळी जाऊन त्याच्या पाया पडावे लागते.

"तुम्ही शेतकऱ्याला बी पेरायला धान्य देता. ते कुठल्या स्वरूपात परत घेता ?"

उभा असलेला एकजण मधेच बोलून गेला,

"दुगने हिसाबसे."

जोगेश्वर, वीरभद्रबाबू सगळेचजण त्याच्यावर उखडले; पण शब्द बाहेर पडून गेले होते. दुगुना हिसाब म्हणजे शेतकऱ्याने बी पेरायला एकमण धान्य उसने घेतले तर पीक आल्यावर जमीनदाराला त्याला त्याच्या हिशोबाचे निम्मे धान्य तर

द्यावेच लागे; पण त्याशिवाय उसने घेतलेल्या एक मणाबद्दल दोन मण धान्य परत करावे लागे. हे त्याचे व्याज समजा. यावर्षी पुरेसे धान्य आले नाही तर पुढच्या वर्षी या दोन मणाचे चार मण होतात.

जोगेश्वरबाबू स्पष्टीकरण देऊ लागला, " हे बँकेसारखंच आहे. शेवटी व्यवहार तो व्यवहारच. एकाद्या वेळेस धान्य कमी आलं तर आम्ही म्हणतो, आण एक मण तर एक मण, वरच व्याज नको "

मी हसलो.

" काही ठिकाणी अशी प्रथा मी ऐकली की, आषाढात शेतकऱ्याने मालकाला पैसे द्यायचे व जमीन कसायला घ्यायची व येईल ते उत्पन्न घ्यायचे. अशी प्रथा येथे आहे का ? "

" नाही. ठेक्याने आम्ही देत नाही. "

" रघुवंशबाबू भेटतील का ? "

" नाही. त्यांना कॉर्निअल अल्सर (डोळ्याचा रोग) झाला आहे. आज डॉक्टर विमानाने पटन्याहून येणार आहेत. त्यांना भेटायची बोलायची बंदी आहे. जरा थांबून जोगेश्वरबाबूंनी नोकराला नास्ता व चहा आणायला सांगितले. मला पलीकडील टेबलावर घेऊन गेले. नास्त्याचे ताट टेबलावर आले.

तेवढ्यात वीरभद्रबाबू माझ्या शेजारच्या खुर्चीवर येऊन बसले. पलीकडे जोगेश्वरजी होते.

वीरभद्र मला म्हणाले, " काय डॉक्टरसाहेब, पहिल्यांदाच खरे का सांगितले नाही, की तुम्ही एसेम जोशींचे पी. ए. आहात म्हणून ? "

जोगेश्वरबाबूंनी माझ्यावर डोळे रोखले होते.

वातावरण तंग झाले.

मी तात्काळ म्हणालो, " मी एसेमचा पी. ए. नाही. मी एका साप्ताहिकाचा प्रतिनिधी आहे. हे बघा माझे ओळखपत्र " असे म्हणून बरोबर आणलेले ' माणूस'चे ओळखपत्र दाखविले.

मी म्हणालो, " तुम्ही जोपर्यंत माझ्यावर विश्वास ठेवणार नाही तोपर्यंत मी नास्त्याला हात लावणार नाही. "

सगळेजण एकदम म्हणाले की, " तसं नाही. तुम्ही नास्ता घ्या. " जोगेश्वरजी जास्त मोकळेपणे बोलू लागले.

" आम्ही काँग्रेसवाले आहोत. जयप्रकाशजी नेहमी आमच्याकडे येतात. येथे राहतात. फार चांगला माणूस. आता गफारखान यायचेत. तेव्हा बिहारमधून ऐंशी लाख रुपये जमा करून द्यायचेत. जे. पींचा शब्द आम्ही कधी खाली पडू देत नाही. "

मी विचारले, " तो नक्षत्र मालाकार माहीत आहे ? "

जोगेश्वरजी म्हणाले, " वा. माहीत आहे की. एक नंबरचा डाकू आहे. लोकांचे नाक-कान कापतो. "

" पण मी असं ऐकलं की तो शेतकऱ्यांमध्ये फार प्रिय आहे म्हणून "

" छे: छे:, तो गरिबांनाच लुटतो. घरांना आगी लावतो व स्वत: पैसा करतो "

जोगेश्वरजी चहा बघायला आत गेले. जमीनदाराच्या कुटुंबियांपैकीच एकजण समोर येऊन बसला. इकडे तिकडे पाहून तो मला म्हणतो, " काही खरं नाही हो हे: नक्षत्रबाबू श्रीमंतांना लुटतो आणि गरिबांना मदत करतो हेच खरं आहे ."

मी बघतच राहिलो. त्या घरात हे ऐकणं अनपेक्षित होतं.

इतर पुण्या-मुंबईच्या गप्पा झाल्यावर मी निघालो. मला पोहोचवायला सर्वजण बाहेर आले. येताना चिखलातून आलो. जाताना खास राजेसाहेबांच्या नावेने नदीतून पोहोचविण्यात येणार होते.

पलीकडे एक देवालय होते. त्यात एक माणसाची बसलेली मूर्ती होती.

" ती राजासाहबांच्या वडलांची अयोध्याप्रसाद यांची समाधी आहे. "

जोगेश्वरजी आत घाईघाईने गेले व हातात एक जाडे पुस्तक आणले. त्यावर माझे नाव घालून सप्रेम भेट दिले. ते राजेसाहेबांनी स्वत:चे लिहवून घेतलेले चरित्र होते ' रघुवंश प्रसाद सिंह—व्यक्तित्व व कृतित्व ' असे त्याचे नाव होते.

नावेत माझ्याबरोबर झब्बा-शेरवानी पहनलेल्या एका चव्मीस माणसास बरोबर दिले. नाव कोसीचे पाणी कापू लागली. मी त्या माणसाबरोबर बोलू लागलो.

त्याच नाव अली रझा.

तो राजासाहबांचा वैमानिक व विमान मेकॅनिक होता. त्याला विमानांची माहिती विचारू लागलो. दोन विमाने होती. किंमत सुमारे प्रत्येकी दोन अडीच लाख रुपये.

विमान राजेसाहेब पटन्याला, दिल्लीला, कलकत्त्याला जाताना वापरतात. बड्या पाहुण्यांना आणायलाही विमान जाते.

मला वेळ असल्यास विमानात बसवायचे त्याने कबूल केले.

मी विचारले, " कसे आहेत तुमचे राजासाहब ? "

तो म्हणाला, " मी त्यांचा नोकर आहे म्हणून काही बोलू शकत नाही. यात काय समजायचे ते समजा. "

" मग तुम्ही येथे का राहता ? "

" फक्त मी क्वालिफाईड नाही म्हणून राहतो "

" राहायला कुठे आहात ? "

" नव्या कोठीवर " असे म्हणून त्याने हात दाखविला. राजेसाहेबांचा नवा महाल दुरून दिसत होता.

" तिकडे राजासाहबांचं कोण राहतं ? "

"त्यांची मुलं राहतात"

"ते स्वतः तिकडे का राहत नाहीत ?"

"कारण जुन्या कोठीमध्ये बसून सगळ्या चाव्या फिरवता येतात. त्यांचे इथंच पॉवर हाऊस आहे म्हणानात."

आम्ही हसलो. एकमेकांचा निरोप घेतला.

मी डाक बगल्याकडे जाऊ लागलो.

वाटेत एक 'कॉमन मॅन' भेटला.

त्याला विचारले.

"कायरे, राजासाहब हा कसा काय माणूस वाटतो ?"

त्याने एकवार पाहिले व म्हटले,

"हम उनसे डरते भी है और इज्जतभी करते है!" 'कॉमन मॅन'च्या या उद्‌गारांनी मी चक्रावलो.

"ते कसे काय ?"

'कॉमन मॅन' बोलू लागला.

"डरते है इसलिये कि सब पूलिस, अफसर, नेता उनके जेबमे (खिशात) हैं। और इज्जत इसलिये करते है की कल हमारे उपर भी प्रसंग आता है तो उनके यहाँ ही जाना पडता है।"

मी त्याच्या अॅनॅलिसीसवर बेहद्द खूष झालो.

डाक बंगल्यातील आराम खुर्चीत अंग टाकून दिले.

काही वेळाने भेट दिलेले पुस्तक उघडले.

त्यांचे, त्यांच्या परिवाराचे आत फोटो होते. त्यात त्यांचे लाडके विमान होते. देखण्या मुलांचे फोटो होते. थोरल्या मानलेल्या मुलाचा त्याने मारलेल्या वाघाबरोबर फोटो होता. दुसऱ्याच्या पेंटिंगच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन नेहरूंनी केले, त्याचा फोटो होता. रोषणाई केलेल्या नव्या कोठीचा फोटो होता. निरनिराळ्या अखिल भारतीय पुढाऱ्यांबरोबर रघुवंशबाबूंचे फोटो होते. मी पुस्तक मिटले. असे रघुवंशबाबू हे प्रकरण.

हा सर्व जमीनदारांचा जमीनदार आहे. केवळ त्याच्याकडे दहा हजार एकर जमीन आहे म्हणून नव्हे, कारण पंधरा हजार, वीस हजार. एक तर बत्तीस हजारवाला जमीनदार मी पाहिलेला आहे.

रघुवंश त्याहीपेक्षा अधिक आहे.

केवळ तो जास्त जुलमी आहे म्हणन अधिक आहे का ? त्याहीपेक्षा अधिक जुलमी जमीनदार मला बघायला मिळाले.

मग रघुवंश मोठा का ?

(क्रमशः)

नाहीच, पण जनसंघाला गुजराथेत फारसा पाठिंबाही नाही. दंग्यात कोणाचा हात होता याची स्पष्ट कल्पना जयप्रकाश नारायण व गुजराथचे मुख्यमंत्री हितेंद्र देसाई यांनी दिलेली आहे. असल्या दंग्यांच्या बाबतीत एक सूचक गोष्ट म्हणजे ते नेहमी यूनोची सभा किंवा रबातसारखी एखादी आंतरराष्ट्रीय परिषद भरण्याच्या वेळी होतात. या दंग्यांचे स्वरूपही इतके सारखे असते की या सारखेपणाची नीट छाननी झाली पाहिजे. या दंग्यांच्या मागे पाकिस्तानी हात असण्याची खूप शक्यता आहे. अहमदाबादला अल्-अक्सा निमित्ताने जी निषेध-मिरवणूक काढण्यात आली तिच्यातही पाकिस्तानी घोषणा करण्यात आल्या. जयप्रकाश व हितेंद्र देसाई या दोघांनीही अशा घोषणा झाल्याचे मान्य केले आहे. गृहमंत्रालयाने जो तपास केला आहे त्यावरून स्पष्ट झाले आहे की या दंग्यातल्या २३ प्रसंगांपैकी २२ प्रसंग मुसलमानांमुळे उद्‌भवले होते. असे असूनही मुस्लीम मजलिस, जमाते इस्लामी किंवा जमियत उल्-उलेमा या संस्थांविरुद्ध सरकारने ब्रही काढलेला नाही.

अहमदाबादचा दंगा रबातच्या कुमुहूर्तावर घडवून आणण्यात आला या वाज-पेयींच्या विधानाला स्वतंत्र पार्लमेंट-सदस्य देसाई यांनीही राजधानीत एका पत्रकार-परिषदेत दुजोरा दिला आहे. ते म्हणाले, "दंगेखोरांजवळ हत्यारेच नव्हे तर ट्रान्समिटरही सापडले व दंगा सुरू झाल्याबरोबर काही मिनिटातच पाकिस्तान रेडिओ त्याच्या अतिरंजित बातम्या देऊ लागला याचा अर्थ काय होतो?"

## कर नाही त्यालाच डर !

इंदिरा-स्त्रीसूक्तात जगजीवनरामांच्या करचुकारपणाचे केलेले हास्यकारक व हास्यास्पद समर्थन त्यांच्या अंगावर शेकणार आहे असे दिसते. हा करचुकारपणा व तदनुषंगाने जगजीवनरामांनी मंत्रिमंडळांत राहणे या दोन गोष्टींचा येत्या पार्लमेंटच्या सेशनमध्ये शहानिशा करण्यासाठी पार्लमेंटमधले बरेच विरोधी गट सध्या एकमेकात विचार-विमर्श करीत आहेत असे कळते. इतकेच नव्हे तर काही मंडळी पार्लमेंट उघडेपर्यंत वाट पहायलाही तयार नाहीत असे अटलबिहारी वाजपेयींनी म्हटले आहे. ते म्हणाले, "जगजीवनराम कायद्याच्या दृष्टीने तर गुन्हेगार आहेतच पण त्यांनी एक घोर समाजविरोधी कृत्यही केले आहे. जगजीवनराम ज्या उच्च पदावर आहेत ते पाहता हे कृत्य अधिकच लांच्छनास्पद ठरते." तेव्हा त्यांनी ते पद ताबडतोब सोडावे अशी मागणी करण्याच्या बाबतीत काही विरोधीपक्षीय नेत्यांचे एकमत झाले आहे. या प्रकरणी वाजपेयींनी प्रसोपा व मार्क्सवादी नेत्यांशी बोलणी केली असून त्यात असे मत निघाले आहे की जगजीवनरामांनी इतःपर मंत्रिमंडळात राहता कामा नये. इतर पक्षांशीही वाजपेयी याबाबतीत बोलणी करणार आहेत

जगजीवनरामांनी वर्षानुवर्षे कर भरलेला नाही, हा गुन्हा कुठल्याही स्पष्टीकरणाने धुवून निघू शकत नाही असा त्यांनी इशारा दिला आहे.

## अप्पांचे तुणतुणे

काँग्रेसच्या संसदीय समितीची बैठक आज दिल्लीत होत आहे. त्या निमित्ताने निजलिंगप्पांनी बऱ्याच दिवसांनी गेल्या आठवड्यात इंदिरा गांधींची भेट घेतली. भेट फक्त पंधरा मिनिटेच झाली, पण सध्या दोघांच्यामधून विस्तव जात नाही हे लक्षात घेता ही ओझरती मुलाखतही महत्त्वाची म्हणायची. या भेटीत अप्पांनी मोरारजी भविष्य आणि पक्ष-प्रमुख की पंतप्रधान हे आपले दोन्ही आवडते विषय बाजूला ठेवले होते असे म्हणतात, पण शिस्तीचे तुणतुणे वाजवायचे मात्र बाकी ठेवले नाही. काँग्रेसचे निरनिराळे प्रांतीय नेते आता केंद्रीय नेत्यांना अधिकाधिक धाब्यावर बसवू लागले आहेत याबद्दल म्हणे अप्पांनी इंदिराजींजवळ चिंता व्यक्त केली. खरे म्हणजे बाईंच्या 'मुक्त मतदान' तत्त्वामुळेच हा प्रसंग ओढवला आहे असे अप्पांचे स्पष्ट मत आहे. पण ते त्यांनी बाईंना या वेळी उघड बोलून दाखविले की नाही हे मात्र गुलदस्तात आहे.

## सरहद्द गांधींचा स्वागत सोहळा

काँग्रेसने विभाजन स्वीकारले तेव्हा हिंदूंचा जेवढा विश्वासघात झाला तेवढाच गफारखान व त्यांच्या पठाण अनुयायांचा झाला होता. विभाजन झाले व गफार-खानांनीही भारत सोडला. नतर २२ वर्षांनी गांधी जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांनी छोटीशी भेट दिली. काँग्रेसने पूर्वी केलेल्या या विश्वासघातावर पडदा पाडण्या-साठीच जणू काय सध्या राजधानीत सरहद्द-गांधींचा स्वागत सोहळा चालू आहे. राष्ट्रपतींनी सत्कार करण्यापासून इंदिरा गांधींनी स्वतःच्या हाताने चहा करण्या-पर्यंत सर्व प्रकार झाले आहेत. शेख अब्दुल्लापासून पाटलांपर्यंत सर्व जण भेटीसाठी आतुर झाले आहेत. पण ही वरवरची झिलई ओरखडली तर आत काही आलबेल नाही हे स्पष्टपणे सूचित करण्यासाठीच गफारखानांनी अचानक तीन दिवसांच्या उपोषणाचा निश्चय जाहीर केला. इंदिराजींसकट सर्वजण चाट, पण बोलतात काय? गफारखानांसाठी ८०-८५ लाख रुपयांची थैली गोळा करण्याचा जयप्रकाश प्रयत्न करीत आहेत. व या कामी मदत करावी असे आज्ञापत्र प्रधान-मंत्राणी मुख्यमंत्र्यांना पाठविणार होत्या— पण एक आंतरराष्ट्रीय माशी शिंकली. तेवढ्या पैशांचा गफारखान काय विनियोग करणार याबद्दल अफगाणिस्तानच्या सरकारने म्हणे चिंता व्यक्त केली—झाले, लगेच सरकारी सहकार्याचा हात आखडता घेण्यात आला.

— अनामिक

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649




" जरा डोकं बाजूला घ्या ना भाई ! आमचाही फोटो येऊं द्या की वर्तमानपत्रात ! आम्ही सुद्धा उपोषणच करायला बसलो आहोत ना ?..."